संगीत

बलसिंह-तारा नाटक

प्रकाशक

केशव चिंतामण आणि मंडळी.

कांदेवाडी-मुंबई.

सन १९०९.

किंमत १ रुपया.

पान १५६ विषांची बाकी झाल्यावर.

राजा—असो आता. (विजयवर्म्याकडे हात करुन) या अधमाधमानें कपटाचरण करून तुम्हां उभयतांस अपार दुःख दिलें व आह्मां सर्वांस फसवून पातकांत पाडलें त्यांस हेच शासन योग्य होईल.

पद—ओनामवार तेरे नामधर पैजार ही चाल.

रे अधमा कुजना कुविचार ॥शूलारोपें होवो तुझिया दोषांचा संहार॥न्यारे हा कुजात,कीजे याचा घात ॥ मारा, तोडा, नेत्र फोडा, द्यावा आधीं मार ॥ रे अध० ॥ १ ॥

(सर्व सभाजन त्याचा तिरस्कार करितात)

राजा—प्रधानजी, आतां वेळ लाऊं नका. सांगितल्याप्रमाणें या अधमास आधीं कर्मांची फळें चाखण्यासाठीं पाठवून द्या.

तारा॰—महाराज, आतां माझी एक आपणांस विनंती आहे.

राजा—बोल काय ह्मणतेस ?

तारा॰—आपणांस जर आमचें प्रिय करणें असेल तर या विजयवर्म्यास क्षमा करावी.

तारा—खरंच बंधु राया, याची अप्रतिष्ठा झाली हीच शिक्षा याला पुरे आहे.

राजा—तुझ्या इच्छेस्तव मी याला क्षमा करतों.

वन्देमातरम्.

संगीत बलसिंह- तारा नाटक.

अंक १ ला; प्र. १ ला.

नांदी.

चाल - तारीं प्रभु तारी संसारीं.

भावें गुण गावे ॥ करि शिव पूर्ण कामा ॥
संत तरले फार ॥ पंडित वर विचार ॥
साधन करि साधूनि शांतितें ॥
स्तवूनि नमूनि तरे सदां ॥ भावें ॥ १ ॥

राग पूर्वी - ताल - त्रिवट.

सकल जनां रक्षो श्री शंकर ॥ हिमनगजाधव डमरुत्रिशुलधर ॥ ध्रु० ॥ रोहिणीश मस्तकीं विराजे ॥ हिमगिरि वरि करि तपासि खडतर ॥ धड धड धड धड धड धड धड धड जाळिला स्मर ॥ १ ॥ त्रिपुरासुर मातला अवनिवर ॥ मर्दुनी तयासि तारिले सुर ॥ कड कड कड कड कड कड कड कड सोडुनि शर ॥ सकल ॥ २ ॥ व्योमकेश मृड कपालपाणी ॥ जो अहर्निशीं वसे स्मशानीं ॥ भं भं भं भं भं भं भं भं वाजवी डमरु ॥ सकल ॥ आत्मानंदीं मग्न सदा जो

॥ व्यापुनी उरे चराचरां हर ॥ भावें गावें ध्यावें त्यातें जोडुनी कर ॥ सकल ॥ ३ ॥

सूत्रधारः—वाहवा! या प्रमाणें त्या अनाद्यंतप्रभूचा प्रभाव प्रसिद्ध असतां जे अप्रबुद्धि अप्रत्ययानें अंध होत्साते अनन्वित संसारकार्यांत निमग्न होऊन राहतात, त्यानां काय ह्मणावें बरें ? (विं. क.) असो, इतरांच्या कार्यासंबंधानें विचार करीत बसून बोलण्याचा हा काळ नव्हे. ज्याला कळेल त्यानें:-

साकी.

चित्त शांति राखोनि प्रभुच्या चरणीं शरण रिघावें ॥ अनन्य बुद्धिप्रभाव ज्याचा त्यानें स्वपद बघावें ॥ आत्मा परमात्मा ॥ यांचें ऐक्य शुद्ध महिमा ॥ १ ॥

(नटी प्रवेश करिते.).

नटी (येत येत)

चाल – सुटला पितृदिशेचा वारा.

पतिला देवपिसें लागोनी ॥ संसारावर पडलें पाणी ॥ गृहकार्य न पाहे बसला साधु बनोनी ॥ तळमळते दारा हें न दिसे ज्या नयनीं ॥ धृ० ॥ हंसती कुटुंबि सारे सदां ॥ स्वेती न बाळगी मनिं कदां ॥ स्तुति निंदा सम मानोनी डुलतो स्वमनीं ॥ हळहळती मातापितरें स्थिति पाहोनी ॥ १ ॥ देवा अनंत तूं तव नामें ॥ होतो लाभ न वाक्य रिकामें ॥ परि निंदक निंदा

करिती ती ऐकोनी ॥ खिन्नता घावते तळमळ दिवसा रजनीं ॥ २ ॥

सूत्र०—(तिजजवळ जाऊन) सखे, निंदक जे आहेत यांनीं जरी निंदा केली तरी तूं खिन्नता धरूं नको ह्मणजे झालें.

दिंडी.

निंदकाचें गृह जवळ असावें गे ॥
सदा निंदावें तयें थोर रागें ॥
करी क्षालन तो दोष मळाचें कीं ॥
शुद्धता त्याचे संगतिनें लोकीं ॥ १ ॥

नटी—आपलं ह्मणणं कदाचित् खरं असेल. आमचा बा-पकाचा जीव कोणी व्यर्थ निंदा केलेली ऐकतांच तिळ तिळ तुटूं लागतो. आपण एक साधू बनून राहिलात. सगळीं माणसं तशीं होतील तेव्हांना ?

सूत्र०—जाऊंदे ग. या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तूं आलीस तर ज्यांत ईश्वरस्तवन असेल असं कांहीं गायन कर, ह्मणजे आपल्या पुढील कार्यास त्यापासून साहाय्य होईल.

नटी—ठीक आहे. जशी आपली आज्ञा—

चाल—जेल खानेकादरोगा.

श्रीरंगा या दीनातें स्वपदिं रमवीं ॥ धृ० ॥
सत्संगति दे सुवाक्य वदनीं वदवावें सुदयें ॥ सच्छास्त्राभ्यासिं मन रिझुनी नत राहो विनयें ॥ कामक्रोधादि शत्रूंचें दमन करवीं ॥ श्रीरंगा ॥ १ ॥ धनकनकाचा लोभ नको तो लाघव दाख-

वुनी॥ संसाराचे पाशीं बांधी मतिला क्षोभवुनी॥ जाया पुत्राच्या संगानें स्वसुख बुडवी ॥ श्रीरंगा ॥१॥ शरणांगत तव रक्षक महिमा ऐकु-नियां कानीं॥ विश्वासोनि भाव ठेविला अनुभव दावि जनीं ॥ या सत्पथीं लावोनी स्वगुण वद्‌वी ॥ श्रीरंगा ॥ ३ ॥

सूत्र०—शाबास ! प्रिये, फार चांगलं गायन केलंस. पण आतां या आवाहिंत महाजनांचं मनोधारण कसं करावं हीच मला चिंता आहे.

नटी:—त्या बद्दल चिंता करण्याचं कारण नाहीं. कारण आपल्या चूर्णवर्मा रंगवल्लीलेखकानं हल्लीं जें क्षीराब्धिवासी शेषशायी लेखन केलं आहे, तें या महाजनांस दाखवावं ह्मणजे यांचें मनोधारण केल्यासारखंच होईल.

सूत्र०—ठीक आहे. चल तर, त्या आदिनारायणाचं दर्शन प्रथम घेऊं.

नटी:—चलावं. (पडदा उघडतांच) हा पहा तो शेषशायी आदिनारायण.

सूत्र०—वाहवा—

चाल-भूपति खरें तें वैभव सुख.

सूत्र०-हा शेष पलंगाकृति पसरे या स्थानीं ॥
दशशत मित छत्रें करी फणा उभवोनी. धृ०
त्यावरी प्रभूची मूर्ति सुप्त सुखशयनीं ॥
निज आनंदानें स्तब्ध दिसे या नयनीं ॥

नाभीच्या कमलीं चतुरानन राहोनी ॥
जप करी असावें ज्ञान सृष्टिच्या रचनीं ॥
नटी ॥ चाल ॥ श्रीलक्ष्मी चरणापाशीं राहुनी ॥
करि संवाहन सुख राशी पाहुनीं ॥ धन्यता
मानि जन्मासी घेउनी ॥ चाल ॥
सूत्र०—हा शेषशायनविभु संत धरोनी ध्यानीं ॥
डोलती सोडुनी संसारावर पाणी ॥ १ ॥
नटी ॥ चाल ॥ शुक सनकादिक या ध्यानीं ला-
गुनी ॥ जाहले धन्य सुखदानीं भाउनी ॥
गंधर्वादिकही गानीं गाउनी ॥ चाल ॥
सूत्र०-निजछंदें तरले सखे सुखें राहोनी ॥
भोगिती स्वर्ग सुख सदां सुधा प्राशोनी ॥ २ ॥

नटी:—कां, हा चित्रपट चूर्णवर्म्यानं कसा रंगविला आहे बरं ?

सूत्र०— या कामांत त्यानें कांहीं कसर केली नाहीं खरी.

(गडगडाट होतो व शेषाचा देखावा गुप्त होतो)

नटी:—(भयानं) प्राणनाथ, हा भयंकर ध्वनी कसला झाला बरं ?

सूत्र०—सखे, हा कांहींतरी पिशाच्चाचा खेळ आहे असं वाटतं. असें ऐकतों कीं, पूर्वी क्रोधदर्शन नांवाचा कोणी एक मांत्रिक होता; तो एकाएकीं मरण पावला आणि सांप्रत तो पिशाच्च होऊन आपणांस कोणी जोडीदार शोधित आहे, त्याचाच

हा शब्द होय. आपल्या कुशिलव मंडळींनीं हा नाटकारंभ केला आहे; तर चल आपणही आपापले वेष घेण्यासाठीं निघून जाऊं.

साकी.

अंतीं हेतु उरे यास्तव हो पिशाचयोनिप्राप्ती ।।
अघोरपथगामी जे त्यांसी शेवटची संप्राप्ती ।।
आहे ठरलेली ।। सखये स्मृतिनें धरलेली ।। १ ।।

ही प्रस्तावना झाली.

(जातात.)

प्रवेश १ ला. जंगल (पिशाच्च प्रवेश करितें.)

पिशाचः—

राग—धमार.

अरे मीं भूत स्वयमुद्भुत दुर्धर अद्भुताकृति धडड
धड धड अग्नि पेटे तसा लोकीं भूत ।। धृ० ।।
सूर्य चंद्रा खालीं उतरिन, सिंधु पर्वत चढवितां
वर, नाहीं मज जड सहज ती कृति करिन,
परि मज जोड न मिळे, तोड न सुचे, धाड
घाला घालुनीयां धरिन नरकीं भूत ।। १ ।।

जिवंत होतों तोंपर्यंत अनेक साधनें करून जारण, मारण उच्चाटणादि कृति हस्तगत करून घेतल्या व लोकांत आपला, आपल्या नांवाचा व कृतीचा धाक बसविला. बहुतेक सर्व लोकांस त्राहि त्राहि करून सोडलं. पण दुर्दैवानें तितक्यांत माझं आयुष्य सरलं ह्मणून नाइलाज झाला; नाहीं तर त्या ईश्वरभजन करणाऱ्या सन्मार्गसिंहासही आपला अनुयायी करून, मग

मेलों असतो. (वि. क.) असो मेलों ह्मणून काय झालं. पिशाचरूपानं पुन्हीं त्याची खबर घेण्यास तयार झालोंच आहें. आतां तो ईश्वरभजन करून किती दिवस निभाव धरतो हें पाहतों. इतके दिवस त्याची बायको, पोरें हीं तरी त्याच्या तंत्रानं वागत असत. पण आतां त्याच्या बायकोवर मी आपली छाया घातली कीं:—

चाल – योग्य हा जिवंत काय.

बोल बोलुनी तयास गांजितांच कामिनी ॥
बालकेंहि भूक भूक बोलति निशीदिनीं ॥
हा नको अतीव दुःख दाविता प्रपंच मी ॥
व्यर्थ जन्मलों वदेल होउनी मनीं श्रमी ॥ १ ॥

नंतर तो त्या बायकोवर व पोरावर त्रासून गांवाबाहेर निघून येईल. आणि मग दाखविन त्याला माझा प्रभाव कसा आहेतो! त्याला मद्य पाजीन, ईश्वर भजनापासून विन्मुख करीन, राज्य देईन. मला काय कमी आहे ? जें मनांत आणीन तें करीन. खरोखर पाहिलें तर माझी शक्ति देवादिकांहूनही जास्त आहे. लोकांनीं कोणत्याही देवाचं नांव न घेतां माझं भजन केलं तर सर्वस्वी मी त्यांचं कल्याण करीन. आणि हें मी त्यांनां सांगतों. परंतु हे मूर्ख लोक माझी आराधनाच करीत नाहींत. (इकडे तिकडे फिरून) अरे हे मर्त्यमानव हो; माझं ऐका, – ऐका – ऐका; नाहींतर तुमची टाळकीं फुटलींच ह्मणून समजा, आणि मारा हाका. चाललों

बरं मी त्या सन्मार्गसिंहावर झडप घालायला. आतां मी त्याजवर झडप घालून त्याला मद्य पाजून आपला अनुयायी करीन. (ऐकलेंसे करून) काय ह्मणतां ? तो दारू पिणार नाहीं. अरे तो तृषाक्रांत झाल्यावर पाणी पिण्यास नदीवर गेला ह्मणजे त्याला नदी आटल्याचा भास करीन. आणि मग तो पाण्या-करितां तळमळूं लागला ह्मणजे त्याला दारू पाजून बाटवीन. नंतर त्याला प्रत्यक्ष दर्शन देईन. आणि त्याला राजा करीन. (ऐकलेंसे करून) काय ह्मणतां ? त्याला राज्य कसं देणार ? तुझ्या हातांत काय आहे ?. ऐका कनकावतीचा राजा निपु-त्रिक असून सांप्रत तो आसन्नमरण झाला आहे. त्याच्या स्वप्नांत जाऊन त्याच्या पश्चात तें राज्य त्याला मिळेल असं करीन. तुह्मीं अज्ञानांनीं माझं काय पाहिलं आहे रे ?

साकी.

चंड बली मी बंड माजविन थंड न पडतां कोठें ॥
पुंडाईचा अग्नि पेटविन सामर्थ्यच मम मोठें ॥
प्रत्यक्षच बघुनि ॥ जाणा येइल तें स्वमनीं ॥

(असें ह्मणून जातो.)

प्रवेश २ रा. अरण्य— सन्मार्गसिंहाची झोपडी.

सन्मार्गः—

चाल — येही बदीमे पाय गम्.

प्रभुपदाब्ज रंगीं रंग, नहो कधि भंग ॥
सन्मार्ग वरि हरि भजे मनारे धरीं सदां सत्संग ॥ धृ० ॥ हा व्यर्थ व्यर्थ संसार, न लाभे सार ।

परि अंध तसा लोभांत गुंतुनी होतं जीव बेजार॥
गुरुवाक्याचा आधार, न भासे भार॥
कामादिकरिपुंची भीड नको त्यां मार बळानें ठार
चाल॥ नारायण जो जगस्वामी॥ सर्वांच्या
अंतर्यामीं॥ पाताल भूवरी व्योमीं॥ चाल॥
सर्वत्र व्याप्त श्रीरंग, न भासे व्यंग॥ हरि
वदतां क्षय भय नसे शांतिचा वाजे सुस्वर
चंग॥ प्रभु०॥ १॥

भामिनी—(तिरस्कारानें) अहा हा! काय पण ध्यान लागून राहिलं आहे. दिवेच ओवाळावेत.

सन्मा०—(स्वगत.)

चाल—श्रीरामीं मना रतहोई सदा.

धांव विभो कर देई बुडे हा, धांव विभोकर॥
॥ ध्रु०॥ सुखांसुखाचा दाता तूं प्रभु। पालक
तूं जगचालक तूं हा दीन पहा, कर॥ १॥
परात्परा त्वां तारियले बहु, कीर्ति जगीं, वदतात
सुगी, मुनिवर्य महाकर॥ २॥ अघनगहंता तूंच
महेश्वर, ध्यास तुझा, नदिसेच दुजा, हा वारि
दहाकर॥ ३॥

भामिनी:—दुसरा दिसत नाहीं तर आपला संसार पहा. पोराबाळांच्या पोटांची काळजी वहा. म्हणजे हीं दीनवाणी झालेली बापडीं आनंदानं हंसत खेळत तरी राहतील.

ताराः—आई, मला भूक लागली.

बलः—माते, ! मलाही भूक लागली आहे.

भामिः—बाळांनों, तुह्मांला भूक लागली असेल खरी, पण, माझा काय उपाय आहे बरं. हें हातांतलं दळण आटपलं ह्मणजे पीठ जिकडचं तिकडे पोंचवीन आणि मजुरी बदल जें मिळेल ते घरीं आणून तुमची व्यवस्था पाहीन. तोंपर्यंत तिकडे जाऊन कांहीं मिळेल तर पहा.

बल. व ताराः—(बापाजवळ जाऊन.)

कामदा.

भूक लागली प्राण चालले ॥ अन्न पाहिजे ओंठ वाळले॥ बालकांवरी राग कां असा॥ शक्तिपात हो कोरडा घसा ॥ स्तब्धता न हें योग्य अंतरीं॥ येउंद्या दयां थोडकी तरी ॥ नेत्र झांकुनी काय बैसलां ॥ खावयास द्या हो उठा चला ॥ १ ॥

सत्या०—(झिडकारून) चलारे मुलानो, दूर व्हा, मला विनाकारण त्रास देऊं नका.

भामि०—(पती जवळ जाऊन) बापड्या त्या मुलांना काय ह्मणून लोटून द्यावं? त्या बिचाऱ्यांनीं काय केलं आहे—

चाल—वद जाऊं कुणाला शरण.

जन ह्मणती अन्नमय प्राण, नसे तें भान तुह्मां कसलें ॥ प्रसवोनी व्यर्थ मी फसलें ॥ हीं बाळें ॥ दिनकरोदयापासुनि, याचना जगीं, करुनि थकल्यें परि अन्न कसें ना दिसलें ॥ पतिराया ॥

व्याकूळ होई मम बाळ, कसा हा काळ, कठिण आला॥कां दया नये आपणांला ॥ पतिराया॥१॥

सन्मा०—(तिरस्कारानें) ठाऊक आहेग. तूं मोठी दयाळु आहेस हें मला कळलं आहे. पोरांची कर्मगतीच अशी असली तर त्याला माझा काय उपाय चालणारआहे ? कारणः—

मालकंस — करमकर मेरेहाल.

न दे देव सौख्यें न दुःखें परी ॥ जसें कर्म तैसीं पहावी परी ॥ धनी कोण कोणास कर्मीतरीं ॥ न माता पिता जन्म दानावरी ॥ न जों ज्ञान तों यांस पोसावया ॥ सुयत्नें झटावें खरें सुंदरी ॥ परी यत्न चाले न माझा तरी ॥ करावें कसें काय कोण्यापरी ॥ १ ॥

भामि०— आग लागो त्या वेदांताला ! या वेदांतानंच आजपर्यंत भीक मागत बसवलं आहे. अजून तरी माझं ऐकावं आणि हातांतली स्मरणी ठेवून कांही तरी उद्योग करावा. हीं मुलें तळमळ करतात तें माझ्यानं पहावत नाहीं !

सन्मा०— खबरदार. तूं मला 'तुह्मीं अमुक करावें तमुक करावें' असा उपदेश करूं नकोस.

भामि०— उपदेश करावा असा माझा अधिकार आहे असे मी ह्मणत नाहीं. तरी मुलांच्या संबधानं योग्य विचार सांगण्याचा माझा हक्क आहे.

सन्मार्ग—एकूण तूं आपला हक्क माझ्यावर चालवणार अं ? पण तुला हें शेवटचें सांगून ठेवतों कीं पोरांच्या कर्मग-

तीबद्दल व सुखदुःखाबद्दल मी जबाबदार नाहीं. असें असतां तुझी समजूत तशी असेल तर तूं व तुझीं हीं दोन्हीं पोरं आनंद करीत बसा. मला तुमची कोणाचीच गरज नाहीं. मी कुठेंतरी एकांतांत जाऊन आनंदांत राहीन.

मुलें०—आई, बाबा काय ह्मणतात ग ?

भामि०—बाळानों, आतां काय सांगूं तुह्मांला ?

मुलें०—ते जें ह्मणत असतील तें सांग.

भामि०—ते ह्मणतात मला तुमची गरज नाहीं.

मुलें०—काय ? आमची त्यानां गरज नाहीं, असं त्यांचं ह्मणणं ? (बापास) बाबा, आई सांगते तें खरें आहे कांहो ?

सन्मा०—होय खरें आहे.

तारा०—बाबाः—

राग पिलु ताल पंजाबी

तुह्मींच थोरजनीं, धनी गमे, तुह्मींच ॥ धृ० ॥ जनक जननिचा आश्रय मोठा ॥ तारक सानपणीं ॥ धनी गमे ॥१॥ क्षुधित समय हा सोसत नाहीं ॥ पीडित बाळपणीं ॥ धनी गमे ॥ २ ॥

बल०—

चाल — वसंती बघुनि मैन केला.

कांहो कोपालें वरितां ॥ विनती माझी ऐका सदया हे मत्प्रिय ताता ॥ चुकतां धेनु वत्सातें ॥ धाय मोकली पाडस तैसें होइल आह्मांतें ॥ एकली माय काय करिते ॥ आक्रंदोनीं प्राण त्य-

जिल हें खास मला गमतें ॥ यास्तव सोडुनि आह्मांतें ॥ नच जावें परि प्रभुस्मरण हो राहुनि सदनातें॥करणें योग्य हेंच असतां॥व्यर्थ कशाला टाकुनि जातां सदन आणि कांता ॥ १ ॥

सन्मा०— अरे बाळानों,तुह्मांला क्षुधेची पिडा होत असेल, मी तें खोटें मानीत नाहीं. पण माझ्याजवळ देण्यास कांहीं नाहीं. यासाठीं सांगतों कीं मला विनाकारण त्रास देऊं नका.

भामि०— मला विनाकारण त्रास देऊं नका असं ह्मणतांना जिवाला कांहीं वाटत आहे का ? मेल्यानों, तिळाएवढीं लहान अज्ञान अर्भकं तीं. त्यानां वेदांत सांगून काय समजणार आहे. त्यांच्या पोटाची कांहीं तजवीज करा.

सन्मा०— कायग, तूं तोंडं वेडीं वांकडीं करून माझा उपहास करतेस काय ? पण अशानें कांहीं लाभ होणार नाहीं. विचार कर.

भामिनी०— लाभ आजपर्यंत कधीं झाला आहे तो पुढं होणार असं मानावं. (स्वगत) आई बापांनीं पोरगीं विहिरींत लोटायची ती हें दिव्यरत्न पाहून दिली असें ह्मणायला मला मुळींच भीड वाटत नाहीं.

सन्मा०— (खेदाने) अरेरे ! ही बायको आतां आपला मान मुळींच ठेवणार नाहीं, असं या भाषणावरून सिद्ध झालं. तर आतां आपला मार्ग सुधारावा हें बरें. (तीस) ऐकलंस:—

चाल — ही योग्य राहण्या जनीं.

हा थोर असे संसार तो पार, उतरण्या कांहीं मज मार्ग गमेना एकेशाविण पाही ॥ ध्रु० ॥

प्रभुवरा, नित्य मनिं स्मरा, धैर्य तें धरा, देइ वि-जयातें ॥ श्रीरंग, करुनि भवभंग, तारि दीनातें ॥ ॥ चाल ॥ त्यागुनि मोहजालातें मी वनीं ॥ वनिं जात वास करण्यातें निशिदिनीं ॥ निशिदिनीं प्रभुपदसेवा मन्मनीं ॥ चाल ॥ मन्मनीं, करीं मी जरी तरी श्रीहरी, देइ मुक्तीतें ॥ सत्य हेंच वदले साधु सदा उक्ती ते ॥ १ ॥

या करतां तूं आपलीं पोरं आणि घर संभाळून आनंदानं तुला वाटेल तो व्यवसाय करून रहा. आतां तुझा व माझा कांहीं संबंध उरला नाहीं. हें स्पष्ट सांगून मला ईश्वर जो मार्ग दाखवील तिकडे जाईन — समजलीस ?

भामी० — (चपापून) अगबाई, उठून कुणीकडे जाणार कि काय कोण जाणें. जवळ जाऊन पोरं भूक भूक करूं लागलीं तें पाहवेना ह्मणून सहज दोन शब्द बोललें त्याचा असा भयंकर परिणाम करणार कीं काय ? पाहिजे तर मी क्षमा मागतें :—

चाल— नृपममता रामावरती.

अबलेच्या बोलावरती ॥ कां कोप येत हा स्वांतीं ॥ प्रियकरा ॥ हीं मुलें दीन तळमळती ॥ बघवेना वाटे खंती ॥ प्रियकरा ॥ बोललें शब्द जो वक्त्रीं ॥ तो भेदक झाला अंतीं ॥ प्रि० ॥ ॥ चाल ॥ त्यागितां, कशी सुमंता, होय ही वृथा, तुह्मांविण अंतीं ॥ होईल जगीं अपकीर्ति ॥ प्रियकरा ॥ १ ॥

सन्मा:— तें कांहीं भला समजत नाहीं. तुमच्या स्वभावाला

जें कांहीं राज्यवैभव पाहिजे तें कांहीं माझ्या संगतीनें राहून जन्मजन्मांतरींही मिळणार नाहीं. त्याप्रमाणें मी जर तुमच्या डोळ्यासमोर राहिलों तर तुह्मीं सर्व एक व्हाल आणि मला कधीं सहन न होणारा ताप मात्र द्याल, हें आतां मला चांगल्या प्रकारानें कळून आलें आहे. यासाठीं तुमची संगत सोडावी आणि जिथें कुणी त्रास देणारें न भेटतील तिथें अगदीं एकांत स्थान पाहून आनंदानें रहावें असा आतां माझ्या मनाचा निश्चय होऊन राहिला आहे.

चाल– ऐसे धोका देनेवाले.

मुलें— कांहो टाकुनि आह्मां जातां ॥ चुकलों काय असें ताता ॥ कोणाचाहो आश्रय आतां ॥ कोण जगीं हो आह्मां त्राता ॥

भामिनी— क्षमा करावी प्रियकर नाथा ॥ बोले ना ही कधींहि आतां ॥ सांगतसे या जोडुनि हाता ॥ घरीं राहा प्रार्थी भगवंता ॥ सौख्य मनीं मानूं ॥ नाथा ह्मे न कधीं मानूं ॥ कांहो ॥

सन्मार्ग— त्रास नको या संसाराचा कंटाळा आला गे कांते ॥ व्यर्थ नको हा शिण मनाला आराधिन त्या भगवंतातें ॥ संबंध नको आतां नातें, तत्व लयाप्रत सारें जातें ॥

मुलें— हें न योग्यतेस हो, योग्य थोर जे जनीं॥ ज्ञानपूर्ण जे तयां शांति पाहिजे मनीं ॥ चाल ॥

भामिनी— राग नको तो विघड करूनी ॥ दुःखद होतो सौख्य हरोनी ॥ हळहळ लावी सुमति

बिघडुनी ॥ कैचें मग सुख तुह्मां विजनीं ॥ सोडुनियां कांता ॥ कांहो टाकुनि ॥ १ ॥

सन्मा:— हें कांहीं माझ्या उपयोगाचें नाहीं. (मुलांस) बाळानों, तुह्मीं आतां आपल्या मातेजवळ जाऊन बसा. तीच तुमच्या सर्व इच्छा पुरवील. (स्त्रीस) बैस बरें आपलीं मुलें संभाळीत. (जातो)

भामि:—अगबाई, खरंच घर सोडून जातात काय ? (मुलास) बाळानो, इथं बसा बरं. मी त्यानां परत घेऊन येतें. (जाते)

बल:— आई, मी येतो तुझ्या बरोबर. (जाऊं लागतो.)

तारा:— (त्यास आवरून) बाळा, कुणीकडे धांवत चाललास ? आई अत्तां परत येईल बाबानां घेऊन.

बल:— ताई, बाबा कुणीकडे ग गेले. ?

तारा:— ते आपल्या सर्वांवर रुसून गेले आहेत ह्मणून आई त्यांची समजूत करून घेऊन येण्यासाठीं गेली आहे.

बल:– असं आहे तर आपणही दारांत जाऊन त्यांची वाट पहात बसूं.

तारा:– तुझ्या मनांत आहे तर चल दरवाज्यांत.

बल:— चल तर मग. माझी ताई कशीपण चांगली आहे ह्मणूनच मी सांगतों तसें ऐकते.

ताई— चल. (जातात.)

प्रवेश ४ था. जंगल (पिशाच उड्या मारीत येतें)

पिशाच—

चाल— च्यांडची.

आला ! आला ! माझा घाला फक्कड पडला रंग भरला ॥ खोंचुन टोंचुन जाचुन बोंचून हरहर करि घरभर फिरला ॥ पोरें जोरें मागति बारे भाकर देरे चरचरला ॥ आत्मा पेटे आला वांटे शेवट पोटावर ठरला ॥ पळून ये वनीं, कुटुंब सोडुनी ॥ मनीं विशंकुनी, रडे क्षणोक्षणीं ॥ हंसेल तो धनी, ह्मणेल या क्षणीं ॥ तयास पाजुनी, वारुणी रस गरला ॥ आला ॥ १ ॥

आतां आंलाच तो माझ्या हातांत, कितीका भजन करिना, ते सोडविण्यासाठीं वारंवार अशा संकटांत पाडीन कीं, शेवटीं त्याला लोभांत गुंतविण्याचं मला मुळींच कठीण पडणार नाहीं. बरं एकवेळ जो लोभांत सांपडला, तो माझ्या हातांत सांपडलाच. मग मी त्याला घेरलाच आणि बीर भरलाच समजा. साळसूदपणाच्या गमजा आमच्या छायेखालीं आल्यावर सगळ्या विसरणार. सन्मार्गसिंह जरी नांवाचा आहे तरी एकवेळ आमच्या अनुग्रहांत आला ह्मणजे तो जंबूक झालाच. मग त्याच्या भजनावर पाणी पडणार. त्याची बुद्धि धनवैभवावर लुब्धता धरणार, अनुचितास प्रवर्तणार. ढंगाचीं गोडी मातणार. जाड्यता आदरणांर, गर्व करणार, कांहीं येत नसले तरी सर्वज्ञपणा मिरवणार, आणि शेवटीं अतिशयपणा करूं लागला ह्मणजे कर्मानुरूप फळ पारखणार हें ठरलेलं आहे, (इतक्यात फिरून) पण असं झालं तरी ही जिवंत माणसं बरं झालं असं ह्मणणार नाहींत. तर खरोखरच त्याला राजा करणार. त्याचं

वैभव हां हां ह्मणतां वाढवणार आणि त्याचे सर्व अनुयायी दा रुबाज बनवून ते सर्व शेवटीं माझें दरबारीं किंवा जोडीदा बनतील असं करणार. त्या सर्वांसह अंतरिक्षांत मी माझें स्व ताचें महाबलवान राज्य स्थापणार. (पुन्हां इ. तिं. फिरून. असो, आतां तो सन्मार्गसिंह मुख्यत्वें आपल्या बायको व तिच्याच संबंधानें साधारणपणें मुलांवर रागावून त्यां सोडून निघून आला आहे. त्याची बुद्धि भ्रंशित करण्यासाठी इथंच गुप्तरूपानं उभा राहतों. आणि तो काय बोलतो तें ऐ कतों. नंतर जें करणें योग्य दिसेल तें करतों. हा पहा आलाच (एका बाजूस उभा राहतो. व सन्मा० येतो)

सन्माः— (प्र. क.)

चाल– राग कालिंगडा, ताल – दादरा.

प्रभुपदाब्ज भृंग तो अशांत हो न या जनीं ।
स्वसुख पाहतां तयास मान हो जनीं वनीं ।
व्यर्थ वैभवार्थ भूल हें जरी कळे तरी ॥
मूर्खपणा करुनि फार पूजिसी स्वकामिनी ।
भाव पूर्ण पाहिजे ईश्वरावरी नरा ॥
चंचलता फुकट सौख्य भोग हें धरी मनीं ।

राम, राम, राम. पिंजऱ्यांत पडलेला पक्षी सुटला ह्मणजे त्यास त्या मुक्तपणा पासून जो आनंदानुभव प्राप्त होतो, तोच या वेळेस मी अनुभवित आहें. या वेळेस मला जें पद्य आठ वलें आणि जें मी इकडे येतानां सहज ह्मणत आलों, त्यांतील स्पष्टार्थ पाहतां जरी मी स्वजन सोडून या एकांत–निर्जन–वनांत आलों आहें तरी माझ्या शांतीचा भंग झाला नाहीं, पण उल

तिला स्थिरता प्राप्त झाली. आणि सुखाच्याही संबंधानें पाहतां या निर्जन प्रदेशांत आल्यापासून मी पूर्ण सुखांत आहें असं मला वाटतं. तर या पेक्षां अधिक वैभव तें काय पाहिजे:—

चाल— साध्य नसे मुनिकन्या चाली.

राहुनियां स्वसुखानें, अंतीं साधीन मोक्षार्थ मीं आनंदानें ॥ धृ० ॥ संसारीं राहोनी आजवरी मी ॥ श्रमलों व्यर्थचि ते ये न कामीं ॥ मात्र तपाची ती हानी ॥ अवघें नश्वर लय नियमानें ॥ राहुनि ॥१॥ कन्या सुताची न यांचा नवीं या ॥ उद्योगी व्हावें हें न वदेल जाया ॥ नाम नको विस्मराया ॥ स्वसुखें वागावें यम-नियमानें ॥ राहुनि ॥ २ ॥

असो, हें सर्व ठीक व सोयीचें आहे. माध्यान्हकाळ होऊन क्षुधा लागेल तर हिरवीं गार झाडें बहुत दिसत आहेत. गोड लागेल व खाववेल तो पाला भक्षण करून वनवासांत या प्रमाणें निर्वाह करतां येईल. तें असो. पण तृषातर फार लागली आहे. या मार्गानं गेल्यास पुढें अरण्यांत एक नदी आहे हें मला ठाऊक आहे. त्या नदीच्या तीरीं जाऊन राहण्यास योग्य असें स्थान पाहून त्या ठिकाणीं आनंदानं रहावं ह्मणजे सर्व काळ ज्या निवारण झाल्यासारखेंच आहे, चला तर—

साकी.

एकांतीं हरिभजना वांचुन कार्य न उरलें कांहीं ॥ गृहमेधाची हौस नसे तो चालविणें लेंकांहीं ॥ राहुनि संभ्यपणें ॥ कुलकीर्तीस्तव बहु जपणें ॥

(जातो.)

भूतः—(प्र. करून) धर धर धर पकड ! सोडुं नको आला आतां सपाट्यांतः–

चाल– ड्यांडची.

तूं सोडरे भजन, रहा मगन् मगन् ॥ पिउन दा ही करी सदा अमन् चमन् ॥ मजा इजा न यांत हो सजे प्रती न जम् ॥ झळक् फळक् तिलक करील चैन हो न कम् ॥ तूं सोडरे ॥ १ ॥

अर वेड्या सन्मार्गसिंहा, सोड सोड तो भजनमार्ग सोड, आणि माझा उपदेश हीच जोड मानून गोड गोड मदिरा भ रारा पिऊन सदोदित चैनीत अरण्यांत किती व काय सुख आहे तें पहा तरी । या वेळेस तृषा लागली आहे व तूं नदीचा शोध करीत रानांत चालला आहेस पण तुला आतां पाणी सांपडेल असं तूं समजतोस काय ! छे छे छे, ती नदी तूं तिथं जात आहेस तों आटून गेली असा तुला भास होईल आणि अतिशय तृषा लागून वसा कोरडा पडला ह्मणजे ही ह्या चक कीत कुपींतील रुचकर, चवदार, छानदार–मजेदार, दारु तुझ्या घशांत जाईल (जातो.)

सन्मा:— (प्र. क. नदी आटलेली पाहून) अरे हा काय प्रकार आज पाहतों ? मोठया आशेनं येथपर्यंत आलों परंतुः—

चाल-- नदेदेहि बंदे- में पाया लगी.

चमत्कार वाटे वनीं या मला ॥ कशीही नदी जाहली निर्जला ॥ भरोनी सदां वाहणारी परी ॥ जलौघाविना शून्यता भ्यासुरी ॥ १ ।

1

तृषाक्रांत झालों, गळा कोरडा ॥ सुचेना जरी एकला मी तरी ॥ २ ॥

असो, ही नदी जरी कोरडी झालेली दिसत आहे तरी खालींवर कोठेंतरी पाणी असलंच पाहिजे. शोध केल्याशिवाय निराश होऊन बसतां कामा नये. (इ.ति फिरून.) आतां मात्र कमाल झाली. कुठंही पाण्याचा बिंदु दिसत नाहीं. हा प्रकार कोणत्या कारणानं झाला आहे कांहीं कळत नाहीं. (वर पाहून) ईश्वरा काय हें ! या अरण्यांतील पशुपक्षी तरी पाण्याशिवाय कसे जगत असतील. किंवा मी दुर्दैवी, बायको पोरांचा त्याग करून या अरण्यांत निघून आलों म्हणून माझ्या पाय-गुणानंच या नदींतील पाणी आटून गेलं ! कांहीं कळत नाहीं. देवा ! आजपर्यंत तुझ्यावर भाव ठेवून तुझं नाम संकीर्तन करीत राहिलों पण खरोखर पाहतां आजपर्यंत कांहीं लाभ तर दृष्टोत्पत्तीस आला नाहीं. आतां सर्वसंग परित्याग करून निर्जनअरण्यांत आलों आहें; तर कृपा करून तूं स्वतः दर्शन दे. नाहींतर एकाद्या पिशांचाचं तरी मला दर्शन होईल असं कर (आकाशांत गडगडाट होतो व भूत ओरडत प्रवेश करतें)

भूतः–(प्र. क.)

चाल – श्लोक – चार.

माग माग माग काय पाहिजे तुला नरा ॥
सोड सोड भागलास सौख्य शांति ना जरा ॥
भींड भाड कासयास आस ना पुरे जरीं ॥
घे प्रसाद हा जगांत येईना जया सरी ॥१॥

20 75 ... 4-3-57

कायरे, हा मी कोण आहें हें तुला माहीत आहे काय? सन्मार्गसिंहा, भिऊंनको. आनंदानं पुढें ये आणि जें पाहिजे असेल तें मागून घे.

सन्मा:– (चकित हो०) अरे! हें काय विचित्र रूप! मी अहोरात्र ईश्वरभजन करणारा असं असतां आज या अरण्यांत येतांच एकाएकीं हें काय पाहतों. ईश्वरस्तत्र करीत असतां सहज तुझं नाहीं तरी पिशाच्चाचंतरी दर्शन होऊंदे, असं बोलतों तों खरोखरच पिशाच्च उत्पन्न होऊन पुढं उभं राहिलं. आतां काय करावं बरं. याच्या प्रसादानें आपलं कल्याण होईल असं दिसत नाहीं.

भूतः– वेडा आहेस. माझा प्रभाव तुला ठाऊक नाहीं ह्मणून असं बोलतोस. माझ्या प्रसादानं तुला जें पाहिजे त्याचा लाभ होईल.

सन्मा:– पण असा भयंकर वेषधारी तूं कोण आहेस?

भूतः–मी कुणीही असलों तरी त्याचं तुला काय आहे? तुला जर आपलं कल्याण करून घेणं असेल तर जें मी सांगतों तें तूं आनंदानें मान्य कर.

सन्मा:– मी आजपर्यंत ईश्वरभजन केलं.

भूतः— पण त्यापासून तुला कांहीं लाभ झाला नाहींना? मग काय तें भजन करून उपयोग? माझं ऐक तुला कांहीं कमी पडणार नाहीं.

सन्मा:— ईश्वरभजनामुळें माझ्या मनाला पूर्ण शांतीचा लाभ झाला आहे.

भूतः—शांतीचा लाभ झाला तर तळमळतोस काय ह्मणून ?

सन्माः— ह्या अरण्यांतील या नदीचा प्रवाह मोठा होता. बायकापोरांनीं त्रासविलं ह्मणून त्यांचा राग करून तृषाक्रांत झालों होतों तरी पाणी पिण्यासाठीं या नदीच्या विश्वासावर इथं आलों. पण पाहतों तों ही नदी आटलेली. हिच्या या विस्तीर्णपत्रांतील पाणी एकाएकीं नाहींसं कसं झालं ?

भूतः—तूं भजन करणारा पांढऱ्या पायाचा आलास त्यामुळं पाणी आटलं. दुसरं काय ? तुझ्यासारख्या भजन करणाऱ्यांत कोणता सुखी झाला आहे सांग ?

सन्माः—खबरदार, बोलूं नकों.. हरिभजनाचं महत्व तुला ठाऊक नाहीं.

भूतः—असं आहे तर बैस रडत पाण्यासाठीं. बोल जाऊं कीं ? गेलों ह्मणजे आपल्या लाभाला अंतरशील. विचार कर. माझं ऐकशील तर असं एक छानदार तुला पेय पाजीन कीं, त्याच्या प्रभावामुळं तुला त्रैलोक्याचं ज्ञान होईल व मीच एक धन्य आहें असा अभिमान जागृत राहील. ऐषआराम प्राप्त करून देणारी संपत्ती कृपादृष्टीनें तुजकडे पाहील व तुझ्या मनांतील सर्व दुर्विचाराचा क्षय होईल. बोल कबूल ?

सन्माः—अरे पण पहिल्यानं तूं कोण आहेस हें मला सांग.

भूतः—मी कुणीही असलों तरीं तुला त्याबद्दल चौकशी नको. तुला आपलं कल्याण करून घेणं असेल तर मला सांग !

सन्माः—(स्वगत) पाण्यावांचून घसा कोरडा पडला आहे त्याचा विचार कांहीं न सांगतां हा विचित्र व भयंकर

वेषधारी पिशाच्च आपलं कल्याण करून घे ह्मणतो असं त्याच्या हातीं काय आहे ?

भूतः— याच्या हातीं काय आहे ? असं ह्मणून भ्रमांत पडला आहेस काय ? अरे वेड्या, तुला जर तृषा लागली आहे तर तिचं निवारण मजपाशीं आहे तें हें, पहा प्रत्यक्ष तुला दाखवितों. (मद्याची कुपी त्यास दाखवितो.)

सन्माः— या तुझ्या हातांतील पात्राला काय ह्मणतात ? याचं नांव काय ?

भूतः— याचं नांव प्रभाव, चमत्कार व थोरपणा, तुला सांगतों ऐक —

चाल— कोई देखाजि यारों मेरा सनम्.

ही सुधाच लोकीं महागुणी ॥ धृ० ॥ सुरासुरांतें महोदधीवरी, प्रयास देउनि येत जनीं ॥ ॥ ही ॥ द्विजाति होमादिकांति देती, सुरांस सोमरसा यजुनी ॥ ही ॥ जया रसाचे कुलींच हा रस, निघोनि हो जन सौख्यवनीं ॥ ही ॥

या रसास काचपात्रच योग्य. घे. पी. जगांत धन्यहो.

सन्माः— (स्वगत याच्या , या सांगण्या वरून याच्या हातांत हें मद्य आहे यांत अगदीं संशय नाही. आजपर्यंत मद्य प्राशन न करतां जों मी पवित्र राहिलों आहे तो या वेळीं तृषार्त झालों ह्मणून अपवित्र मद्य प्राशन करूं कीं काय ? छे छे, असें तर मजकडून प्राणांती हीन घडो. याचं सांगणं जरी अन्य प्रकारचं आहे तरी—

चाल- छी छी हे प्रभाव सर्व.

ी छी हें सुराच निंद्य येत कळोनी ॥ व्यर्थ
ोण हें पिऊनि अशुचि बने प्राणी ॥ छी ॥
ाहोनी अमल जनीं आजही कृती ॥ मरण
ारी प्राप्त तरी नकरि ही स्थिती ॥ भोगितां
खंति असुख हळ हळ भयदानी ॥ छी ॥१॥

भूतः—कितीरे तूं वेडा आहेस ! आधीं ही सुरा आहे
सं जें मानतोस तें खोटं आहे. पूर्वीचे मोठेमोठे ऋषी जे
ोमरस पिण्यासाठीं मोठमोठे यज्ञ करीत असत ते काय वेडे
ते ? त्या सोमरसासारखाच माझ्याजवळ असलेला तृषाहारक
आनंदवर्धक हा रस आहे. तूं दुर्दैवी आहेस ह्मणून असल्या
लभलत्या कल्पना काढीत बसला आहेस. नसेल तुझ्या
वीं तर नको पिऊं माझा कांहीं त्यांत तोटा नाहीं. मर,
हान लागली ह्मणून बैस पाहिजे तर रडत. (एकीकडे)
ातां असं कामार्थ नाहीं. क्षणभर गुप्त होऊन रहावं. आणि
चांगला तृषार्त होऊन तळमळूं लागला ह्मणजे परत
ऊन भेटावं आणि पुनः खटपट करावी. (जातो.)

सन्मा:—अरे, गेलं वाटतं तें पिशाच्च. बरं झालं. आतां
ाशमनार्थ काय उपाय करावा ? (इ. ति. फि.) सूर्याचा
पही आज दुप्पट होतो असं वाटतं. तृषेमुळं प्राण व्या-
ळ होत आहेत. देवा, सर्वसंग परित्याग करून एकांत-
स करण्यासाठीं इथं आलों, पण त्रास कांहीं चुकत नाहीं.
ं येतांच तुझ्या दर्शनाची इच्छा करून तूं नाहींतर पिशाच्च
ी भेटो असं सहज बोललों तों पिशाच्च प्रगट झालं आणि
ाश ... ळतंच कांहीं पेय दाखवूं लागलं यावरून

आजचा हा दिवस कांहीं चांगला उदयास आला नाहीं अ
ह्मणावं लागतं. (तृषेनें व्या. हो.) शिव ! शिव ! शिव
आतां मात्र प्राणांतसमय सन्निध आला खरा. (बसतो
या कडक उन्हांतून फिरण्याचीही सोय नाहीं. जमी
तरी किती तापली आहे पहा. देवा, तुझा मी कोणता अप
राध केला होता ह्मणून तूं मला प्रसंगात पाडलंस ? हाय
हाय ! आतां मात्र धीर धरवत नाहीं. चलनवलनही करव
नाहीं. अगदीं प्राणांतसमय आला खरा. पाणी ! पाणी !

भूतः—(पुढें येऊन) घे वारुणी वारुणी, छानदा
जुनी बहुगुणी दडपणी झडपणी मानी छानी शहाणी अश
ही वस्तु बारान्बारा चोवीस वर्षे तप करीत बसला अस
तास तरी मिळाली नसती. पण यावेळेस मी होऊन तुझ्या
वर खुष झालों आहें ह्मणून देतों. वेडा न होतां घे आणि
तृषा निवारण झाल्यानंतर तुझ्या मनाला काय वाटे
तें मला सांग.

सन्माः—काय तूं गेला होतास तो पुनः आलास ?

भूतः—अलबत तूं जेव्हां तळमळून हळहळून मुळू मु
रडूं लागलास तेव्हां तुला सुखी करावं अशी योजना करू
आलों आहें तर घे पी. (कुपी उघडतो) पहा कसा सुवा
सिक, सुरसिक व तृषाहारक रस आहे तो ! व्यर्थ अनमा
करून पुढच्या अलभ्य लाभास मुकूं नको.

सन्माः—तृषा लागल्यामुळं व्याकुळ झालों आहें हें ख
आहे तरी तूं जें पेय दाखवितोस तें अपवित्र असेल (पण
माझ्या मनोदेवतेला संशय येतो.

भूतः—तुझी ती मनोदेवता दरिद्र दर्शं

मिष्ट झाली आहे व भलभलते संशय घेण्यास संवकली
हे. तिचं तूं ऐकूं नकोस.

सन्माः—तिचं ऐकूं नको तर काय भ्रष्ट होऊं ?

भूतः—भ्रष्ट काय ह्मणून ? श्रेष्ठ हो आणि इष्टकामपूर्तीनं
तुष्ट राहून सर्व लोकांत मिष्टरुची असं नांव मिळवून मोठं
व पहा.

सन्माः— चाल— ले पापी तूं अबजा.

०— न मन मम राजी हो भीति धरी ॥
पाप प्रकार सार दे न करी ॥ ध्रु० ॥
ूत— चपल तव मन तूं संत परी ॥
फुकट बेञ्या शून्याकार अंतवरी ॥
०— रामराय,
ूत— चूपचूप,
०— दावि पाय,
ूत— चूपचूप,
०— कथिती हा सुजन उपाय ॥
ूत— चूप चूप चूप ॥
ूत— घे हें पी,
०— छीत छीत,
ूत— गोड पी,
०— छीत छीत,
ूत— नशीबाचा उदयकरी ॥
०— छीत छीत छीत ॥ १ ॥

ः—अरे बेञ्या तर काय अरण्यांत तूं प्राण सोड-
री भेट बारे अशा वेडेपणांत शिरून सोन्यासारखा जन्म

फुकट घालवूं नको. तूं जे मनांत आणून संशयांत पडल
आहेस तसा कांहीं प्रकार यांत नाहीं. एक वेळ हा रस चाखून
याची रुची तर पहा. मग जर तुला वाईट आहे असं वाटल
असेल तर अधिक पिऊं नको. त्याबद्दल मग मी आग्रह
करणार नाहीं.

सन्मा०—असं आहे तर पहिल्यानं तरी कां आग्रह
करीत आहेस ?

भूत:—तूं लांबून चालून आलास, त्रासलेला आहेस
तळमळूं लागलास, त्या कारणानं मला तुझी दया आली
कोणावर झाला तरी उपकार करावा असा आमच्या जातीचा
धर्म आहे.

सन्मा:—याचं बोलणं ऐकलं आणि सांप्रतचा प्रसंग
कसा आहे हें मनांत आणलं ह्मणजे हा सांगतो तें ऐकावं
आणि जें पेय देत आहे तें पिऊन पहावं असं मनांत येतं
आणि त्यासंबंधानं जास्त खोल विचार केला ह्मणजे हें खचित
पापकर्म आहे अशी खात्री होऊं लागते.

भूत:—कपाळाची करून घे मग पाहिजे तर खात्री
वेडा मनुष्य. घे फार शहाणपणा करूं नकोस. पी. (कुं
देऊन) हं लाव आतां तोंडाला. आणि जन्मास आल्याचं
सार्थक करून घे.

सन्मा:—यावेळेस मला जर पाणी मिळालं असतं तर
हें कधीं न पाहिलेलं पेय प्राशन केलं नसतं. काय करावं
निरुपाय आहे.

भूत:—उपाय कसला शोधतोस ? आणि विचार कसला
करतोस ? पी पी. वेडा होऊं नको.

सन्मा:—पिऊं हें आतां ? ही दारु नव्हे ना ?

भूत:—नव्हे नव्हे पी. किती सांगावं तुलं.

सन्मा:—ठीक आहे.तर (कुपी तोंडाला लावून मोकळी
ावर) हें घे आपलं पात्र. (शब्द ओढून काढल्या-
खे बोलतो व डोकें धरून थुंकतो.)

भूत:—अरे बापरे, हा तर पक्का दारुबाज. सबंध बाटली
ून मोकळा झाला. (उड्या मारीत) झालं झालं झालं
ं काम झालं.

सन्मा:—काय हा मला दारुबाज ह्मणतो. (वि. क.)
काय मी ही दारु प्यालों. (छाकट्याप्रमाणं त्याच्या अंगा-
जाऊन) कायरे तूं मला फसवलंस ?

भूत:—(त्यास चुकवून) आतां मात्र रंग आहे खरा.
असो. आतां याला स्थीर करून चांगली समज द्यावी
णि खरोखर सुखोपभोगाचा लाभ होईल असं करावं.
वळ जाऊन) सन्मार्गसिंहा, कसं काय बोल ! आतां
ांगला शुद्धिवर आहेसका ?

सन्मा:—आहें–आहें मी हुश्यार खूप हुश्यार आहें. पण
कोण आहेस खरं सांग ?

भूत:—अरे मी एक भूत आहें. आजपर्यंत जरी तूं माझ्या
धीन नव्हतास तरी आज झालास. आतां तुला मी जसं
ातों तसं ऐकलं पाहिजे. मी तुझं कल्याण करीन.

सन्मा:—माझं कल्याण करशील ? मला संपत्ती देशील ?

भूत:—अरे भितोस कां ? तुला मी राजा करीन. चल
्या बरोबर.

सन्मा:—तूं मला कुणीकडे घेऊन जाणार ?

भूतः—तुला काय त्याचं. चल ह्मणजे झालं.

चाल— क्यांडची.

स०— येतों येतों होतों नरवर ॥
भूत— ऐसें कैसें करितों नृपवर ॥
स०— होतां ऐसें सुख बहु या ॥
भूत— चल तर झडकर गा गा या या ॥ धृ०
स०— होतों सदनीं त्रासानें बहु पीडित
होतें असुखच या ॥
भूत— सोड नको तो पथ पहिला, प्रियकर
हितकर जाणे या ॥
स०— होतां सुख नव आभारच तव मानुं
अभिनव लाभाया ॥
भूत— नाहीं अवघड या घ्याया, पाहें अनुभव
सांगाया ॥
स०— बडबड अवघड नच हें या, ठावें सम
जुनि दावीया ॥
भूत— बघ चल मम बल, अचपल छल बल
जन खलचि सकल ठावें या ।

(जातात.)

प्रवेश ५ वा. रस्ता. तारा व बलसिंह.

(प्रवेश करितात.)

चाल— कोई सुनो मेरी फिर्याद

तारा—नयनिंचें जिरे पाणी ॥ जनकानें त्यजिलें
माय जाय मरुनी ॥ हाय हाय हाय ॥ धृ०
बल—काय जहालें, काय सांगगे, ताई तूं रडसी

तात जात परि, मातेचाही, शोध न तूं कथिसी॥
भय वाटे चलगे, माय पाहूं फिरुनी॥ या-रा-नीं॥१
तारा— काय करावें, कोठे जावें; दुर्बळ आह्मी बाळ॥ रक्षक कोणी नसे प्रभो तूं करीं स्वयें प्रतिपाळ ॥ हतदैवी ठरलों यास्तव ही हानी॥ हाय हाय हाय हाय!!॥ २॥

बल:—ताई पुरेग किती रडशील ? पण मला सांग आपली आई आपल्याला सोडून कुणीकडे गेली.

तारा:—(स्वगत) हाय हाय, आतां या अज्ञान बालकाला काय सांगावं आणि याची समजूत मी अज्ञानं पोरीनें कशी करावी? (उघड) बाळा, आपली आई कीं नाहीं देवाच्या घरीं गेली. ती कांहीं आतां लौकर येणार नाहीं.

बल:—ती येणार नाहीं लौकर? (रडतो) अं अं अं (तिचा हात धरून) चल आईला शोधायाला, ऊठ चल, आपण तिला आपल्या घरीं आणूं.

तारा:—(शोकानं) हर हर देवा, कसंरे आमचं आतां पालन होईल. या माझ्या भावाला तर अजून मुळींच ज्ञान नाहीं. आणि मला थोडंसं कळतं त्याचा कांहीं उपयोग नाहीं. बाळा तुला आतां काय सांगूं:—

चाल — सुलभ सबेरे, चलजा.

तारा— नशिब फिरलें, जग अवघड सुंदर बाळा। प्रतिपालक उरला नाहीं ॥ मायेचा बाप न आई ॥ नमित जा सकलां ॥ जग अवघड ॥ धृ० ॥

बल—(श्लोक) नमन करुनि भावें ईश्वराला स्तवावें ॥ हरिल सकल चिंता मानसीं हें रहावें॥ अकपट करणीला साह्य त्याचेंच घ्यावें ॥ मुनिवर मननांतीं बोलती हें स्वभावें ॥

तारा— जग वेदांतास न जाणे ॥ लोभानें देणें घेणें ॥ सुसंगत विरळा ॥ जग अवघड ॥ १ ॥

बल:— असलं जग अवघड आहे तर आपण त्याच्याशीं संबंध न ठेवतां रानांत जाऊन राहावं किंवा आपल्याला कुणी ओळखत नाहीं तिकडे जाऊन रहावें ह्मणजे आपण लहान आहों हें पाहून कुणीतरी आपल्यावर दया करतील.

तारा:—खरंचरे बाळा. बाबांच्या तोंडचीं कित्येक वचनें तुझ्या ध्यानांत राहिलीं आहेत तीं तूं बोलतोस. जिथं आपलं तात व माता आपणांस नाहींशीं झालीं तिथं राहिल्यानें सुख होईलच असं मानतां येत नाहीं. चल आपण दुसरा एकादा चांगलासा गांव पाहूं. त्या गांवांत कोणी आपणांवर दया करतील, तर आनंदानं राहूं..

बल:—चल तर, नकोच आपल्याला हा गांव. पण ताई, आपली अई आतां केव्हां भेटेल बरं ?

तारा:—बाळा, आतां आपली आई आपल्याला कधीं भेटणार नाहीं बरं.

बल:—आई भेटणार नाहीं ह्मणून सांगतेस तर मग रडूं नको तर काय करूं ?

तारा:—आतां तूं कितीही रडलास तरी ती भेटणार नाहीं तुला, समजलास ?

बल:—कां बरं ? मी लहान आहें ? माझ्यावर तिची माया नाहीं वाटतें ?

तारा:—तिची तुझ्यावर माया होती पण तिचा कांहीं उपाय नाहीं समजलास ?

बल:—पण तिच्यासाठीं माझ्यानें रडल्याशिवाय रहावत नाहीं.

तारा:— उगी बाळा ! असं काय बरं ? तूं येतोसना ? या ठिकाणाहून आपण जाऊं.

बल:—होय ताई, चल आपण आईला शोधायला जाऊं.

तारा:—बरं तसंच कां होईना ? चल, देवा ! आतां सन्मार्ग दाखवून दयाशील गृहस्थाची कृपा होईल असं कर—

चाल— कोई हाल सुनें ताके.

प्रभुवरा करी सुदया ॥ दावी मार्ग बरा ॥ धृ०॥ अनाथ अज्ञानी शिशुजात ॥ त्राता कोणि नसे जगतांत ॥ यास्तव सोडुनियां हा प्रांत ॥ जाऊं वनांत सुख व्हाया ॥ १ ॥ भेटवि पालक जो सच्छील ॥ सत्पथ ममतेनें दावील ॥ इच्छित आनंदें पुरवील ॥ सहृजो दार हृदयाचा ॥ २ ॥

(जातात)

प्रवेश ६ वा. जंगल. (कांहीं रामोशी डोकीवर ओझीं घेऊन येतात.)

सर्व:— लावणी

नशिबवान बलवान चतुरही कुलि रामोशाची—चतुरही ० ॥ भाला बंदुक अचुक मारती वापरती बरची ॥ १ ॥ कडक नेम जमुनियां शिकारी वरी स्वारी तयांची ॥शि०॥ जातां काळ

न सुरत पाहि ती स्वारि हरा घरची ॥ २ ॥ चमकदार तलवार चमकतां दरबारि जनांची ॥ चमक० ॥ होती गाळण पळून जातसे आस धनावरची ॥ ३ ॥ करुन काम धन दाम मिळवितां कडि लागत वरची ॥ मिळवि० ॥ ऐका भंग न मरद गांजवी नांव झराझरची ॥ ४ ॥

१ ला:— हरबा नाईक, वझं डोक्यावर घेऊन चालतानां तर राव कट्टाळा आलाया पघा. आन् ह्या, दुपारचा वक्त आहे त्यानं तानबी लागलीया.

नाईक:—मर्दहो, जरासी कड सोसा. रातीपून शिकार घेरून मारून आन वझी उचलून चालावं लागल्यापाई समद जवान थकल्या ह्येतर खरंच आहे पन ह्यो झराबी आतां जवळ आलाया. चला तर झरारा पाय उचलून ततं ग्येलोकीं इसावाच हाय पघा.

२ रा:—भुकाबी लागल्याती आन ह्मणं झरारा पाय उचला तर ते कसं व्हावं ?

३ रा:—न व्हावं तर काय लेंका रानांत बसतोयास व्हय. असा भागुबाईवानी काय करतुयास ? चल जरा मर्दावानी.

नाईक:—गड्येहो, बोलत उभं न्हाल तर ह्यो सुर्वेनारायण अक्षी तापतोयाच. तर पावलं उचला. आतां त्ये ठिकानबी नजीक है. ह्ये तें झाड, हिंग या झाडापून डाव्या बाजूकडं ग्येलं कीं तीन ईसा कदमावर त्यो झरा आन् वडाच झाड हैच पघा.

सर्व:—ठीक आहे तर चला तुह्मी संमद्याच्या झोर ?

नाई:—-ह्यो चाललो पघा. चला. (झन्याजवळ येतात.)

१ ला:—-ध्या गडे हो प्या पानी. भाकऱ्या बी काढ्न-शेनी खा. अन् मंग बसा तंबाखुच बार भरीत आणि लाव-न्याची गावनं करीत.

२ रा:—अरल्येका ह्ये का सांगाया होवस व्हे ? ज्याचं प्वोट भुका लागल्याती म्हुन सांगल त्यो डोस्क्यानं झन्यांपाशीं चालत जाईल. तूं पघत बस हंजी झालं.

१ ला:—-मलार कां बसवतोयास ? अर मर्दा मला बी भुका लागल्याती.

२ रा:—-भुका लागल्याती तव्हर भू-भू-का बसलयास ?

१ ला:-अरल्येका भू-भू करनारा कुत्रा हैस तू-तू-तू-तू.

२ रा:—-कुत्रा हैस त पळ छू-छू-छू.

नाई:—-कार उगाच बाचाबाची लावलोया ? भाकऱ्या सोडा, पानी प्यां, बाचाबाचीत का है ? आप आपसांत झग-डलात फुकटच्या फाकट शिनून शेनी कायनू न वायनू करीत बसाल तर मशी गांठ है पघा. (भाकरी खात बसतात.)

३ रा:—(ढेकरदेतो.) झालातर गड्येहो गारंगार. या आता गुरगुडी वडा, डफ झडा अन लावन्या ह्मना.

२ रा:—लावन्या ह्मनाया सांगतोस आन् बसलयास कां ? त्यो डफ काढ, तुनतुन आन, ढोलकी काढ्न शेनी फुडें ठिव अन मग सांग लावन्या ह्मनाया.

३ रा:—इतकच. ह्य पघ काढला डफ अन तुनतुन (ढोलकी तुन्. आणतो.) ध्या वाजेवा आन आप बाबांनों,

२ रा:—यार गड्ये हो, या असं फुडं. अन् काढा जुन्य
जुन्यान् नव्या नव्या अक्शी इषकबाजीच्या लावन्या:—

लावणी

चमकली फांकडी नार, जशी कां बिजली—जशी
कां बि०॥ नखऱ्यानें पाऊल टाकि बढाई खाली
जीग् जी जी जी जी जी ॥ १ ॥ मारुनि, नैनां
तुनि, तिराची वळी,—तिराची ओळी ॥ मर्दाला
करि बेभान ती राजस बाळी जीग जी जी ॥ २ ॥
अपसराच ती विंद्राचि, उतरली खालीं उतर-
ली० ॥ करि घाय, करावं काय, चटक लै जड
ली जीग जी जी ॥ ३ ॥ हुरहुरी, धरी मन क-
री, जरी ती आलि जरी ती आ० ॥ नवसाला
पावला देव वासना पुरली जीग जी जी जी०

लावणी

ज्वान बायको म्हाताऱ्याची ॥ आवडती मन-
ची, परि ती रात्रंदिस जाची ॥
वाढविण्याची खटपट त्याची ॥ ढेर खुराकाची,
दावि तिज मायावर घरची ॥
इस्त्रांती मानुन नेत्रांची ॥ रोज दागिन्यांची,
करी भरपाई तिच्या बाची ॥
परी होयती जोडी पराची ॥ खोड वृद्धपणची
जळे मन अविश्वास जाची ॥ १ ॥

नाई:—वाहवा खूप लावन्या गाताया. गडेहो, आज मना
हैच पघा. ...कार गवसलिया जनुतवा तुमची मनं रंगल्याती

१ ला:—ह्ये का पुसाया होव व्हय नाईक. आज समदे डी चैनीत असनारच.

नाई:—ही जी जोड गवसलिया ती त्या चणकाईच्या लान निघालों त्यापायीं ह्ये ध्यानांत असुद्या; नाहींतर इसराल न् गोत्यात याल.

१ ला:—तसं कसं व्हईल? चंडकाईला इसरल्यावर रामो-शाची भरलीच मुद्दत.

तारा:—(प्र. क.) गांव सोडून भावाला घेऊन या नांत आलें पण ऊन फार लागत असल्यामुळें दोघेंही तृषाक्रांत झालों. त्या अर्भकाच्यानं तर पाऊलसुद्धां उचलवत नाहीं म्हणून त्या बिचाऱ्याला एका झाडाखालीं बसवून मी पाण्याचा शोध करीत इथपर्यंत आलें. पण पाण्याचा कांहीं सुगावा अजूनही लागत नाहीं. देवा, आमच्यावर तूं इतका कोप करीत आहेस याचं कारणं काय असावं बरं? (बि. क.) कांहीं असो. मला पाण्याचा शोध केला पाहिजे हें खरं आहे. (रामोशापाशीं) अगबाई, हे कोण लोक ए-कत्र जमून बसले आहेत? यांच्याकडे सहज पाहिलं तरी भय वाटतं आहे. यांचा डोळा चुकवून निघून जाईन म्हटलं, तर तेंही आतां साधेलसं वाटत नाहीं. ज्यापेक्षां हे या वडाच्या सावलींत बसले आहेत त्यापेक्षां आसपास कुठं तरी पाणी आहे यांत संशय नाहीं. त्यांच्या जवळ विचारल्यावाचून गत्यंतर नाहीं. असं आहे तर जावं नि विचारावं, मग काय होणार असेल तें होवो:— (रामोशास) बाबांनों,

या रानांत जर कुठं पाण्याचं ठिकाण तुह्मांस माहीत अस तर कृपा करून मला सांगा. उन्हांतून फिरत आल्याकारण मला फार तहान लागली आहे. पाणी दाखवाल तर माझ्या फार उपकार होतील. (रामोशी एकमेकाकडे पहातात.) बाबां असं एकमेकांकडे काय पाहतां ! मला पाणी सांगताना !

नाईः—तुला पाणी प्यायचं हाय, तान लागलीया ?

ताराः—होय, तहान लागली आहे ह्मणून पाणी यायचं आहे, दाखवाल तर बरं होईल ?

नाईः—(झरा दाखवून) त्येबघ त्या झऱ्यावर जा म पानी गवसल.

ताराः— ठीक आहे. (जाऊं लागते)

नाईः— कसरे गड्येहो, ही बी येक शिकारच है ब लई तरास कराया नग. येका गड्यानं जावं आन तिला रून आनाव. कोन जानार ?

२ राः— तुमी संमद गडी बसुनशेनी म्मत पघा. मी एकलाच जातों अन् तिला धरून आन पघा. त्यामंदी काय है.

१ लाः— त्यो एकलाच कां म्हून तिच्यापाशीं जाना मींबी जाईन.

३ रा;—आन् दोन गडी ग्येल्यावर म्या तिसऱ्यानं त कां ऱ्हावं ?

नाईः— ती बायकु दिसती फटाकडी. ती चला आ बी जाऊनशेनी का है ते पघावं. (सर्व तिच्या जवळ जमता

पद—चाल — सुनोसदा येह बारी.

तारा— अधम हे तुफानी रानीं ॥ मज संकट
भासोनी ॥ करूं कसें उभे वेढोनी, भय अं-
भारी मानी ॥ जल मिळे परी ही हानी ॥
भ पंथ न येत दिसोनी ॥ चाल ॥
१ ला— तूं कोण कुणाची पोरी ॥
२ रा—-हुडकशी काय दोनूपारीं ॥
३ रा—तुज नांव मला सांग नारीं ॥
राः-अति दुर्बळ आह्मी बाळ ॥ फिरे बहु
ळ ॥ न हो सांभाळ ॥ जनीं राहोनी ॥ वनवास
ाळीं ह्मणुनी ॥ भयभीत तुह्मां पाहोनी ॥
कसिंहाची मी भगिनी ॥ १ ॥

नाईः— (सर्वास) चलारे गड्ये हो मागं. तिच्यापाशीं
ासनी घ्येन्या जोग काईबि न्हाई. असं तिच्या बोलन्यावरून
सतया. न्हाई तर न्हाई. गड्येहो हीही कारभारीन बरी है.
ी आमच्या मंदी आतां गडबड करूं नको. मी तिला बायकु
तु बघा. कांग ? पघतियास कां या पठ्यकड जरा. पघ
ये अशी (धरूं लागतो.)

ताराः— (झिडकारून)

पद—चाल— दूर दूर ओनारी नाकारी

तारा— दूर दूर, परम अधम विषम उगम,
र दूर ॥ दूर ॥ ध्रु० ॥ न वद पातकी शब्द हे
से ॥ वर वरावया योग्य ही नसे ॥ चाल ॥

नाईक— नशिब समज, धरून गरज, नमि-तसे तुज हा मलंग ॥ हात धरी ॥ काम करी ॥ सबल नायकाची नारि मार जोर ॥ १ ॥

२ रा:—ऐकताका राव. ही न्हाई तुमास्नी राजी. बरं हिला लुटुनशोनी काई घ्येवं तर त्येबी काई न्हाई तवां सांगतो अशी तोड करा मंजी जरासा तरी फायदा व्हईलच व्हईल. वंगाळवाणी गडबड कराल तर काई न्हाई.

नाई:—कायरं सांगतुयास ?

२ रा:—राव हिला अशीच धरून घेऊन चला आनं कुनालाबी इका, मंजी पैकाच पैका ढेर पडुनशान जाईल. आन फायदा बी व्हईल.

१ ला:—वाहवा वाहवा, तोड तर लई पसंत निघालिया, पघा गड्ये हो. आतां इकत घ्याया गिराईक मातुर आल पाईजे. (कुंटिण व भय्या प्र. क.)

कुंटि:—भय्याजी, एखादी तरी मनासारखी पोरगी सापडेल व हातीं लागेल ह्मणून आपण किती दिवस तरी फिरतों आहों पण अजून काम होत नाहीं. काय बरं करावं ? फिरायचा तर कंटाळा आला आहे मनाला.

पर:—अरे बाई साहेब, ऐसा सोच कायकू कर रहेहो ? वक्त आवेगा तब झट हातमे आवेगी. जरा सहल तो करो दुनियाकी.

कुंटि:—आग लावा तुमच्या त्या सहलिला ? मला हें फिरणं नकोसं झालं आहे. तुह्माला काय त्याचं कांहींच नाहीं.

परः—फिरते फिरते थक गये हो तो कही दोचार दिन
ाम करो. क्या हरकत है ? फेर चलो आगे.

कुंटिः—काय हो इथं पाणी तरी आहे कां जवळ कोठें ?

परः— पानी बी इस जंगलमे नजदीक है. चलो.
ामोशापाशीं) वो कोई आदमी पानीके आसरेसेही खडे हो
है, वहा जातेही पानी मिलेगा ?

कुंटिः—असं आहे तर चला. त्या पाण्याजवळ लोक आ-
तेंही ठीकच आहे.

परः— (रामोशास) रामराम हे भया रामराम.

सर्वः—रामराम दादा रामराम या, अस या.

परः— अरे हमतो आयेहो. है लेकीन तुम कोन हो.

नाइः— आमी व्हय ! हावो असंच शेतकी करनार
ब ! पन तुह्मासंग दुसरं कोन है.

परः—हमारे साथ तो बहोत आदमीका जमाव है ले-
न तुमारे पास जो यह लडकी खडी है सो कौन है. कि-
ी है ? कहो तो ?

नाइः—ही पोरगी व्हय ? हाय आमातलीच.

३ राः—अरं सांग की लेंका इकायची है असं.

परः—क्या कहते हो. इस लडकीकु बेचते हो, सच
ो हम लेंगे.

३ राः—तुम लेवेंगे तो आमी बी देवेंगे. घ्येयाला तर ये.
ठीला है का काई.

परः—अरे क्या कमती हैं ? अबी लेनेकी तजबीज करते है. जरा खडे रहो. (कुंटिणीस) सुनते हो बाईसाहेब, आपना काम इस जंगलमेही होनेका मोका आया है.

कुंः—भय्याजी, काय आहे हो ? ते लोक काय त्या पोरीला विकताहेत ? खरोखरीच विकीत असतील तर काय किंमत घेणार ते विचारा. पोरगी नाका डोळ्यानं चांगली आहे.

परः—वे बेचेंगे सच और वह अपनेकु मिलेंगी यह बी सच तुम जरा ठैरो. हम अब सब बातका खुलासा करके आते है. (त्यास) कहोरे भाई, इस लडकी क्या मोल लेते हो. बोलो. लेकिन पहिले तुमारे मे सबका उपरी कौन है सो कहो, उस्ने हमारे बाईसाहेबके पास आकर सब कौलकरार कर देना.

२ राः–(नाईकास) चला व्हापुढं आन सांगा चांगल पांच हजार रुपये मंजी दगदग मिट्टूनशेनी जाईल.

नाईः—कायव तुमास्नी या पोरीची गरज है न्हव !

परः—गरज है इस्के वास्ते तो पुछते हैना ? चलो तुम चलो, बाईके पास और कहो अपना इरादा क्या हैसो.

कुंटिः—(रामोशास) तुह्मीं त्या पोरीला विकणार ! मग बोला काय किंमत घेणार ती ? असं संकोच धरून कां उभे राहतां ? बोला.

नाईः—ही पोरगी जर तुमास्नी घेयाची असली तर बराबर प्रांच हजार रुपये पडत्याल, पघा पत्करतया?

परः—अरे बापरे ! क्या जुलूमकी बात ? अरे भाई कुच धरमसे तो बोलो.

नाइः—समदा धरम मला समजतोया. त्यांत कमती न्हाई व्हनार. व्होवी तर घ्या.

कुंटीः—(परदेशास) महाराज त्यानां ह्मणावं, पोरगी अजून लहान व नवशिकी आहे, तर पहिल्यानं कांही दिवस आह्मांला फायदा होणार नाहीं; सगळा खर्च अंगावर चालवावा लागेल हें मनांत आणून किंमत सांगतानां कांहीं विचार करा.

परः—नही बाईसाहेब, वह सब जंगली लोक मालुम होते हैं. उनका हट छुटनेका नही. भारी किंमत होगी तो मत लो.

कुंटीः—न घेऊन कसं करावं आणखी किती दिवस फिरत रहावं. चला ह्मणावं त्यांनां गांवांत सावकाराकडे आणि घ्या आपली रकम मोजून.

परः—बहोत अच्छा (रामो०) सुनारे भाई चलो इस लडकीकू लेके हमारे साथ नजदीकके गामने आपना ऐवज गिनलो.

नाइः—(रामो०) कसंरे गड्यहो चलायचं गांवांत !

३ राः—चला काय हरकत है.

परः—(कुंट०) ओ लोक आपने साथ आते है चलो कामहुवा.

रामोः—(तारेस) चलग आमच्या संग गांवांत न्हाई व्हव करशील अन कायनून बायनू जर रडगानं गात बसलीस तर रद्दच खाशील.

ताराः—

चाल— अरे मुवे छोड मोरी.

कसें फिरे दैव पहा अंतरे सुबंधु तो ॥ ध्रु० नाटातुटी होय ऐशा प्रसंगीं ॥ एकटा बाळ वनी राहिला अनाथ तो ॥ १ ॥ पावे प्रभो त्यास रक्षी स्वयें तूं ! । प्रार्थना मान्य करी हेतु नसे अन्य तो ॥ २ ॥

(जाते.)

बळः— (प्रवेश करून)

चाल—नृपाल कोप शांतवीन

जाय जी बहीण ती नये कशी ॥ ध्रु० ॥ शोधुनि वन भागत मन, सांपडे न कां ॥ त्रास हो देवा हा पडे कशीं ॥ १ ॥ तात पळत, माय मरत, सांडली स्वसा ॥ एकला पाहें ताप दिनानिशीं ॥

पहिला अंक समाप्त.

अंक २ रा.

प्रवेश १ ला.

(तदनंतर भूपस्मरणानें शोक करीत आलेला कंचुकी येतो.)

कंचुकी—(बाहेर येत असतां पूर्ण शोकानें)

पद—जाते कीं मम शकुंतला, ही चाल.

गेला गेला त्यजोनि आह्मां तो नरपति गेला ।
दुर्दैवानें नेला अवचित घालुनियां घाला ॥
प्रजापाल तो पाळी प्रेमें स्वसुतां सम सकलां ।
लोभ अपार न उणें पडों दे रंजक गुण वहिला ॥
अवचित येतां मरण तयाचा चटका हृदयाला ।
लागुनि जळतें आतां सांगूं हें मी कोणाला ॥
कोप कसा त्वां केला देवा पूर्ण दैन्य विकला ।
आली त्याविण या देशाला शोक मनीं भरला ॥

हर हर हर! भगवंता, तो पूर्ण न्यायी आणि प्रजावत्सल होता ह्मणूनच तुला आवडला काय? होय, हेंच खरें. पण त्याच्या वियोगानें आमच्या सारखे त्याचे आश्रित शोक करीत बसतील, हें तुला कसें कळलें नाहीं? त्याला न नेतां आमच्यांतील कोणास घेऊन जातास तर तुला काय कठीण पडत होतें? (कांहीं थांबून व

विचार करीत इकडे तिकडे फिरून) कसा चमत्का आहे पहा; मरणकाल संन्निध आला ह्मणायाला त्याच वृद्धापकाळ झाला होता असेंही नाहीं. मग त्याचें आयुष्य कमी न करितां आमच्यासारख्या दरिद्र्याच्या आयुर्मानांत उणीव झाली असती, तर काय चंद्र सूर्यास खळें पडणार होतें ? दहांचें रक्षण करणारा नाहींसा झाल्यापेक्षां दहाही जरी नाहींसे झाले असते तरी कांहीं कमी पडलें नसतें. त्यांच्या ठिकाणीं दुसरे तयार झालेच असतें. एक तो गेल्यामुळें ही कनकावती नगरी शोकाक्रांत झाली आहे. (कांहीं थांबून) आमचे महाराज किती सुविचारी होते पहा; आपल्या पाठीमागें राज्यास कोणी योग्य वारस नाहीं; त्यामुळें प्रजाजन आपसांत कलहांत पडतील; एकमेकांत रक्तपात करून घेतील; तर तसें न व्हावें ह्मणून त्यांनींच आपल्या मागें राज्यावर कोणास बसवावें ? या प्रश्नाचा निर्विवाद निकाल करून ठेवला होता. त्याप्रमाणें राज्यांतील चार शिष्ट महाजन व प्रधान इत्यादिकांनीं राज्यकर्ता शोधून काढला आहे व त्याला सिंहासनावरही बसविलें आहे. (कांहीं थांबून) असा जर प्रकार झालेला आहे; तर आतां आह्मी हा शोक कोणासाठीं करावा ? (पुनः कांहीं थांबून) आपल्या साठीं. एक पुरातन वृद्धोक्ति आहे कीं, हजार इंद्र होऊन गेले तरी इंद्राणी एकच !

तशांतलाच हा प्रकार आहे. आमच्यावर खरोखर दया करणारे महाराज गेले, त्यांच्या जागीं दुसऱ्यांची स्थापना झाली. तरी आह्मीं कंचुकी बनून राहिलों आहों ते कायमच. आमच्यासाठीं ह्मणायाला हें मात्र पाहणें राहिलें आहे खरें—कीं आतां हे आमच्यासारख्यावर दया करितात कीं आपल्याच झोकांत राहतात. (पुनः कांहीं थांबून इकडे तिकडे फिरून) कसाही प्रकार झाला तरी आपण साधारणपणें सार्वजनिक हितावर दृष्टि ठेऊन भगवंताची प्रार्थना करावी कीं—

पद—अर्जुन तर सन्यासी होउनि, या चालीवर.

दीन सुजन ते प्रेमें राखुनि वागो नीति बलें ।
प्रजा हितावरी ठेवो मानस समतेनें वहिलें ॥
पूर्वापर कार्यें न विघडवो आहे जें पहिलें ।
तें राखोनी सुकीर्तिवर्धन करो अपात्र छलें ॥
चाल—॥ हें होतां मानस तोषाप्रत पावलें ।
जें इच्छितसों तें सहजपणें गावलें ॥
मानूं कीं तेतिसकोटि देव पावले ॥ चाल ॥
नूतन नरवर कीर्ति भरांभर वाढवुनी सगळे ।
सेवक तोषित ठेविल तरि मन शांतगुणें रिझलें ॥ १ ॥

असो. महाराजांचें प्राणोत्क्रमण होण्याचे आधीं जी रात्र गेली, त्या रात्रीं महाराजांस दृष्टांत झाला कीं, तुझ्यामागें गादीवर बसविण्यास योग्य असा पुरुष

एक सन्मार्गसिंह या नांवाचा, प्रातःकालीं सर्वांच्या आधीं नगर प्रवेश करील. त्याच्या मार्ग प्रतीक्षेस्तव आपल्या प्रधानादिकांस आज्ञा करून ठेव आणि मग ब्रह्मानंदीं लीन हो. त्याप्रमाणें महाराजांनीं सांगून ठेवलें होतें व प्रधानादिक सर्व त्याची मार्गप्रतीक्षा करीतच बसले होते. ह्मणून तो दृष्टीस पडतांच सर्वांनीं त्याला आणून राज्यासनावर स्थापन केलें. आतां तो सन्मार्गसिंह आहे ह्मणून त्या मार्गानें चालण्यांत आपली एक निष्ठा दाखवितो किंवा सन्मार्गी लागणारांस सिंहाप्रमाणें भय दाखवितो तें पाहणें राहिलें आहे. तें पाहण्यासाठीं आतां राजसदनींच जावें ह्मणजे कायतें सहज समजून येईल. (असें बोलून जातां जातां)

साकी.

सन्मार्गें सिंहापरि जाउनि वागतसे न्यायानें ।
कीं सन्मार्गीं भयवर्धक तो होतो अन्यायानें ॥
दावीं हें आतां ॥ देवा तूं आह्मां त्राता ॥ १ ॥

(असें बोलून निघून जातो.)

प्रवेश २ रा.

(भूत प्रवेश करितें.)

वाहवा रे वा वाहवा, हो पूर्ण माझें काम ॥ कनकावतींत राजा, सन्मार्गसिंह नाम ॥ त्या काय कम, उदरांत रम, सुरा हरीत गम ॥ हा पल्ला इतरां

नये, मज ना भयें, मदिरेचि सवें, जडतांच नवे,
दिसतात दिवे, खात्रींत ये न यम ॥ १ ॥

(निघून जातें.)

प्रवेश ३ रा.

(तदनंतर सन्मार्गसिंह राजवेषानें दरबारांत बसला आहे, प्रधान सेनापति इत्यादिक सर्व मानकरी आनंदानें बसले आहेत तों पडदा उघडतो.)

सन्मार्गसिंह—(आनंदित चित्तानें आत्मगत)

पद—घरजानेदे या चालीवर (राग कानडा.)

मम नशिब थोर नृप बनलों । पराक्रम न परि पूर्व-
कर्मबल भोगवि भोग बदललों ॥ धृ० ॥ ईश
न तुष्टत भूत बलावरी, वैभव मिळतां सजलों ।
मार्ग खरा जग समजत तो दे त्रास, त्यांत बहु
शिणलों ॥ १ ॥

असो आतां स्त्री पुत्रादिकांचा जर शोध लागेल तर कोणतेंही दुःख उरलें नाहीं असें मोठ्या आनंदानें मानायास कांहीं प्रत्यवाय नाहीं. त्यासंबंधानेंही करावी अशी योग्य व्यवस्था करून बसलों आहें.

सर्व दरबारी मंडळी—

पद—ऐकाशगम मेरी कविता हीचाल.

नरपाल वैभवार्थ–भोग भोगुनी सदां । पाळोनियां
प्रजा स्वराज्य आपुलें वदा ॥धृ०॥ तो ईश तुष्ट

जाहल्याविना अशी कदा। सायास करो सांपडे न राज्य-संपदा ॥ न्यायास हात देउनी खलांस आपदा। भोगावयास लावितांच होय जग फिदा ॥ १ ॥

सन्मार्गसिंह—मंत्रिजनहो! तुमच्या इच्छे प्रमाणे वागण्यांत माझ्याकडून अंतर होणार नाहीं; त्याबद्दल सर्वांनीं मिळून मला सूचना केलीच पाहिजे असें नाहीं. कारण—

पद—जात स्त्रियांची कपटी मोठी, ही चाल.

जाणतसें मी व्यवहाराशीं। मान्य जगीं हा तेजोराशी ॥धृ०॥ सुरकार्यार्थीं सुरसें गाती। ज्यास मला तो देत करासी ॥१॥ श्रुतिशास्त्रीं निपुणता असे ती। अनन्विताच्या वारि भरासी ॥ २ ॥ स्वस्थ रहा पाहूनि सुखानें। राजि न होतां अविचारासी ॥ ३ ॥

प्रधान—श्रुति शास्त्र बलाबल पाहून जो भूप राज्य कारभार चालवितो तो अपवादास कारण झाला असें आज पर्यंत कांहीं ऐकिलें नाहीं. आमचें दैव थोर ह्मणून महाजनमान्यनीतीनें प्रजापालन करणारा सर्वमान्य भूपति आह्मांस लाभला.

राजगुरु—मंत्रिजनांच्या संतोषवृत्तीचा लाभ करून घेईल, असा राजा मिळाल्यामुळें सर्वांस आनंद तर

आहेच. पण एकवेळ या सर्व मुत्सद्दी मंडळीच्या मनांत आहे ह्मणून महाराजांनीं आपल्या पूर्वाश्रमसंबंधानें जो कांहीं प्रकार असेल तो कथन करावा.

सन्मार्गसिंह— इतकेंचनां कायतें ? ऐका तरः—

पद—होतो द्वारकाभुवनीं ही चाल.

होतीं बालकें सुगुणीं । भार्याही सदा वशिनी ॥ ईशध्यानीं बसे रमुनो परी असुखी, अधन या जनीं ॥ हो०॥धृ०॥ श्रांतपणें बसतां क्षणभरि । घरकरणिस अवघड बहु परि ॥ वच भडभड बोलत भयकरि, श्रम मन धरि अतिशय शिणूनी॥हो०॥

राजगुरु—वाहवा ! वाहवा ! ! पूर्वाश्रमीं ईश्वरभक्ति केल्याचें फळ राज्यप्राप्ति हें उघडच आहे. बरें आतां तीं आपलीं बालकें आणि आपली पत्नी जेथें असेल तेथून आणविण्यास कांहीं चिंता नाहीं. आपण तीं सर्व मनुष्यें कोणत्या ठिकाणीं आहेत तेवढें मात्र सांगावें.

सन्मार्गसिंह—त्यांचा अमुक एकाच ठिकाणीं शोध लागेल असा नियम नाहीं ह्मणून त्यासंबंधानें सभेंत येण्याच्या आधीं मी साधारण व्यवस्था करून आलों, आहें.

प्रधान—महाराज या राज्यांत पूर्वींच्या राज्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणें दान धर्म आणि देवस्थानांच्या व्यवस्था

चाललेल्या आहेत त्या अव्याहत चालतीलच तरी आतां आपण आपल्या इच्छेप्रमाणें विशेष कांहीं सांगावयासारखें असेल तर सांगावें ह्मणजे त्याप्रमाणें व्यवस्था करूं.

सन्मार्गसिंह—त्याबद्दल यावेळेस कांहीं सांगण्या सारखें नाहीं. मात्र—

साक जोगी.

देवस्थानें दानधर्म जे चालू असतिल ते ते ॥
चालावे त्या खंड नसावा उत्तेजन सकलांतें ।
द्यावें, शुभपंथीं ॥ व्हावें सुखी सर्व संतीं ॥ १ ॥

प्रधान—ठीक आहे. सर्व प्रकार पूर्ववत् चालतील. (याप्रमाणें बोलत बसले आहेत तों द्वारपालाचा शब्द होतो तो ऐकून राजास) महाराज द्वारपाल वारंवार शब्द करीत आहे, आज्ञा असेल तर जाऊन शोध करून येतों.

सन्मार्गसिंह—ठीक आहे. लौकर जा आणि शोध करून या.

प्रधान—(आंत जातो व ताबडतोब बाहेर येऊन राजास) महाराज आपल्या शिकारी वनभूमीचा रक्षक शिपाई अरण्यांत फिरतांना सापडलेलें एक बालक आपणांस दाखविण्यासाठीं घेऊन आला आहे. जर आज्ञा असेल तर त्याला आंत घेऊन येतों.

सन्मार्ग सिंह—आणा त्या बालकांस आंत आणा. मला पाहिलेंच पाहिजे.

प्रधान—(जातो आणि एक शिपाई व बालक बलसिंह यांसह परत येतो.) महाराज, हा तो शिपाई व हा बालक.

सन्मार्गसिंह—(बालकास पाहतांच ओळखून.) आपल्याशीं.

पद—सायंकाळीं नृप, ही चाल.

हा तो माझा सुत वनवासी । फार दमे घे श्रम देहासी ॥धृ०॥ दारिद्र्याचें तेज न ज्याला । रानीं हिंडुनी भारी दमला ॥ दशा खरोखर शिणवी वपुला । परि आतां सुख देतों यासी ॥ १ ॥

असो आपण याला ओळखलें आहे, तरी हा आपल्याला ओळखतो कीं नाहीं हें पहावें. यानें जरी मला न ओळखलें तरी त्यांत त्याचा कांहीं दोष नाहीं. त्यानें आपला बाप दरिद्री, अकिंचन पाहिलेला, त्यानें जर तो एकाएकीं राज्यासनावर जाऊन बसलेला पाहिला, तर त्यास कसें ओळखावें ? असो. आतां आपण त्याला प्रश्न करावे ह्मणजे आपोआप सर्व कळून येतच आहे. (उघड) बालका, तूं कोण आहेस ? तुझें नांव काय ? तुझी आई, बाप, बहीण, भाऊ कोणी आहेत

कीं नाहींत ? आणि असतील तर तीं सर्व कोठें आहेत ? सांग बरें.

बलसिंह—पद–वसंतीं बघुनि मेनकेला, ही चाल.

पित्यानें भजनरंग केला । गाउनि हरिला भवभय-
संकट शकट दूर नेला ॥ परी निर्धनता बहु त्याला ।
संकटिं पाडी त्यांतच आह्मीं मागों अशनाला ॥
'वदे कटु शब्दें स्त्री त्याला । धन न मिळे संसार
कराया ताप बहुत झाला ॥ तदा तो घर सोडुनि
गेला । त्याच्या शोकें माता रडतां पोंचे स्वर्गाला ॥

सन्मार्गसिंह—(ऐकून किंचित् शोक मिश्रित खेदानें) अरेरे ! बाळा, तुझी माता मरण पावली आं ? (कांहीं थांबून) बरें, मग पुढें काय झालें ?

बा० बलसिंह—

पद–पांडु नृपति जनक जया, ही चाल.

हीनाश्रय दोन मुलें ॥ कसें फिरावें नकळे ॥
आश्रय कोठोनि मिळे ॥ अदय जग महा ॥१॥
बहीण मज बोध करी ॥ फिरोंजनीं दीन परी ॥
अंतरली तीही दुरी ॥ दैव छल असा ॥ २ ॥

सन्मार्गसिंह—दैवाचा छळ तर खराच पण बहीणी अंतरली असें ह्मणतोस, तर ती तुला एकट्यालाच सोडून कोणीकडे गेली ?

बा० बलसिंह—ती मोठी मायाळू आहे. ह्मणून

मुद्दाम किंवा कंटाळून मला सोडून गेली असावी, असें कांहीं माझ्यानें ह्मणवत नाहीं. तरी—

दिंडी.

तृषा पीडित मी जाहलों बघून ॥ जाय उदकास्तव बापडी निघून ॥ वनीं चुकली कीं धरुनि नेत कोणी ॥ कळेना मातें होय दीनवाणी ॥ १ ॥

सन्मार्गसिंह—गांव सोडून तुह्मीं वनांत कां आलां होतां ?

बा० बलसिंह—गांवांत आमच्यावर कोणीच दया करीना ह्मणून वनांत आलों. पण त्या दुष्ट वनानें माझी बहीणही मला अंतरविली. (रडतो.)

सन्मार्गसिंह—(गहिंवरून) बाळा, रडूं नको. आतां तुला कधींही दुःख होणार नाहीं; (मायेनें उठून व त्याच्या जवळ जाऊन) वत्सा, ये ये, तूं माझाच पुत्र आहेस (असें बोलून त्यास हृदया जवळ धरतो—आलिंगन देतो आणि सर्व सभाजनांस)

पद–तुज दिलें दुःख मी० ही चाल.

तनय हा दैवहत होता ॥ परि आला माझ्या हाता ॥ उघडलें भाग्य मम आतां ॥ कुलतंतु वाढ घे पुरता ॥ युवराज पदवि या देतां ॥ धन्यता भास हो चित्ता ॥ चाल ॥ न्या याला वेगें

सजवा, प्रेमें रिझवा, पोषाख नवा द्या नृपपोता ॥ सोडवा सर्वही चिंता ॥ तनय हा दैव ह० ॥ १ ॥

प्रधानजी, आपण स्वतः कोशागारांत जा आणि युवराजास शोभेल अशी व्यवस्था करून याला सभेंत घेऊन या.

प्रधान—आज्ञा महाराज. (असें बोलून बलसिंहासह निघून जातो.)

सन्मार्गसिंह—सौख्य होऊं लागलें ह्मणजे एक सारखें अधिकाधिक होऊं लागतें.

भूत—(प्रवेश करून) अरे आपलें आराध्य दैवत सुखावर सुख देतें असें कां ह्मणत नाहींस ? ज्यानें तुला राज्यासनावर बसविलें, त्याला विसरलास काय ?

सन्मार्गसिंह—अरे, तूं येथेंही आहेस काय ?

भूत—आहें तर ? तूं जेथें असशील तेथें मी आहेंच असें समज. कारण कीं तूं माझा भक्त, तुला सोडून कोणीकडे जावें ?

सन्मार्गसिंह—बरें, पण आतां तुझें काय ह्मणणें आहे ?

भूत—तुझा पुत्र येथें येऊन तुला भेटला आहेनां ? त्याला सुख व्हावें अशी जर तुझी इच्छा असेल; तर त्यालाही आपल्या वर्मीत घे आपल्या व्रताची दीक्षा दे. समजलासनां ? तो आला ह्मणजे उपदेश करून त्याजकडन मद्यपान करीव..

सन्मार्गसिंह—अरे पण तें अद्याप कोमल अर्भक आहे. त्याला तुझी ती अति उग्र सुरा कशी पाजावी? सोसली तर पाहिजे.

भूत—त्याला उग्र सुरा कशाला पाजावी? हें घे फिक्कट मद्य, घे आणि हें पाज त्याला.

सन्मार्गसिंह—ठीक आहे. जा तूं. तो बाहेर आला ह्मणजे मी त्याला उपदेश करीन.

(याप्रमाणें बोलत आहेत तों प्रधान बालकास सजवून आणतो. भूत जातें.)

प्रधान—(बालकासह येऊन) महाराज, हा आपला पुत्र, फार गुणवान् आहे. तर आतां याला आनंदानें अंकावर घेऊन या राज्यासनास शोभवावें.

बालक बलसिंह—(बाहेर येतांच पित्यास नमून)

पद–गुरुजि तुमच्या प्रीतीस, ही चाल.

नमित तात पायांसी बाल सदा ॥ धृ० ॥ देव
दयाघन करुणाजलातें ॥ वर्षोनी ने आपदा ॥
नमित० ॥ १ ॥ अंतर अतिशय पडलें होतें ॥
तेज वियोग गदा ॥ नमि० ॥ २ ॥ झालों स-
नाथ अनाथ न यावरी ॥ नाठवि पूर्वपदा ॥
नमित० ॥ ३ ॥

सन्मार्गसिंह—शाबास! आतां पूर्वपद न आठवितां आनंदांत राहशील तरच माझा पुत्र खरा. तुझी

माता जर या प्रसंगीं येऊन मला भेटली असती तर सुखी झाली असती. तुझ्या बहिणीचा शोध लावण्याचा प्रयत्न चालू आहेच. असो. (प्रधानादिकांकडे पाहून) अहोमंत्रिजनहो,—

पद—नाहिं सुभद्रा, ही चाल.

पाहें सुख मी या तनयाच्या लाभें धन्य जनीं ॥
संपत्तीसह संतति मिळतां डोलतसें स्वमनीं ॥ धृ० ॥
भार्या गेली शोक नसे तो आयुष्यच सरलें ॥
कन्या भेटो अन्य न इच्छित आतां मम उरलें ॥
असो न त्याचा पेंच मनाला पानकर्म उरलें ॥
जा मधु आणा करा तयारी पिऊं सर्व मिळुनी ॥
॥ पा० ॥ १ ॥

(असें ऐकतांच दोन सेवक भरलेलीं दोन मद्यपात्रें आणून ठेवतात.)

राजगुरु—महाराज, आतां आह्मांला आपल्या आश्रमीं जाण्याची आज्ञा असावी.

सन्मार्गसिंह—कां बरें ? तुह्मांला नको तर स्वस्थ बसून मौज पाहण्यास काय चिंता आहे ? बसा हो !

राजगुरु—बसतों पण मग आमचें नांव कोणी काढूं नये. कबूल असेल तर बसतों.

सन्मार्गसिंह—अहो बसा, कोणी तुमचें नांव काढीत नाहीं. असें बोलून सर्वांच्या आधीं मद्य पितो व

स्वतः पिऊन एकेक पात्र एकेकाच्या हातांत नेऊन देतो. अब करो साहेब महाराजके नामको सलामती गजर और खूपशराव पिओ. सर्व—(मद्यपात्रें हातांत घेऊन)—

पद—छोरि बामनकी, ही चाल.

मधु मान्य जनीं ॥ सुरा सुरांनीं मंथन करुनी निर्मियली ह्मणुनी ॥ धृ० ॥ देवहि अमृत कडू समजुनी सुरा वांछिती स्वमनीं ॥ दैवशालि नर मधुपानावर जात सदा रिझुनी ॥ मधु० ॥ १ ॥ चढे शक्ति बल असो सुदुर्बल वदे धैर्य धरुनी ॥ महिमा वाढे सुरा प्रसंगें तो न चढे वदनीं ॥ मधु० ॥ २ ॥ शौर्य धैर्य धरि करि रिपुमर्दन सुरामत्त बनुनी ॥ इतर पेय बलहत या लोकीं प्यावि सुरा वशिनी. ॥ मधु० ॥ ३ ॥

मस्कऱ्या—अरे पिओ साहेबों, मेरे भाईयों झटपट पीते रहो और प्याले खाली करते रहो तो बडा रंग है. (गातो)

पद—तक तक देखी, ही चाल.

झटपट पिओ मधुरिया छान् ॥ हिल मिल यारोंकों दिल बहिलाओ ॥ झ० ॥ एक तो प्याला भर खुला नयन वा; दुजा पिवे मरदवा जान् ॥ तिजा प्याला पिवे चढे गगनवा, यह ज्यादुयारों सुमरया छान् ॥ झ० ॥ १ ॥

सर्व—(यथेच्छ मद्यपान करतात व एकमेकांच्या अंगावर पडून ढकलाढकल करतात.)

सेनापति—गुरुजी, तुह्मीं असे फिके कां बसतां? घ्या एक दोन पूर्णपात्रें.

मस्कऱ्या—हो-हो! गुरुजी, हें दीक्षितांच्या मठांतून तीर्थ आणलें आहे. सहज दोन पूर्णपात्रें चढविण्यास कांहीं फत्यवाय नाहीं. (यांच्या पुढें ग्लास नेऊन) ली जियों मेहेरबान बुड्ढे बुद्रुक! कायकूं फिके बैठते हो?

गुरुजी—राजा, हें पहा बरें. मी जात होतों तेव्हां मला अडविलेंस आणि आतां हा असा प्रसंग आला. आतां याचें जर तूंच निवारण करशील तर ठीक आहे.

सन्मार्गसिंह—अरे, कोणी गुरुजींचें नांव काढूं नका बरें! आपसांत चालूं द्या.

मस्कऱ्या—आप मेहेरबान् ऐसा फरमान् करते हो! तो हम् नाइलाज है!

सन्मार्गसिंह—(पुत्राच्या पुढील पानपात्र जसेंच्या तसेंच भरलेलें पाहून) अरे तूं अजून असाच स्वस्थ बसला आहेस. पी पी, पहातोस काय?

बा० बलसिंह—तात आपण सर्व दरबारी मंडळीसह जें करीत आहां तें ठीक आहे. या संबंधांत आपण होऊन मला आग्रह करूं नये. मला त्याची मुळींच रुची नाहीं.

सन्मार्गसिंह--वेडा आहेस. तुला रुचि नाहीं ह्मणूनच थोडें पिऊन काय मौज आहे ती पहा. याची रुची फार चांगली आहे. आह्मीं इतके लोक जे आनंदानें पीत बसलों आहों ते काय वेडे आहों ?

बा० बलसिंह—यांत काय संशय ?

सन्मार्गसिंह—अरे बेट्या तूंच वेडा आहेस—

पद—गुनभरिधुनमोरि, ही चाल.

बहु गुण मधु पान करीरे ॥ चतुर पण भरुन
झडत सहज शिण-गुण मधु० ॥ धृ० ॥ स्वार्थ
पहा परमार्थ निंद्य जग सारें अर्थावरि भाळे ॥
विचार मोठा ज्यांत न तोटा थाट माट परभारे ॥
बहुगुण० ॥ १ ॥

बा० बलसिंह—बाबा, काय हे आपले विचार ! पहिल्यानें या मद्याच्या संबंधानें आपण किती तिरस्कार करीत होतां ? त्याची थोडी तरी आठवण करा. आपणच आह्मांस कोणत्या प्रकारें उपदेश करीत होतां आणि आज हें काय विपरीत सांगणें !

पद—जबके कलंदर बनबन फिरकर, ही चाल.

प्रथम विचारी मग अविचारी ज्ञान न ज्या त्या
हें साजे ॥ शुभाशुभाचा विचार नाहीं ऐसे कां
होउनि राजे ॥ मधु बिघडवि कुल शील शुभ
सुमती ॥ मधु बि० ॥ भोळा भाव मला न भावो

ही मति, विटत सुमन मम धरि सुगति ॥
मधु विघडवि० ॥ १ ॥

राजगुरु—(बालकाचें भाषण ऐकून आनंदानें) शाबास वत्सा, शाबास ! अशा सात्विक विचारानेंच राहशील, तर चिरकाल व अखंड हें राज्य तूंच करशील असा माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे !

सन्मार्गसिंह—(गुरूचें बोलणें ऐकून) प्रधानजी, या थेरड्याची जीभ लांभ होत चालली नाहीं ?

प्रधान—खरें आहे महाराज.

राजगुरु—अरे जीभच काय ? आतां मीही लांबच होतों. मला माझ्या नांवलौकिकाची फार गरज आहे. (असें बोलून निघून जातो.)

सन्मार्गसिंह—बालका, जेव्हां मी पूर्वाश्रमीं होतों, तेव्हां कोणीही माझी अवज्ञा केली तरी ती चालत असे. त्याचें त्या वेळीं माझ्या मनाला विशेषतः विषम वाटत नव्हतें. परंतु सांप्रत असा विचार आहे कीं, जो माझी अवज्ञा करील तो माझा कोणी प्रीतींतील सेवक असो, किंवा पुत्र असो, त्यास माझ्या अवज्ञावातप्रदीप्त कोपानलांत आहुती रूपानें पडावें लागणार आहे. या गोष्टीचा विचार कर आणि मग मी जें सांगतों तें न करण्याबद्दल तक्रार कर.

बा० बलसिंह—तात, खरोखर जें कर्म लोक निंदि-

त, पूर्वापार सदाचारांचे विरुद्ध आणि जें केल्यांस परमात्मा कोपाविष्ट होईल हें ठरलेलें असल्या कारणानें शिष्टजनांनीं ज्यास कधींही इष्ट मानलें नाहीं; अशा त्या भ्रष्ट मद्यपानकर्मनिषेधाबद्दल आपण मला शिक्षा करणार ?

सन्मार्गसिंह—कोणतेंही कर्म असो; जें मी होऊन तुला कर ह्मणून सांगतों तें तुला अत्यंत पवित्र मानलेंच पाहिजे. यासाठीं मुखांतून नकाराचा ध्वनिही न काढतां सांगतों त्याप्रमाणें जें पानपात्र रुचिकरपेयानें भरून तुझ्यापुढें ठेवलें आहे, तें आनंदानें माशन कर.

बा० बलसिंह—तात महाराज, ईश्वराच्या अवकृपेस्तव जरी मी तुमच्या क्रोधाग्नींत आज्याहुती प्रमाणें पडलों व दग्ध झालों, तरी आपण जें त्रैलोक्यनिंदित असें मद्यपान कर्म करावयाला सांगत आहां तें करणार नाहीं.

सन्मार्गसिंह—(क्रोधाविर्भावानें) कायरे ? तूं अजूनही माझी अवज्ञा करतोस काय ? ठीक आहे; अरेरे मूर्ख कारट्या:—

पद--जालं अजब एक, ही चाल.

तूंतें नसुनि ज्ञान ॥ बोलों बघसि छान ॥
पावे विलय मान ॥ ये कोप पुरता ॥ धृ० ॥

कैचा सुत न वन्य ॥ आज्ञा करि अमान्य ॥ तो
हो कधिं न धन्य ॥ भूभार पुरता ॥ तूं० ॥१॥
जा भोग असुखास ॥ कारागृह निवास ॥ दै-
वींच तव खास ॥ नेमीत धाता ॥ तूं० ॥ २ ॥
माया करुनि काय ॥ वाढे जरि अपाय ॥ त्या
हाच सदुपाय ॥ निर्मी नियंता ॥ तूं० ॥ ३ ॥

सेवकहो, जा—याला नेऊन कारागृहांत ठेवा. अवज्ञा करणारा पुत्र काहीं कामाचा नाहीं. (असें ऐकतांच दोन सेवक बालकास धरून नेतात.)

प्रवेश ३ रा.

(तदनंतर एकटाच सन्मार्गसिंह विचार करीत बाहेर येतो.)

सन्मार्गसिंह—कसा चमत्कार आहे पहा. त्या अज्ञान पोराच्या देखत घरीं आह्मीं सात्विकपणानें वागून मद्यपानाचा तिरस्कार करीत होतों; तेंच त्या बेट्याच्या मनावर दृढ होऊन बसलं आहे. पण त्या अज्ञान पोराला असें समजेना कीं, आह्मीं पिशाच्च दीक्षा घेऊन मद्यपान करूं लागलों त्यामुळें हें राज्यवैभव आह्मां-ला लाभलें आहे. आतां हें चिरकाल आपल्यास लाभावें असें जर आह्मीं इच्छित असलों तर आह्मांला सदोदित मद्यपान केलेंच पाहिजे. त्याच प्रमाणें आमचें असें जें कोणी असेल, त्यांनेंही ती दीक्षा घेतलीच पाहिजे. (इकडे तिकडे फिरून) बरें पण अजून आमचें साह्यकर्ते भूत आह्मांस भेटत नाहीं हें कसें ?

भूत—(प्रवेश करतां करतां) तुला भेटत नाहीं असें तर कधींच होणार नाहीं. तूं आठवण काढलीस कीं मी तयारंच आहें असें समज. बोल, तुझें काय ह्मणणें आहे ?

सन्मार्गसिंह—ह्मणणें काय ? तें पोर दारू पीत नाहीं, त्याला काय उपाय करावा ? त्यानें सर्व दरबारी लोकांसमक्ष माझी अवज्ञा केल्याकारणानें त्यास कारागृहांत पाठवून दिलें आहे. पण तो आपला हट्ट सोडील असें वाटत नाहीं.

भूत—चल, आतां आपण दोघे मिळून तुरुंगांत जाऊं. त्याला तूं जरा प्रेमानें हृदयाजवळ धरून उपदेश कर, ह्मणजे ऐकेल तो. तो जेव्हां एकवेळ तरी मद्यपान करील तेव्हां माझा जोर त्याच्या मनावर चालेल. यासाठीं सांगतों कीं, एक वेळ कसेंतरी करून तूं त्याला मद्य पाज. मग मी पाहीन.

सन्मार्ग सिंह—ठीक आहे. चल. पण तेथें गेल्यावर एक वेळ तूं त्याला आपला देखावा दाखीव, ह्मणजे कदाचित् तो घाबरेल व पिण्यास तयार होईल.

भूत—छे छे छे. तसें होणार नाहीं. तो जों पर्यंत कांहीं विकारांत पडला नाहीं, तों पर्यंत माझ्यानें त्याच्या पुढें येववणार नाहीं. त्यादिवशीं तूं मद्यपान करण्याचे आधीं तुला दिसलों याचें कारण असें कीं तूं क्रोधवश

होऊन घरांतून बाहेर निघाला होतास, ह्मणून मला तुझें भय नवतें.

सन्मार्गसिंह—असें काय? पण यावरून असें सिद्ध झालें कीं, तुमची भूतयोनि तरी एके प्रकारें निर्बल कोटींतच गणली पाहिजे.

भूत—जाऊंदे. त्या चौकशींत तुला कांहीं लाभ होईल असें नाहीं. आमची जाती कशीही असली तरी तुला माझ्यापासून लाभ आहेनां? झालेंतर, तूं माझी निंदा करूं नयेस. चल आतां, आपल्या मुलास मद्यपानाबद्दल उपदेश कर.

सन्मार्ग सिंह—ठीक आहे, चलच तर आतां.

(दोघे निघून जातात.)

प्रवेश ४ था.

(तदनंतर कारागारांत रहावें लागल्यामुळें शोक करीत असलेला बालक बलसिंह येतो.)

बा०बलसिंह—(शोक विव्हल होऊन)

पद—जोडुनि करही दासी, हीचाल.

प्रतिकुल दैवें कारागारीं॥ पाडियलें ये शोक शिरावरी ॥ धृ० ॥ मादक मदिरा प्राशावयाचा ॥ आग्रह जनकें कीजे कां तरी ॥ १ ॥ वनवासी जरि होतों तरी तें ॥ होतें समाधान या हृदयांतरीं ॥ २ ॥

आशा न उरली कांहीं मनीं या ॥ धांव विभो हा दास करीं धरी ॥ ३ ॥

भगवंता, मुलांनीं सच्छील निपजावें, त्यांस मादक व्यसनांचा नाद लागूं नये ह्मणून जनक जननीचा प्रयत्न चालू असतो; पण माझा प्रत्यक्ष पिता सर्व लोकांच्या समक्ष मला मद्यपान करण्याबद्दल उपदेश व आग्रह करितो आणि तें मी कबूल न केल्याकारणानें मला या कारागृहांत आणून ठेवतो; यावरून तुझी माया मोठी विलक्षण आहे असें जर या अप्रबुद्ध बालकानें न समजावें तर काय करावें बरें? भगवंता, असा प्रकार जरी आहे, तरी मी सन्मार्गाचा त्याग करून असन्मार्गांत पाऊल कधींही ठेवणार नाहीं. प्रत्यक्ष जनकानें उपदेश केला ह्मणून काय झालें ? अपवित्रपणाची बुद्धि उत्पन्न करणारें मद्य कांहीं झालें तरी मी पिणार नाहीं त्याबद्दल उपदेशकरणारा मग.पिता असो कीं कुणी असो.

पद-(गुले गुलजार नाजोनाराई, ही चाल.

पुरा प्र्हाद सोडी जनकासी, करि हरिस्मरण अविनाशि ॥धृ०॥ कष्ट जरी दे तरी न सोडी भाव धरी स्मरणीं पुरता ॥ नाम मुखीं घे प्रेम धरुनियां वरी भजन पंथा ॥ तरोनि जायं अंतीं मोक्षासी करि हरि० ॥ १ ॥ हिरण्यकश्यपु वैर करोनी, वैभवसह तनुला मुंकला ॥ नकळे गेला

कोठें तो मग नामशेष उरला ॥ अनन्वित काम
सदा दे अयशासी करि हरि० ॥ २ ॥

असो. दैवीं आहे तर हा कारागृहवास भोगला पाहिजे हेंच खरें आहे; त्या संबंधानें रडत बसण्यांत काय अर्थ आहे ? खरोखर जर विचार केला, तर पित्याची भेट व्हावी आणि राज्यवैभव भोग भोगावयास मिळावे असें मी इच्छिलें नवतें, असें असतां राज्य पदारूढ झालेला पिता दृष्टीस पडला, त्यासंबंधानें आनंद मानावा तर तोच स्वतः मला मद्यपान कर ह्मणून उपदेश करतो. यावरून सांप्रत दैवयोग उलटा आहे.

(याप्रमाणें बोलत आहे तों भूतासह सन्मार्गसिंह तेथें येतो.)

सन्मार्गसिंह—बालका, तुझ्या दैवाचा योग सांप्रत चांगला आलेला असतां केवळ माझी अवज्ञा केल्या कारणानें तूं या दुःखांत पडला आहेस. आतां तुला जर सुखोपभोगाची इच्छा असेल तर मी सांगतों तें ऐक. माझी आज्ञा मान्य करावी हा तुझा सनातन धर्म आहे.

बा० बलसिंह—सनातन धर्म आहे खरा; पण आपण जर सद्धर्मानें वागण्याबद्दल आज्ञा कराल तर ती मात्र मान्य करण्याचा माझा धर्म आहे. मी नाहीं ह्मणत नाहीं.

सन्मार्गसिंह—तूं जो सद्धर्म समजतोस, त्यापासून तत्काल सुख होत नाहीं.

बा०बलसिंह—आपली तरी अशी विपरीत बुद्धि फिरलेली मी आजच पाहतों. जोंपर्यंत घरीं होतां, तों पर्यंत आपणही मद्यप्राशनाचा तिरस्कारच करीत होतां. तो सन्मार्ग सोडून या राज्यवैभवावर आल्यापासूनच आपण तरी ही बुद्धि ठेवली आहे. पण अशानें तो परमात्मा कधींही संतोषित होणार नाहीं.

सन्मार्गसिंह—तूं जो परमात्मा समजतोस, तो व्यर्थ भ्रम आहे. खरोखर जर पाहूं लागलास तर त्याचें अस्तित्व प्रत्ययास येणार नाहीं. कारण—

पद—चमकतांची भासते, हीचाल.

व्यर्थ लोकीं देव दैवी लेखही नकळे तरी ॥ मा-
निती त्या भ्रांत वेडे अंध जे हृदयांतरीं ॥धृ०॥
देव कोणा भेटला ऐसें न कोणी पाहिलें ॥ यत्न
मोठा तो फळें देतो न त्याची ये सरी ॥
॥ व्य० ॥ १ ॥ मद्यपी शौर्यांत राहे भय न
वाटे त्या कधीं ॥ धैर्य वाढे कर्म तें सुख दे जगीं
बहुतांपरी ॥ व्य० ॥ २ ॥ याच साठीं मद्यपी
युवराज्य भोगी हो मुला ॥ ऐक नलगे हट्ट हा
अज्ञान सोडीं लौकरी ॥ व्य० ॥ ३ ॥

बा०बलसिंह—वाहवा, आपण ईश्वराचें अस्तित्वही कबूल करीत नाहीं ? तर धन्य आहे आपल्या या विचारांची. महाराज कांहीं तरी विचार करा, ईश्वर नाहीं असें होईल तरी कसें ? ज्यानें हें चराचर जग

उत्पन्न केलें, ज्याच्या कृपेनें जगाचें पालन होत आहे व ज्याला कोप आला तर सर्व क्षय होण्यास क्षणही लागणार नाहीं. तो नाहीं असें ह्मणवेल तरी कसें ?

सन्मार्गसिंह—अरे, त्याचा जर कांहीं प्रत्यय येत नाहीं, तर कांबरें ह्मणवणार नाहीं ? तूं जर तो आहे असें ह्मणतोस, तर कोठें आहे ?

बा०बलसिंह—तो कोणत्या ठिकाणीं नाहीं असें आपणांस वाटतें ? मी तर निश्चयानें असें ह्मणतों कीं, तो परमात्मा देव सर्वत्र आहे. त्याच्या व्याप्ति शिवाय कोणतीही वस्तु नाहीं.

सन्मार्गसिंह—तो सर्वत्र आहे असें जर ह्मणतोस, तर तूं जो या कारागृहांत पडला आहेस, यांतही तो आहेच असें समजतोस ?

बा०बलसिंह—यांत काय संशय ? येथेंही तो आहेच आहे.

सन्मार्गसिंह—बोल तर हा जो खांब दिसत आहे, यांतही तो आहे ?

बा०बलसिंह—होय, या समोरच्या खांबांतही तो आहे.

सन्मार्गसिंह—असें आहे तर पहा त्याला मी लत्ताप्रहार करतों. (असें बोलून रागानें त्या खांबाजवळ धांवत जातो व त्यावर लत्ता प्रहार करतो इतक्यांत त्या खांबांतून एक सर्प बाहेर येतो व त्या सन्मार्गसिं-

हास दंश करतो. त्यामुळें व्याकुळ होऊन व भुईवर पडून) अरेरे ! सर्पानें, दंश केला ! मेलों !! मेलों !!!

बा०बलसिंह—(त्याचे जवळ जाऊन) अरेरे ! हा काय विपरीत प्रकार झाला ? (मोठ्यानें ओरडून) धांवा हो धांवा कोणी तरी, माझ्या पित्यास सर्पानें दंश केला !

[बालकाचें ओरडणें ऐकतांच प्रधानादिक दरबारी लोक धांवत येतात व मूर्छित पडलेल्या सन्मार्गीसिंहास अनेक प्रकारचे उपचार करूं लागतात.]

बा०बलसिंह—

पद—आफसोसके आखोंसे, ही चाल.

हाय हाय प्रभो कैसें, विपरीत हो तरी॥कुविचार या पित्याच्या, जिवाची करी चोरी ॥धृ०॥जगदीश्वरा तूं राहसी, जग व्यापुनी सारें॥हाय हाय हाय हाय ॥ आली खरी प्रतीती, निमाला तुझा वैरी ॥ हाय० ॥ १ ॥ प्रभु सर्परूपें येसि तूं, परि दोष या माथीं ॥ हाय० वैरी तसा सुत हा, पित्यासी स्वयें मारी ॥ हाय० ॥ २ ॥

प्रधान—(सर्व मुत्सद्दी मंडळीस) महाराजांत कांहीं राम दिसत नाहीं. कोणी जाऊन आपल्या वैद्यराजांस तरी बोलावून घेऊन या.

वैद्यराज—(घाईनें येऊन) काय झालें असें एकाएकीं व्हावयास ? (नाडी हातांत धरून) राम राम राम ! कांहीं आशा करणें नको.

राजगुरु—(प्रवेश करून) काय हो हा प्रकार झाला तरी कसा ?

प्रधान—महाराज कारागृहांत आले आहेत असें समजतांच ते बाळ महाराजांकडेच गेले असावे असें समजून आह्मीं सर्व जमून येत होतों; तों बाळ महाराजांचा दुःखशब्द ऐकला आणि सर्व धांवत आलों तों हे तळमळताहेत व दंश झाला आहे.

राजगुरु—(बालकास) बाळ महाराज, हा प्रकार काय व कसा झाला सांगा बरें ?

बा० बलसिंह—मी ईश्वर सर्वत्र आहे व तो या स्तंभांतही आहे असें सांगतांच यांनीं "मी त्याला लत्ताप्रहार करतों," असें बोलून खांबावर लाथ मारतांच स्तंभाखालून एक विषारी कृष्णसर्प निघाला व त्यानें यांस दंश केला !

सन्मार्गसिंह—हा ! हा ! हा ! मेलों !! भगवंता, सुरापी होऊन तुझें वैर केलें आणि इहपरत्रास मुकलों ! मंत्रिजन हो, आतां या माझ्या पुत्रास राज्यासनीं बसवून तुह्मीं आपलें राज्य चालवा ! हा न्याय व धर्म मार्गांतून कधीं चळणार नाहीं. आतां माझ्यानें बोलवत नाहीं, मेलों मी ! राम ! राम ! राम ! (मरतो.)

प्रधान—झालें. संपला अवतार ! सिंहासनावर दुसरा राजा बसविल्याशिवाय राजाचें शव उचलतां येत नाहीं. तेव्हां काय विचार करावा गुरुजी ! सांगा.

राजगुरु—विचार कसला करीत बसलां आहां? हा सुशील राजपुत्र सिंहासनावर बसविण्यास योग्य आहे. याच्याच मस्तकीं राजछत्र धरून करा तयारी.

प्रधान—ठीक आहे. या तर सर्व, लावा हात. (सर्व मिळून बलसिंहास राजाचा मुगुट घालतात व आनंदानें ईश्वरस्तव करूं लागतात)

पद—हजार शुक्र है खुदा, ही.चाल.

जगांत न्याय दावितो दयाळु देव तो ॥ सुशील शांति सौख्य लाभ पूर्ण पावतो ॥ अखेर दुष्टबुद्धि दुर्गतीस पावतो ॥ सुबुद्ध दैववान तोच राज्य लाभतो ॥चाल॥ जो धर्माचां पथ निंदी–तो या लोकांतिल नंदी ॥ त्या निंदी हें जन नरकीं तो जातो॥जो सद्धर्मातें पाहे–त्या सारेंही सुख आहे॥ छाया ईश्वर त्यावर तोषें करितो ॥ १ ॥

(जवनिकापतन होतें)

भूत—(आनंदानें नाचत येऊन) झाला! लाभ झाला!! मला जोडीदार मिळाला!!! हा सन्मार्गसिंह मी जिवंत असतां माझा द्वेष करीत होता. म्हणून त्याची आशा कायम राहील व तो मरण पावेल असा प्रयत्न केला. आतां मी आनंदानें आपल्या जाग्यावर जाऊन तो येण्याची वाट पहात बसतों.

(असें बोलून जातो व पडदा पडतो.)

[दुसरा अंक संमाप्त.]

अंक ३ रा.

(तदनंतर चौघे तरुण सहज सहल करीत असल्या प्रमाणें प्रवेश करितात.)

१ ला—कसेंरे गडे हो आपल्याला तर या शुष्काशुष्की हिंडत राहण्याचा कंटाळा आला.

२ रा—अरे शुष्काशुष्की कां ह्मणतोस ? हवा खाण्यांतही एका प्रकारें इष्की आहे.

३ रा—खरेंच, पणं हवा खाऊन तिच्यावर दगड-चावण्याची फष्की फांकली पाहिजे.

४ था—(एकीकडे आत्मगत) कशी ही मंडळी विद्वत्तेवर दावा करणारी आहे पहा—शुष्काशुष्की, इष्की आणि कांहीं जोडायाला आठवेना तर ह्मणे फष्की फाकली पाहिजे. (उघड) अरे मित्र हो, असे अगदीं निष्क्रिय न होतां खुष्कीच्या मार्गानें चालाल तर कांहीं सगळी शुष्काशुष्कीच आहे असें वाटणार नाहीं. कशी झाली तरी ही आनंदवल्ली नगरी आहे.

१ ला—आनंदवल्ली खरी पण गुरुकिल्ली माहित असली तर गल्लीकुशींत कांहीं सोय झाल्यास मिळविली असें मानतां येईल. नाहीं तर हांका हांकच,

२ रा—एकेकांची अशी झाक असून हांका हांकच ह्मणतोस ?

३ रा—अरे बाबा ज्याची झांक त्याला. ह्मणावें चुरमुरे फांक नाहीं तर मार आपल्या बापाला हांक; आणि ह्मणावें आपल्या लेकाला झक मारायाला स्वर्गलोकांतून पैका टाक.

४ था—हें राहूंद्यारे आतां. मी असें विचारतों कीं, आतां असेच बाचाबाची करीत राहणार कीं कोठें तरी कान पवित्र होतील आणि पान खाण्याची सोय होईल अशा ठिकाणीं चलणार ? बोला; विनाकारण वेळ गमावूं नका.

१ ला—अरे वाहवारे वाहवा ! आज तुलाच कोठें तरी पान खायाला जावेंसें वाटूं लागलें आहे काय ? चलाच तर गडे हो, आज कांहीं तरी सुचिन्ह आहे. ज्यापेक्षां हे साधु पुरुष असें बोलताहेत, त्यापेक्षां कांहीं लाभ आहे खचित.

२ रा—लाभ खचित आहे तर चला, कोण नको ह्मणतो ? पण कोणाकडे चलतां ?

३ रा—अरे मित्रहो, काल एक मनुष्य असें सांगत होता कीं आपल्या त्या राजाई कुंटिणीनें बरेच दिवस फिरून एक माघुक पात्र आणलें आहे; तर चला

आज तिकडेच जाऊं आणि जी बातमी ऐकतों ती खरी आहे कीं खोटी आहे तें एकवेळ पाहूं.

४ था—खरोखर नवीनच असलें तर पाहिलें पाहिजे, चला.

१ ला—चलाच तर, चला चला ह्मणत उभे राहूं नका, पाय उचला. (असें बोलून सर्व निघून जातात.)

(तदनंतर कुंटीण व तारा ह्या दोघी येतात.)

कुंटीण—ऐकलेंस, तुझे असे हे नेम आणि धर्म माझ्या घरांत राहून कांहीं चालायाचे नाहींत. मी एक धंदा करणारी बायको आहें. माझ्या जवळचा पैका देऊन मुद्दाम जें मी तुला घेतलं आहे; तें तुझ्या अशा लाडक्या गोष्टी ऐकण्याकरितां असें कोणत्याही दिवशीं तूं मनांत आणूं नयेस. समजलीस. या संबंधानें मला परक्या माणसांच्या समोर बोलावें लागेल असें करूं नको. (या प्रमाणें तिचें बोलणें होत आहे तों चौघे तरुण येऊन तारेकडे पहात उभे राहतात.) तूंही त्यांच्याकडे पहातच काय उभी राहिलीस? त्यांना या—बसा ह्मणून सांग.

तारा—रोजचे येणारे आहेत, त्यांना रोज रोज काय सांगायचं? कांहीं नवे असले तरी जुन्यांच्या संगतीनं असतात आणि पाहतात त्या प्रमाणं बसतात.

कुंटीण—वाहवाग! मोठी शहाणीच आहेस तूं!

पण सांगून ठेवतें, हें तुझं शहाणपण माझ्या घरांत राहून चालणार नाहीं. तुझ्यासाठीं पांच हजारांची रक्कम खर्चून तुला आणलें आणि मुद्दाम खर्च करून तुला नाच–गाणं शिकविलें तें कशासाठीं ? हें जर तुझ्या मनाला न समजेल तर मोठा चमत्कार आहे असं ह्मणावं लागेल.

तारा—असं आहे तर मीही तुह्मांला साफ सांगतें कीं, केवळ नृत्य गायनावर जी तुमची फेड होईल ती तुह्मीं करून घ्यावी; त्या शिवाय दुसरं कोणतंही बदकर्म मी करणार नाहीं आणि त्यासंबंधानं तुह्मांसही मजवर जुलूम करण्याचा विचार पडेल.

कुंटीण—बरं आहे. तो विचार पडेल तेव्हां मी करीन. जी मंडळी आली आहे, ती तर बसवून घे आणि त्यांचं काय ह्मणणं आहे याची चौकशी कर.

तारा—ती चौकशी करण्याचंही मला साधणार नाहीं, या साठीं तीही आपणच करावी.

कुंटीण—(तिच्यावर दांत ओंठ चाऊन आपल्याशीं) असं काय ? नको करूं तूं चौकशी. ही मंडळी गेल्यावर घेईन तुझा समाचार. (उघड चौघांस) या किंहो असे बैठकीवर ! असं उभं काय समजून रहावं माणसांनीं ? (एकेकास बैठकीवर बसविते.) बोला, आतां काय विचार आहे ? (पहिल्यास) काय हो ? इतके

दिवस कोणीकडे दडी दिली होतीत सांगा तरी ? काय बाई माणसांनीं एक सारखं वाट पहात रहावं ?

१ ला—कांबेरें ? आमच्या साठीं वाट पहात रहावं, असं कांहीं आह्मीं सांगून गेलों नवतों. त्यांतून मंडळी आहे; मंडळी बरोबर फिरूं लागलं ह्मणजे किती दिवस जातील याचा कांहीं नेम सांगतां येणार नाहीं. तें असो. पण 'आज आह्मीं कां आलों आहों हें तुमच्या ध्यानांत आलें आहे काय !

कुंटीण—नाहीं बाई. सांगितल्याशिवाय कसं कळावं?

२ रा—कळायाचं काय ? कांहीं तरी नव्या नवाळी कडून ऐकायाला मिळावें, इतकेंच.

३ रा—असें कां करतां ? स्पष्ट सांगा कीं, आज आह्मीं तुह्मीं आणलेल्या नव्या पात्राच्या तोंडचें गाणें ऐकण्याचा बेत करून आलों आहों.

कुंटीण—इतकेंच नां काय तें? गाईल ती. (तारेस) बेटा, तुझ्या साजिंघाला आंतून हांक मारून आण आणि या मंडळीला दोन चिजा ह्मणून दाखीव बरें.

तारा—ठीक आहे. (असें बोलून आंत जातां जातां चवथ्या तरुणाकडे पाहून आपल्याशीं) "देवा, हे जे चौथे गृहस्थ आज इथं येऊन बसले आहेत यांचे कडे पाहून माझ्या मनाची स्थिति अशी कां बरं होते ?

पद्—बदंकारी जारी करने, ही चाल.

मन वेधे भारी हरखोनी राहे मुख पाहे ॥ धृ०॥
स्तिमित नयन हे जडले अडले ॥ प्रियकर वरि
चपल हे, लवलाहे ॥ १ ॥ अनुभव न कधीं जरि
या हृदया॥हुरहुरी धरी अतिशयें, भय वाहे॥२॥

असो. आतां बाईनं सांगितल्या प्रमाणं साजिंद्यांनां हांक मारून आणावं आणि गाण्याची सुरवात करावी, ह्मणजे आनंदानें पहात बसायाला व प्रसंगीं आपल्या मनांतील आशयही कळवायाला सांपडेल (असें बोलून त्याजकडे पहात पहात निघून जाते.)

४ था—(तारेचें पाहणें चालणें इत्यादि प्रकारांवर मोहित होऊन)

पद्—बघुनि उपवना विरहाग्नीची, ही चाल.

ही मृगनयना गुण संपन्ना, आहे गजगामिनी ॥
सिंहाची कटी सुरंग गोरा, मोहक अति भामिनी
॥१॥ नाजुक ठेवण जेथिल तेथें, पाहुनियां नय-
नीं॥मोहित हो मन, लगटे जाउन, राहतसे खि-
ळुनी ॥२॥ चाल ॥ बोलेल कधीं मज सवें उभी
राहुनी ॥ चालेल मना सारखी सदां चाहुनी ॥
तेव्हांच जन्म फल खरें मिळालें जनीं ॥ कठिण
खचित हें परगृहिं आहे, उघड येत दिसुनी॥परि
परमेश्वर, कृपा करिल तर, गोडच हो निशिदिनीं॥

तारा—(साजिंद्यांसह येऊन कुंटिणीस) हे साजिंदे आले आहेत.

कुंटीण—(सारंगी वाल्यास) वस्ताद, काय हें ? मंडळी येऊन बसली तरी तुमचा ठिकाण नसावा, हें चांगलंचनां ?

सारंगीवाला—नही जी, अबी सूर लगाता हूं. (तबलजीस) छोडोजी तबला. क्या देखते हो. आज ताराजीका गाना तो सुनो. (सूर जुळवितात.)

कुंटीण—गा आतां बेटा. मंडळीचीं मनं कशीं खुष करून सोड.

तारा—गातें मी. खुष करण्याचं कांहीं माझ्या हातीं नाहीं. तें जें होईल तें खरें. माझं गाण्याचं काम. (गाते)

पद—या वेला गुंतली, ही चाल.

ही आशा गुंतली ॥ नेत्र अडोनी जडलेच मुळीं ॥ ही आ० ॥ नाजुक तो शशि रम्य तसे हे ॥ प्रिय होती या स्थलीं ॥ खरोखर प्रिय० ॥ १॥ थोर कुळांतिल थाट निराळा ॥ दिसतो या निर्मळीं ॥ खरोखर ही आ०॥ २ ॥ सभ्य पणाचा मोहक बाणा ॥ जन मानी वर कुळी ॥ ३ ॥

३ रा—अरे पण कोणावर ही आशा गुंतली ?

१ ला—(चवथ्याकडे हात करून) बहुत करून

या स्वारीवर मेहेरबानी चालली आहे. तेव्हां तेथेंच गुंतली आशा असें समजा.

२ रा—गुंतूं द्यारे. कोठें तरी जडली ह्मणजे झालें. गड्बड करूं नका. ऐका. (तारेस) हं, चालूं द्या दुसरी एखादी अशीच चीज.

तारा—दुसरी चीज अशीच येत असेल तर नां?

४ था—तुमच्या मनास वाटेल तें ह्मणा हो; यांचें कोणाचें ऐकूं नका.

तारा—ठीक आहे. ऐका तर—(गाते.)

पद—जो या नगरा भूषण, ही चाल.

राधा हरिला प्रिय हो जरी ॥ तरि ही खोडच्या तो बहु करी ॥ नवनीतासह दधि पय चोरी ॥ पचवो साव तसा ॥ १ ॥ गोपी मार्गांतरिं अडवूनी ॥ दादच मागे गळ घेऊनी ॥ बोले न बोलवे जें जनीं ॥ चावट खट मोठा ॥ २ ॥ मारी माय यशोदा परी ॥ गवसेनाच कधीं ही करीं॥ जावें गोकुळ सोडुनि दूरी॥हरिच्या या धाकें॥३॥

३ रा—छी—छी—छी—छी. हें अगदींच बेचव लागलें बुवा! असलें कांहीं कामाचें नाहीं. गाना ऐसा गाव की सबकी एक पलखमें उडे च्यांव् म्यांव् ! अपने गाने मे राधा और हरि काय कूं? अपने लोकोकूं तो इष्कबातीका शोक है. वह षोक बढ जावे ऐसा कुच गाव.

तारा—मला बाई जसं गायला येतं तसं मी गाऊन दाखवीत आहें. मंडळीची आवड निवड करून त्याप्रमाणं गाण्याचं ज्ञान माझ्यांत मुळींच नाहीं.

४ था—ठीक आहे. तुह्मांला येत असेल तसेंच गा.हो.

१ ला—हो-हो-तुह्मीं कसेंही गायलें तरी या रावसाहेबांला आवडेलच तर गा जसें येत असेल किंवा तब्यत लागेल. तसें. चालूं द्या.

तारा—ठीक आहे तर. (गाते)

पद—गुरु दत्तदिगंबर बनमो, ही चाल.

हर हर शंकर सांब शिवा ॥ विश्रांती दे या जीवा ॥ धृ०॥ जटाजूट शोभवि ती गंगा चंद्रकोरही झळके ॥ चिताभस्म सर्वांगीं लावी त्रिशूल हस्तिं पहावा ॥ हर ह० ॥१॥ बाण रावणादिक गण तवगुण गाती प्रेमें करुनी ॥ भक्त सखा तूं भोळा अतिशय कर देसी सद्भावा ॥ हर ह०॥२॥ सुरासुर स्तुत अन्य न दैवत भव भय दवडिल ऐसें ॥ कवि वदती कीं विजयेच्छू जो त्यानें पशुपति गावा ॥ ह० ॥ ३ ॥

४ था—वाहवा वाहवा ! (तिच्या पुढें असलेल्या तबकांत रुपये टाकतो)

३ रा—हें रडगाणें कांहीं आपल्याला आवडत नाहीं. तरी आलों आहों ह्मणून तसेंच जातां येत नाहीं; यासाठीं ही शक्त्यनुरूप बिदागी. (असें बोलून तब-

कांत कांहीं रुपये टाकून व उठून इतरांस) चलारे जें द्यावेंसें वाटत असेल तें पटापट द्या आणि उठा. या भजनीगाण्यांत कांहीं मजा नाहीं. (असें ऐकतांच पहिला व दुसरा थोडें थोडें रुपये तबकांत टाकून उठतात)

१ ला—(चवथ्यास) काय हो ? तुह्मीं बसणार कीं काय ? पाहिजेतर बसा.

४ था—आपण तर कांहीं वेळपर्यंत तरी बसणार खचित. तुह्मांला जर घाई असेल तर जा बापडे. आपल्याला तर हेंच गाणें आवडतें बुवा.

२ रा—व ३ रा–ठीक आहे, बसा तर खुशाल लाळ घोंटीत. (तिघे जातात.)

कुंटीण—तारे, कांग त्या तिघांना घालविलंस ?

तारा—त्यांना आवडेना, ह्मणून तेच गेले. मी कशाला घालवूं त्यांनां ?

कुंटीण—हें सांगतांनां तुला कांहीं लाज वाटते कीं नाहीं ? अवदसे तुझ्या साठीं खर्च केलेली रक्कम असें करशील तर कशी भरून येईल ?

तारा—तुह्मीं जो खर्च केला तो मला विचारून केला होता कीं काय ? ही एक पिडाच आहे माझ्या पाठीमागं !

कुंटीण—भवान्ये, उलटे सुलटे जबाब देशील तर पेकटांत लाथ खाशील, तूं काय समजली आहेस. आपल्या सुखादुःखाचा विचार करून रहा आणि वाग.

आतां त्या शेजारणी ठकू बाईनं हाक मारली आहे, या साठीं तिकडे जाऊन येतें आणि मग पाहतें तुझा काय तमाशा आहे तो. (असें बोलून जातां जातां) तों पर्यंत बैस पाठीला चांगलं तेल लाऊन. (जाते.)

तारा—(कुंटिणीच्या बोलण्यामुळें विषाद पावून) देवा, आतां पुढं कोणता प्रसंग येणार हें कांहीं कळत नाहीं. बोलून चालून अनन्वित कर्मांच्या माहेर घराचा आश्रय धरून राहिलें आहें, मग दुर्घट प्रसंग येतील ह्मणून किती भ्यायचं आहे. (चवथ्या तरुणास उद्देशून) हें ऐकून केवळ भूतदयाच मात्र मनांत वागवील व या अनाथ निराश्रित दासीला आश्रय देऊन सनाथ करील असा कोणी कुलीन व भाग्यवान तरुण पुतळा देवानं निर्माणच केला नाहीं काय ? किंवा केला असून तो मला अजून लाभत नाहीं ?

४ था—(ऐकून व तिच्या भाषणाचाच ओघ धरून) तो लाभत नाहीं असें ह्मणण्यापेक्षां आपण अजून लाभून घेतला नाहीं, असें मनांत आणलें तर चालेल.

तारा—(आपल्याशीं) आतां असा संकोच धरून इष्ट कार्यास कालावधि लावीत बसण्यास कांहीं खरोखर वेळ नाहीं. तर मना, संकोच सोड; जरासा धीटपणा धर आणि ती महामाया परत आली नाहीं तों जें बोलावंसं वाटत असेल तें बोलण्याचा उपक्रम कर. मागें मागें

करशील तर अगदींच लाभ होणार नाहीं. (असें बोलून तरुणाच्या शेजारी जाऊन अत्यंत विनयानें) महाराज, या दासीवर दया करून हिला दुःखांतून व दुर्घट प्रसंगांतून मुक्त करण्याचं सामर्थ्य आपणांजवळ असेल तर या कुंटिणीच्या जाचांतून हिला सोडवावं आणि आपल्या घरांतील दासीवर्गांत नेऊन मला ठेवावं, इतकीच माझी प्रार्थना आहे.

४ था—सुंदरी, तूं या दुष्ट कुंटिणीच्या हातीं कशी सांपडलीस ?

तारा—मला चोरांनीं धरून, मजपाशीं त्यांना लुटण्यासारखं कांहीं लाभेना म्हणून त्यांनीं या कुंटिणीपासून पांच हजार रुपये घेऊन मला विकलं आहे. पण तेव्हां मी दहा अकरा वर्षांची होतें. म्हणून आज दोन तीन वर्सं दोन हजार रुपये खर्च करून हिनं मला नाच गाण्याची तालीम देवविली. हिच्या घरीं रहावं आणि आपल्या कुलशीलास कालिमा आणणारं कर्म करीत असावं, त्यापेक्षां जीव द्यावा हें बरं असं मला वाटत आहे. या प्रसंगीं इतकंच ऐकून आपण मजवर दया कराल तर दुसऱ्या एकाद्या शांतप्रसंगीं मी आपल्या जन्मकर्माची दुःखपरिणामी कहाणी आपणांजवळ सांगेन.

४ था—ठीक आहे. ती कुंटीण आली ह्मणजे तुझ्याबद्दल जरी तिनें दहा हजार पर्यंत मागितले तरी मी ते भरीन आणि तुला तिच्यापासून सोडवीन.

तारा—ठीक आहे तर मी आपल्या बरोबर या घरांतून आलें ह्मणजे एकांतीं मी आपलं सर्व वर्तमान आपणांजवळ सांगेन.

कुंटीण—(येऊन) ए पोरटचे तारे, ये अशी माझ्या पुढं पाहूं.

४ था—(कुंटिणीस) बाई, तुह्मीं अशा विनाकारण संताप करून घेऊं नका. या तुमच्या तारेच्या संबंधानें तुमचा काय खर्च झाला आहे तो एक वेळ मला सांगा बरें ?

कुंटीण—आजपर्यंत माझा हिच्यासाठीं बरोबर दहा हजार रुपये खर्च झाला आहे, हे रुपये जर आज मला कोणी देत असेल, तर मोठ्या आनंदानं मी हिला त्याच्या हवालीं करीन. त्यानं मग हिचं कांहीं केलं तरी माझं बोलणं नाहीं.

४ था—असें आहे तर चला माझ्या बरोबर तिला घेऊन. दहा हजार रुपये मोजून तुमच्या पदरांत घालतों. व तिला मी आपल्या ताब्यांत घेतों.

कुंटीण—ठीक आहे, चलाच तर. (सर्व निघून जातात)

(रामदयाळ सावकार आपल्या सेवकासह येतो.)

रामदयाळ—इतके दिवस जरी कित्येक लोक त्याच्या बदफैलाबद्दलच्या कागाळ्या मला सांगत असत, तरी त्या मी खऱ्या मानीत नव्हतों. कारण,

त्याच्या आज्ञाधारक वृत्तींत फरक पडलेला मला दिसला नाहीं पण आतां जेव्हां प्रत्यक्ष त्या दोघांस एकत्र एकांतीं बसून हित गुजाच्या गोष्टी करीत असतां पाहिलें तेव्हां चांगली खात्री झाली. अद्यापि जरी तो माझी अवज्ञा करीत नाहीं हें खरें आहे तरी आतां मी त्याला आपल्या घरांत बाळगणार नाहीं. जिच्या कुलशीलाचा पत्ता सांगतां येत नाहीं, ती कितीही सुशील व सुस्वरूप असली तरी तिचें पाणिग्रहण करणें ह्मणजे कुळाला बट्टा लाऊन घेणें आहे. असा जो बट्टा लावून घेणारा पुत्र, तो सुपुत्र आहे असें जरी दिसलें तरी तें खरें नव्हे; कुपुत्रच तो. खरोखर पाहतां त्याचें मुखावलोकन करणेंही चांगलें नव्हे; पण जी ताकीद करणें ती स्वतःच करावी असा माझा मनोदय आहे. यासाठीं तूं आतां तिच्याच बिऱ्हाडीं जा आणि मी बोलाविलें आहे असें सांगून त्याला येथपर्यंत घेऊन ये.

सेवक—जी. आपण बसावें या ठिकाणीं. हा मी त्यांना बरोबर घेऊन आलोंच असें समजा.

रा०—ठीक आहे जा तर लौकर परत ये. (सेवक जातो व तारानाथासह परत येतो)

सेवक—हे आपले बाबा साहेब बसले आहेत पहा. आणि काय ह्मणतात तें विचारा.

तारा०—(बापास नमून) बाबा साहेब या बालकावी काय आज्ञा आहे ?

रा०—तूं माझ्या पश्चात्, माझ्या अनुमताशिवाय माझ्या निर्मल कुलास, माझ्यां लौकिकास, माझ्या नांवास कलंक लागेल असें कोणतें कृत्य केलें आहेस हें खऱ्या प्रकारानें सांगशील ? बोल. फाजील विनय दाखविण्याकरितां खालीं पहात उभा राहूं नको. अशा कृतीनें लाभ होईल असें मानशील तर पस्तावशील.

तारा०—महाराज जें कांहीं मी केलें आहे तें खऱ्या प्रकारानें पाहतां आपल्या आज्ञेप्रमाणेंच केलें आहे आपण मजपाशीं पंचवीस हजार रुपये देऊन सांगितलें होतें कीं " या रकमेच्या साह्यानें तुला पाहिजे तर आपल्या मनासारखा कांहीं व्यापार कर अथवा जर तुला एखादी कुलीन सुंदर विनयवती वधु आढळली तर आपलें लग्न करून घे आणि गृहस्थाश्रमी होऊन मला भेटायला ये" तर आपल्या त्या आज्ञेप्रमाणें एक अत्यंत विनयवती सुशील चतुर व कुलीन तरुणी संकटांत पडलेली आढळतांच दहा पंधरा हजार रुपये खर्च करून तिला वरलें आणि तिची योग्य व्यवस्थाही लावून दिली. आतां ती दूर देशीं राहणारी असल्याकारणानें तिच्या कुलाच्या संबंधानें कोणाला विशेष माहिती नाहीं हें खरें आहे.

रा०—मूर्खा तोंड वर करून तूं जो हें वर्तमान [सां]गतोस तें पूर्ण अविचारानें भरलेलें आहे असा तुझ्या [मना]ला बोध कसा होत नाहीं ? बोलून चालून जी प्र-

सिद्ध कुंटीणीच्या घरांचा आश्रय करून राहिलेली व नृत्य गायनांत निपुण होऊन राहिलेली ती कुलीनानें वरण्यास योग्य राहिली असेल असें कसें मानलेंस ? तरी असो. जें घडून आलें तें कांहीं परतत नाहीं या साठीं सांगतों कीं तुला जर आला कुटुंबी जनांची संगती प्रिय असेल तर तिचा संबंध अगदीं सोडून दे आणि घरीं येऊन रहा. नाहीं तर आई बाप भाऊ बहीणी आप्त स्वजन इत्यादिकांचा व आपला संबंध अगदीं तुटला असें मानून परत हें कृष्णवदन दाखविण्यास घराकडे येऊ नकोस. ही ताकीद तुला अगदीं शेवटची केली आहे तिच्या संगतींत राहून घरांत वापरण्याचा हेतु धरून जर रडगाणं गात राहशील तर कांहीं लाभ होणार नाहीं.

तारा०—ठीक आहे. आपण जर इतक्या स्पष्टपणानें सांगत आहां तर मी आमलाच पुत्र माझ्यांतही ईश्वरकृपेनें कांहीं पौरुष व पराक्रम वास करीत आहे. त्याचप्रमाणें एक वेळ जें वचन दिलें तें सत्य करून दाखविण्यासाठीं कांहीं दिवस जरी दुःख भोगावें लागलें तरी तें आनंदानें पत्करीन पण जे एकवेळ वचन दिलें आहे तें सत्य करून दाखवीन. आतां आपणास जर तिचा अनुभव असता तर आपल्याच्यानें मला असें सांगवलें नसतें. असो आतां या बालकावर वडिलांची कृपादृष्टि असावी इतकीच प्रार्थना करून निरोप मागतों (नमतो.)

रा०—जा जा विनाकारण वल्गना करून त्या मला ऐकवूं नकोस. आज एक पोरगा नाहींसा झाला असें आजपासून मी मानीन आणि तो परमात्मा ज्याप्रमाणें ठेवील त्याप्रमाणें आनंद मानून राहीन.

ता०ना—ठीक आहे परमेश्वर आपणास अक्षय आनंदांत ठेवो. मी जातों (जातो)

रा०-गेला?ठीक झालं? (सेवकास)पाहिलासकसा उद्दाम आहे तो? मी इतकें बोललों तरी त्याला द्रव आला काय? या वरूनच त्याला तिचा पूर्ण नाद लागला आहे आणि तो लौकर सुटेल असें वाटत नाहीं. असो नशीब त्याचें! आपला तरी काय उपाय आहे? चला घरीं. (असें बोलून दोघे जातात.)

(तदनंतर आनंदानें एकटीच विचार करीत बसलेली तारा येते.)

तारा—

पद—घडीमें जिसदम नहो कमानी ही चाल.

सुदैव रंगे न ज्यास सीमा। सदाचरण ये अखेर कामा ॥ धृ० ॥ प्रिया प्रिया हो कुलीन रामा ॥ सुखांत वसतां न घे विरामा ॥ १ ॥ उदार तो प्रिय खरा जगीं या ॥ अपारधी बल सुरम्य काया ॥ २ ॥ करोनियां गृह बसे मनीं या ॥ परी न गवसे कधीं रिकामा ॥ ३ ॥

स्वारीला अकस्मात् वडिलांकडून बोलावणं आलं; ह्मणून चालू असलेली गोष्ट तशीच अर्धी टाकून लगबगीनं स्वारी निघून गेली; ती अद्यापि परत येत नाहीं, हें काय आहे तें कांहीं कळत नाहीं. देवा, कांहीं असो स्वारी जशी गेली आहे तशी आनंदानं परत येवो आणि या नेत्रांचं सार्थक होवो; एवढीच काय ती इच्छा आहे. (दुःखित होऊन बसते.)

ता॰ना॰—(खिन्न वदनानें बाहेर येऊन) आतां त्या सर्वस्वी स्वाधीन झालेल्या अबलेस काय सांगावें? आणि तिची समजूत तरी कशी करावी? खरोखर विचार केला तर आतां या गांवांत राहणें कांहीं शोभादायक होणार नाहीं. बरें, कांहींतरी उद्योगाची योजना करून स्वदेशत्याग करावा आणि जावें तरः—

पद—पदिंचे रुण झुण पैजण वाजति, ही चाल.

मन हें गुणगण पाहुनि गुंतत शशिवदनेपाशीं ॥
नहो शांत मन चंचलताही सुटत पडुनि पाशीं ॥
॥धृ० ॥ मधुर वचन दिननिशीं वदे ती ॥ सेवा
गुण पाहतां विनयवती ॥ रत्नसदृश वंशीं ॥१॥

असो. कांहीं असलें तरी जाण्यासाठीं तिची कशी तरी समजुत करणें भाग आहे. (स्मरल्यांसारखें करून) अहा हा! तिचा एकेक सद्गुण आठवला ह्मणजे या मोझ्या मनाला वारंवार जसें कांहीं आनंदाचें भरतें

येऊं लागतें. खरोखर जर कोणी शोधूं लागला, त त्याला कांहीं अशी सुशील व सर्व शुभगुणसंपन्न स्त्री सांपडणार नाहीं. भगवंता,—

साकी.

पूर्वी केलें सुकृत तयाचें हें फल ऐसें आलें ॥
परी क्षणिक हो सहवासाचे सुखांत अंतर झालें॥
आज्ञा जनकाची ॥ आहे पूर्ण न ती काची॥१॥

तरी आतां अशा विचारांत राहून अधिक वेळ काढण्यांत कांहीं हांशील नाहीं. तिच्याजवळ जाऊन सर्व खरा प्रकार सांगण्याचा उपक्रम केला पाहिजे. मग यथावकाश काय प्रकार निदर्शनास येईल तो खरा. (असें बोलून तिच्या जवळ जातो.)

तारा—(त्यास पाहतांच विनयानें उठून) अग बाई! असं काय हें? विचारांत पडल्याप्रमाणं मुखेंदु सचिंत दिसत आहे, याचं कारण काय तें या दासीला कळविण्यासारखं असेल तर कळवावं अशी प्रार्थना आहे.

ता०ना०—सखे, तुला न सांगावें असें जगांत निदान मजपाशीं तरी कांहीं नाहीं. तरी आज जो विलक्षण प्रसंग आलेला आहे तो तुला सांगूं नये असें प्रथम वाटलें होतें; पण न सांगून गत्यंतर नाहीं आणि या मुखानें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं.

तारा—न सांगून गत्यंतर नाहीं, असं जर निश्चयात्मक ठरलं आहे; तर काय प्रकार घडून आला आहे

ती. कृपा करून मला सांगावा. अशानें माणसाच्या म-
नाला भलताच कांहीं, तरी संशय उत्पन्न होतो व तो
जाच मात्र करीत राहतो यासाठीं तरी सांगा—

पद—बहुत छळियलें, ही चाल.

अशुभ निपजलें ॥ प्रिया काय विधिबलें ॥धृ०॥
दैवें जरी दिलें तोषें, नयलेशें मायापाशें॥ सजलों
संसार कराया ॥ या सुखाची अवगुणी, करित
हानि वाग्बलें ॥ १ ॥

ता०ना०—सखे, तुला आतां काय सांगावें बरें ?

पद—क्या सोहाए रंगे.जो ही चाल.

गे वियोगें सुखांत पडे भंग॥जंनक वदेरे न योग्य
तव ढंग ॥धृ०॥ जा घर सोडुनि दूर विदेशीं ॥
न दावि मुख मज नकोच तव संग ॥१॥ कुलास
लाविसि कलंक अद्भुत ॥ तुझ्या गुणें मम जगांत
बदरंग ॥ २ ॥ सुपुत्र नससी खरोखरिच तूं ॥
क्षणांत करशिल कुंबेरही खंक ॥ ३ ॥

असा प्रकार झाला, ह्मणून तुला मोठ्या कष्टानें सां-
गतों कीं, वडिलांच्या आज्ञेप्रमाणें आतां मला हें शहर
सोडून कोणीकडे तरी जाणें भाग आहे.

तारा—ठीक आहे; चलावें. मी ही आपली सेवा
करण्याकरितां आपणां बरोबर येणार.

ता०ना०—तुला बरोबर घेऊन जाणें योग्य दिस-

णार नाहीं आणि सुखावहही होणार नाहीं; यासाठीं तुला सांगतों कीं,—

पद—जिन सुख पलीयां गुडियां खेलियां, ही चाल.

व्रत नियमानें असणें सजणें हेंच तुझें व्रत तूं पाळीं॥धृ०॥ख्यातशील तव रक्षिल तुजला, पूर्ण चतुर तूं गुण शाली॥शांत रहा, सन्मार्ग पहा, तुज काय कथावें यावेळीं ॥१॥ योग्य सोय मज लागे तोंवरि वाट पहा, मनिं धीर धरी॥शोक न करि, मन ईशचरण जन विविध वदे माजवी कळी॥२॥

तारा—प्रियकरा, हें असें कसं सांगणं? आपणांवांचून मला एकेक क्षण युगाप्रमाणं भासूं लागेल. या जगांत या अनाथ व दीन अबलेचा त्राता दुसरा कोण आहे बरं? एक आपला आधार सुदृढ आहे, असं निश्चयानं मानून राहणाऱ्या या दासीनं या ठिकाणीं काय आहे असं समजून रहावं बरं? प्राणनाथ—

पद.

तव विरहें बहु त्रास ॥ प्रियकरा ॥ होइल दु:सह स्वास ॥ धृ० ॥ मीन जळाविण राहील जैसा ॥ तैसी गति नाथा होईल मजला ॥ तळमळ तळमळ मद्देहाला ॥न्यावें संगें या दासीला ॥ योग्य असे ही तव सेवेला॥न रुचे मज सुखवास॥ खरोखर॥

ता० ना०—विरह व्यथा तुज जाळील भारी ॥

सत्य असे परी हे शशीवदने ॥ मानसीं चिंता किमपी न करणें ॥ परमेशातें हृदयीं स्मरणें ॥ पातिव्रत्यां त्वां आचरणें ॥ ठेविं मम वचनीं तूं विश्वास ॥ सखे० ॥ प्रियकरा ॥ २ ॥

तारा—प्रिया, कृपा करून या दासीला सेवा करण्यासाठीं बरोबर न्याल तरच ही सुखी होईल. हे चरण दृष्टीस पडत असले ह्मणजे प्रवासांत कितीही दुःखें होवोत तीं सर्व सुखरुपानेंच समान होतील.

ता०ना०—छे छे हें तुझं बोलणं योग्य नाहीं. माझ्याजवळ जें कांहीं आहे त्या रकमेनें तुझी एक वर्षाची व्यवस्था करून जातों आणि एका वर्षांत कोठें तरी योग्य व्यवस्था लावतो आणि मग तुला घेऊन जाईन, काळजी करूं नको. जर तूं पतिव्रता आहेस तर हट्ट न करतां माझें ऐक.

ता०—असं बोलल्यावर कोणती स्त्री अधिक बोलणार आहे? असो जाणारच तर ज्या वस्तूकडे पाहून माझं समाधान होईल अशा कांहीं खुणेच्या वस्तू तरी देऊन जावं ह्मणजे त्या वस्तूकडे तरी पाहून मी आपले विरहाचे दिवस कंठीन.

ता०ना०—ठीक आहे. चल अंतःपुरांत, तुला तशा कांहीं वस्तु देतों आणि मग आनंदानें तुझा निरोप घेतों. चल—(तिजसहवर्तमान उठतो.)

तारा—(आकाशाकडे पाहून) आई जगदंबे, विंध्यवासिनी, जगज्जननी—

पद—रही अकेलि मेरिजान, ही चाल.

रक्षि सदा पतिराय ॥ भवानी ॥ प्रार्थित वंदुनि पाय ॥ भवा०॥धृ०॥ अभय विजय दे जये सदा स्मरवुनियां सदुपाय ॥ आश्रय लावी श्रम हरी दावुनियां दृढ ठाय ॥ भ० ॥ १ ॥

ता०ना०—(मागील पदाचा अंत्रा.)

अमलमना ही मर्मांगना मजविण आश्रयहीन ॥ छाया इजवरि तूं करी जगताची तूं माय ॥ भवानी ॥ रक्षि सदां सति काय ॥ २ ॥

(असें बोलून दोघें निघून जातात.)

अंक ४ था.

(तदनंतर बालराजा बलसिंह आपल्यां मंत्रिमंडळासह दरबारांत बसला आहे व गुणावगुणांबद्दल सहज भाषण चाललें आहे, तों पडदा उघडतो.)

रा०बलसिंह—मंत्रिवर्य हो, तुह्मां सर्व वयोवृद्धांहून माझा अनुभव अधिक आहे असं बोलणं हें आपलं अज्ञान व्यक्त करणं होय. तर तसें न घडो, अशी जरी इच्छा आहे; तरीः—

साकी—जोगी,

सौंदर्याचा लेश नको जन रूप न पाहे कांहीं ॥
कला कुशलता शील सदोदित मानावें लोकांहीं ॥
चाले रीति.अशी॥मिळवी मान सगुणराशी॥१॥

प्रधान—वाहवा! हें भाषण ऐकून अज्ञान व्यक्त केलं असं कोण ह्मणेल ?

राजगुरु—एकंदर गुणावगुणाच्या संबंधानें पाहतां सद्गुण जेथें असतील तेथें शोभणारच व ज्यापाशीं असतील त्यास शोभविणार, हें निर्विवाद होय. कसें न्यायाधीश ?

न्यायाधीश—आपलें भाषण सत्य आहे, पण कित्येक कला व गुण असे आहेत कीं, ते विशेष स्थलीं विशेष शोभा देणारे होतात, जसें:—

दिंडी

सुस्वरूपें स्त्रीजनीं लाभ होतो॥ परी वेश्या स्त्री
रूपलाभ घे तो॥ मिळेना इतरां जगीं उलट रीति॥
रूप गरतीची विघडवितें नीती ॥ १ ॥

रा० बलसिंह—नीति व अनीति संबंधानें विचार करून वागणें हें मानसिक सुदृढपणावर अवलंबून आहे असें मी समजतों.

प्रधान—हेंच खरें आहे महाराज. आपले विचार निर्विवाद आहेत.

सेनापति—कोणी कांहीं ह्मणो. मी तर असें समजतों कीं नृत्य व गायन ह्या कला स्त्रीजातीला जितकी शोभा देतात, तितकी शोभा इतर कोणासही देत नाहींत. गाणें ऐकावयाचें तर तें स्त्रीचेंच ऐकावें. तसेंच नृत्य.

राजगुरु—अहो, पण पातिव्रत्य गुण स्त्रियांस विशेष शोभविणारा आहे. नृत्यगानकुशल स्त्रीस पातिव्रत्य संभाळणें कठीण पडेल व जड जाईल.

रा० बलसिंह—मानसिक विचार कायम करून मग त्याप्रमाणें वागावयाचें, अशी ज्या मनुष्याला संवय आहे त्याला कोणताही प्रकार कठीण वाटणार नाहीं. मग ती स्त्री असो किंवा पुरुष असो. त्या संबंधाचा विचार करण्याचें कारणच नाहीं.

प्रधान—हेंही खरेंच आहे. पण यांत एक मोठा विलक्षण प्रश्न उत्पन्न होतो; तो असा कीं, जी स्त्री नृत्यगायनांत निपुण आहे; ती पतिव्रता असेल कीं नाहीं?

रा० बलसिंह—खरेंच, हा एक चमत्कारिक प्रश्न आहे खरा. तर बोला, गुरु महाराज, प्रधानजी विचारतात त्या प्रमाणें नृत्य गायनांत प्रवीण असूनही पतिव्रता अशी या जगांत एक तरी तरुणी सापडेल कीं नाहीं ?

राजगुरु—सगळ्या जगाची जबाबदारी माथीं घेऊन उत्तर देणें कठीण आहे, तरी आह्मीं आपल्या बुद्धिप्रमाणें असें ह्मणतों कीं, नृत्य गायनांत निपुण असून पतिव्रता स्त्री मिळणें या जगांत कठीण आहे.

एक सर०—हेंच खरें आहे. आधीं या जगांत पतिव्रता स्त्री मिळणें कठीण. त्यांत जी नृत्य गायन कलेंत निपुण, तीच पतिव्रता अशी सांपडणें हें फारच कठीण आहे. मी तर आजपर्यंत या जगव्यवहारांत राहून जे अनुभव संपादन केले आहेत त्यावरून निश्चयात्मक सांगतों कीं, आधीं तरुण स्त्री असून ती पतिव्रता सापडणें हें संशयास्पद; त्यांतही महाराज ह्मणतात तशी असून पतिव्रता ह्मणजे मोठाच भ्रम ! प्रत्येक तरुणी आपाल्या पतीच्या दृष्टीनें पतिव्रता आहे, हें मात्र खरें आणि यावरच प्रत्येकानें आपापल्या मनाचें समाधान करून घेत असावें तरच सुख आहे.

ता०ना०—हें बोलणें फारच साहसाचें आहे. ज-गांत एकही तरुणी पतिव्रता नाहीं किंवा नव्हती असें ह्मणणें ह्मणजे प्रत्येकानें आपापल्या माता, बहिणी इत्यादिकां विषयीं संशयांत राहणें ठरेल. सर्व जगाची हामि घेऊन दोषास्पद भाषण करणारानें थोडा तरी विचार करून मग बोललें पाहिजे. प्रत्यक्ष राजसभेंत बसून असें अन्यायप्रचुर भाषण करणें हा एके प्रकारें अप-राध होय !

ए०स०—कबूल ! अपराध खरा; पण तो केव्हां ! आमचें हें बोलणें जेव्हां कोणी तरी समर्पक व सप्रमाण खोडून काढील तेव्हां.

ता०ना०—आपलें बोलणें ऐकून सर्व निवांतच बसतील असें आपलें मत आहे कीं काय ? अहो, तु-मचें हें बोलणें ऐकून घेऊन उत्तर न देतां बसणें ह्मणजे प्रत्येकानें व्यभिचारजन्यत्व कबूल करून मुकाट्यानें बसणें होईल. तर बोला; पहिल्यानें तुह्मींच सांगा. तु-मच्या घरांतील सर्व तरुण स्त्रियांच्या संबंधानें आजप-र्यंत तुह्मीं याच संशयांधःकारांत पडून राहिलां आहां काय?

ए०स—आमच्या घरच्या संबंधानें तुह्मीं आह्मांला निदान याप्रसंगीं तरी कांहीं विचारूं नये. तुह्मांला आपल्या भाषणाच्या समर्थनास्तव जें कांहीं बोलावयाचें असेल तें मात्र आनंदानें पाहिजे तर कांहीं प्रतिज्ञा क-

रून बोलावें. ज्या प्रतिज्ञा होतील त्या यथास्थित प्रकारानें पूर्ण करविण्यास महाराज समर्थ आहेत.

रा०बलं०—आतां असा शुष्क संवाद न वाढवितां प्रत्येक भाषण करणारानें आपल्या आपल्या मुख्य मुद्यावर यावें आणि मग जें बोलणें तें पाहिजे तर आपापल्या शक्त्यनुरूप प्रतिज्ञा करून बोलावें. त्या प्रतिज्ञेप्रमाणें वागविण्याचें काम आह्मीं आपल्या जबाबदारीवर ठेवतों. तर बोला, पहिल्यानें जगांत पतिव्रता स्त्री सांपडणें कठीण ह्मणणाराचें काय बोलणें आहे ? बोला.

ए०स०—बोलायाचें काय ? मी खात्रीनें असें ह्मणतों कीं, रूपवती असून तरुण अशी स्त्री या जगांत सांप्रतकालीं पतिव्रता सांपडणें कठीण आहे. असें असतां जर कोणी तशी स्त्री दाखवील व ही पतिव्रता आहे असें सप्रमाण सिद्ध करील, तर त्या स्त्रीच्या पातिव्रत्या संबंधानें मी स्वतः प्रयत्न करून तिची परीक्षा घेईन आणि त्यांत हरलों तर महाराज जी शिक्षा सांगतील ती भोगण्यास मी कबूल आहें.

ता०ना०—असें आहे तर आतां सांगतोंच, माझी विवाहित धर्मपत्नी रूपवती, तरुणी आणि नृत्यगायन कलेंत निपुण आहे. कोणी कशीही प्रतिज्ञा करून जरी गेला, तरी तिचें पातिव्रत्य त्याच्यानें हरण करवणार नाहीं, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री आहे. तर

ज्याची इच्छा असेल त्यानें जाऊन तिचें पातिव्रत्य हरण करून यावें. त्या कर्मांत जय संपादन करून आल्या-बद्दल तो जर या सर्व सभाजनांसह महाराजांच्या मनाची खात्री करून देईल; तर महाराज मला जी शिक्षा सांगतील ती मी धैर्यानें भोगीन व आजपर्यंत खोट्या समजांत राहून आयुष्य फुकट घालविलें, ह्मणून पश्चात्तापरूपी प्रायश्चित्त करीत राहीन.

रा०ब०—शाबास! याला ह्मणावें खात्रीचें बोलणें. (सरदारास) बोला आतां; विजयवर्मन्, बोलण्याप्रमाणें करणी करून दाखविण्याचें सामर्थ्य आहे तुमच्यांत? इतकें झाल्यावर आतां तुमच्यानें माघार घेववणार नाहीं, हें जरी स्पष्ट दिसत आहे, तरी विशेष दृढता व्हावी यासाठीं विचारतों.

स०विज०—बोलण्या प्रमाणें चालण्याची शक्ति याच्यांत असेल कीं नाहीं; या संबंधानें महाराजांनीं मुळींच संशयांत राहूं नये. आतां हे नवीनच महाराजांच्या चरणांचा आश्रय धरून राहिलेले सरदार तारानाथ सभेंत बसले आहेत; यांजकडून महाराजांनीं त्यांच्या स्त्रीचें वास्तव्य स्थान सांगवावें आणि कृपा करून तिकडे जाण्याबद्दल मला निरोप व्हावा, इतकीच काय ती प्रार्थना आहे. यांच्या स्त्रीचें पातिव्रत्य हरण करून जर न आलों तर महाराजांच्या मनास वाटेल

ती शिक्षा करण्यास महाराज समर्थ आहेत व ती भोगण्यास मीही राजी आहें.

रा०ब०—फार उत्तम आहे. बोला; (सावकार पुत्रास) तारानाथ आपण आपल्या पतिव्रता व तरुण स्त्रीचें नांव आणि वास्तव्यस्थान आह्मां सर्वांसमक्ष या विजयवर्मजींला सांगा आणि ते तिकडून परत येत तों पर्यंत आपल्या सुशील स्त्रीचें मानसिक स्थैर्य व पातिव्रत्य कायम राहण्याबद्दल आनंदानें ईश्वरस्मरण करीत रहा. या प्रकरणाचा निकाल लागे तों पर्यंत तुमच्यावर नेमलेल्या सर्व सरकारी कामगिऱ्या माफ केल्या आहेत.

सर०साव०पुत्र—(नमून) ठीक आहे. जशी महाराजांची आज्ञा. मी आनंदवल्ली या नांवाच्या प्रसिद्ध नगरींत राहणारा आहें हें तर प्रसिद्धच आहे. माझी स्त्री ही सांप्रत त्याच नगरींत राहणारी झाली आहे. तिचें नांव तारा. ती नृत्यगायन कलांत निपुण असल्याबद्दल त्या साऱ्या नगरीला ठाऊक आहे. जा; पाहिजे तर शोध करा आणि तुमच्या मनाची निराशा होई तों पावेतों पाहिजे तितके प्रयत्न करा.

सर०विज०—ठीक आहे. बसा आतां हरि हरि ह्मणत आनंदानें. मी आपल्या प्रतिज्ञे प्रमाणें काम करून आल्यावर मग आनंदाची व तुमची चुकामुक होईल. (राजास नमून) महाराज, आतां मला आज्ञा

असावी. बोललों आहें त्याप्रमाणें तिच्या पातिव्रत्यरूप अभेद्य दुर्गाचें एकाक्षणांत तुकडे करून या तारानाथाचे वेडेचार पाहण्यासाठीं येतों. अशी कामें आजपर्यंत या पंचोनें किती केलीं आहेत त्याची गणती नाहीं.

रा०ब०—कोणतेंही कृत्य करण्याच्या आधीं वल्गना करण्यांत कांहीं अर्थ नाहीं व तसें बेचव बोलणें शोभतही नाहीं. कसें प्रधानजी ?

प्रधान—खरें आहे. विजय वर्मन्, आतां अधिक बोलूं नका. तुह्मीं प्रतिज्ञा केली आहे, त्या प्रतिज्ञेप्रमाणे वागून दाखवा. चला, आतां वेळ लावूं नका.

सर०विग०—(सजास नमून व सर्वांकडे पाहून) आतां मी महाराजांस अत्यंत विनयानें नमून सर्वांचा निरोप घेतों. इतक्या निकरावर येऊन हे तारानाथ आपल्या हातानें आपला नाश करून घेत आहेत.

प्रधान—(तिरस्कारानें) चला चला आतां. त्यांच्या लाभहानीच्या संबंधानें आतां तुह्मांला विचार करायाला नको.

सर०विज०—ठीक आहे. चाललोंच हा—पहा. (असें बोलून जातो.)

रा०ब०—सभाजन हो, खरोखर जर विचार केला, तर आजच्या या सभेंत सार्वजनिक संतोष उत्पन्न होणारी गोष्ट झाली असें ह्मणतां येणार नाहीं. तारानाथाची स्त्री जर खरोखर एकनिष्ठ पतिव्रता असेल; तर

त्या बापडीचा विनाकारण छळ करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल दोष मात्र आपणां सर्वांच्या मस्तकीं येणार आहे. पण जर ती खरोखर पतिव्रता नसेल, तर तिचा दोष उघडकीस आणल्याचें श्रेयही येणार हें जरी ठरल्यासारखें आहे, तरी तो गौणपक्ष. एकाद्याची प्रकृति अशी नाजूक असते कीं, ती ज्या बाजूकडे वळविण्याचा प्रयत्न करावा, त्या बाजूकडे वळते. तसा प्रकार जर असला, तर पातकास उत्तेजन देणारांत आपली गणना होईल. तोही प्रकार कांहीं चांगला नाहीं. असो. प्रधानजी, आतां कांहीं विशेष काम उरलें नसेल तर सभा विसर्जन करा.

(या प्रमाणें बोलताहेत तों जवनिकापतन होतें.)

[तदनंतर विचारांत निमग्न झालेला सरदार विजयवर्मा प्रवेश करितो.] .

विज०—काय करावें? कनकावती सोडून या आनंदवल्लीस येऊन आज दोन दिवस झाले. जेथें राहिलों आहें; तेथें तारेचा शोध लागला; पण तीं सर्व मनुष्यें तिला एखाद्या देवीप्रमाणें मान देतात. तिच्या वागणुकींत दोष ठेवण्यास अगदीं जागा नाहीं असें सांगतात; तर तिच्यापर्यंत आपला प्रवेश कसा व्हावा? कोणी तरी आपल्याला तिच्यापर्यंत नेऊन पोंचवील तर आपण त्याचे ते श्रम कांहीं फुकट घेणार नाहीं. त्या-

बद्दल तो जें मागेल तें त्याला देऊ. पण तसा मनुष्यही अजून दृष्टीस पडत नाहीं. या कामांतले दलाल कोठें दिसून येत नाहींत हा तरी एक चमत्कारच आहे म्हणावयाचा ! आज एकानें एका करीमखांचें नांव सांगितलें आहे व याच मार्गांत त्याचें घर आहे असें त्यानें सांगितलें आहे. पण तोही अजून कोठें दिसत नाहीं. तेव्हां काय करावें ? फिरावें तरी किती ? (या प्रमाणें बोलून इकडे तिकडे फिरतो, तों आपल्याशीं विचार करीत असलेला करीमखां येतो.)

करीमखां०—क्या करना ? ऐसा बख्त आया है के आज चार दीनमें कोई सेठ साहुकारकी मुलाकत होनी मुष्कील पडी है. पल्लूं मे देखना तो खडम् खडखड ! एक अधेलेकी कोडीभी हाथ लगती नहीं. घरकी औरत तो बैठने नहीं देती. उधर बच्चोंके तरफ देखना तो वह बेटीके बाप हरदम काट काटके खानेका वख्त लाते हैं. इस्के वास्ते बाहेर आया तो दस पांच औरतें यजीखां साहेब ! यजीखां साहेब !! कर के जी निकाल लेनेका मोका मालूम करती है. उन्के वास्ते रोजके नये नये सेठ और सावकार कहांसे पैदा करना? चलो, (इकडे तिकडे फिरून) आजके सहलमें क्या होता है सो देखना. कोई सखीका लाल मिलेगा तो बेडा पार हो जायगा.

स०विज०—(करीमखांस पाहून) हां कोण बरें फिरत आहे? बहुत करून हाच तो असावा. (कांहीं थांबून) हो, हाच तो. हा शुभ सूचक उजवा डोळा लवत आहे, या वरून आजचा व्यापार लाभदायक होईल असें वाटतें. तर आतां पुढें व्हावें आणि चौकशी करावी (पुढें होऊन व करीमखांस समोर गांठून) सलाम हो मियां साहेब, सलाम!

करीमखां—सलाम-सलाम-अलेकम सलाम! क्यंव् साहेब, क्या इरादा है?

विज०—इरादा क्या कहूं? जो आप मेंहेरबानी करोंगे तो अपने ताकदके मुवाफिक काम काज कहेना ऐसा दिलमें आया है.

करी०—अजी साहेब, सेठ साहेब, मेंहेरबान कदरदान, कहो तो सही; कौनसी चीजके उप्पर आपकी दिललगी हुयी है? और कौनसे रंडीने आपका दिल घेर लिया है. किसीकी मुलाकात लेने चाहते हो?

विज०—(आपल्याशीं) शाबास! मी ज्याच्या भेटीची इच्छा करीत होतों, तोच हा आहे यांत संशय नाहीं. आतां तिच्या विषयीं याजपाशीं चौकशी केली तर कांहीं सुगावा लागेल खरा. (उघड) खां साहेब, इस गांवकी सब खूपसुरत औरत आपके ध्यानमें है? कहो तो.

करी०—हां-हां-, सब औरत हमारे निगामे है, खुप सूरत औरत हमार जैसेके नजरमें नही रहेगी, तो फेर किसके ख्याल मे रहनेकी आप समजते हो ? आप पूंछो, बस. इंदरके अखाडेकी परीभी होवे तो सेठ-जीके सामने हाजर करूं गा. औरतोंके बाबदमें पूंछो मत. बस, नाम कहो.

विज०—इस शहरमें कोई तारा नामकी औरत बडी खुपसूर और गाने नाचने वाली है ऐसा सुना है. उस औरतको आप पछानते हो ? कोई कहेगा तो उसकूं बुला लाओगे ? कहो और उस बाबतमे आपक्या चाहते हो सोही कहो.

करी०—तारा-तारा-तारा ! (आकाशाकडे प-हात) गाने नाचने वाली, और बडी खुपसूरत औरत तारा. (कांहीं वेळ विचार करून) हां वह रंडी तारा ! है- तारा नामकी एक रंडी है सच. लेकिन वह हातमें आनेका काम बडा मुष्कीलका है. वह तो एक मर्दसे निका करके गोषेमे जा बैठी है. उसीके सिवाय दूसरे औरतका नाम कहो, तो ला देवेंगे. वह नही मिल-नेकी साहेब.

विज०—वह नही मिलनेकी तो तुमारा कसब काय का ? इंदरके आखाडेकी परी ला देनेकूं तयार होनेवाले एक गांवके रंडीके बाबदमें ऐसी तेढी बात

सुनानें लगे तो फेर सब काम खतम हुवा ऐसा मानना चाहिये.

करी०—कैसाबी समजो साहेब. आपजो तारा कहते हो, वो तो मिलनेकी मुष्कील है. वह कुच बजारकी रंडी नहीं. अपने मर्दके साथ गोषा पकडके रहने वाली औरत कैसी हाथमें आवेगी ? हमारा यत्न हुवा तो बी उस ताराके सामने हार खानेकू एक पलख बी नही लगनेका, दुसरीका नाम कहो तो झटपट ला देवेंगे.

विज०—दुसरीका नाम मतलोजी. चहिये तो वह तारा. वह कैसी मिलेगी उस्का रस्ता ध्यानमें होयगा तो कहो और अपने मेहनतका दाम लो.

करी०—दामका नाम बताते हो, और तारासे काम रखते हो; सोतो बारा बरसमेबी नही होनेका, ऐसा समजो. दुसरी औरत कहोजी, तारा क्या है ?

विज०—ताराके सिवाय दूसरी औरत हम चाहते नही. वह मिलनेकी रहा जो मालूम होवेगी तो कहो.

करी०—वह तो मिलनेकी नही. अव्वल वह तारा जिस रंडीके घरमें रहीथी उसीकी मुलाकत चाहते होंगे तो चलो हमारे साथ.

विज०—बहोत अच्छा. चलो. अव्वल उसीकी मुलाकत लेवेंगे. (दोघे जातात.)

(तदनंतर आपल्या एका पालक कन्येसह कुंटीण प्रवेश करिते.)

कुंटीण—(मुलीस) चंद्रे, ये बाई अशी माझ्या जवळ. कधीं एक वेळ वयांत येशील आणि माझा धंदा सुरू होईल असं मला झालं आहे. ती बिचारी तारा जरी एक मार्गी होती; तरी तिच्या पासून तोटा नव्हता. तिच्या गाण्या नाचण्यावरच फिदा होऊन शेट सावकार लोक पैका देत असत. तिच्या मोबदल्यांत एकदम चांगली मोठी रक्कम येण्याची वेळ आली, तेव्हां विचार करावयाचा तो केला नाहीं. एका क्षणांत शाश्वत हानि करून घेतली.

मु० चंद्री—बाई, आतां थोडक्याच दिवसांत मी होईन मोठी. काळजी कां करितां ? कोणी तरी शेट सावकार आज येणार हें मी सांगून ठेवतें. तो जिचं नांव सांगेल तिला बोलावून आणलीत कीं पैकाच पैका, काय कमी आहे ?

कुंटीण—तोंडानं बोलण्यांत हुशार आहेस एवढं मात्र खरं आहे.

चंद्री—कोणी जर आजच्या दिवसांत आलं नाहीं! तर असं बोला मग हवंतर. त्याच्या आधींच काय म्हणूनं ? (याप्रमाणें बोलताहेत तों विजयवर्मा व करीमखां येतात.)

करी०—(विजयवर्म्यास) चलो आघाडी साहेब वह बैठी है सोही वह है ठेरो, मै आघाडी जाकर सब तर्तूद लगाताहूं. (पुढें जाऊन) ओ जम्रा बाई, ओ बुढ्ढी, सुनती है या नही? अरी जरा निगातो दे. बुढ्ढी बनरही है तोबी सालीका आदा क्या है देखो!

कुंटीण—(करीमखांस) कांरे मेल्या येताक्षणीं तोंड सोडलं आहेस? (विजयवर्म्यांकडे पाहून) यावं महाराज; असं उभं काय ह्मणून रहावं? बसावं त्या लोडाजवळ. हें आपलं गरीबाचं घर आहे.

विज०—गरीबाचें घर आहे तर आह्मीं ही कांहीं मोठे राजे रजवाडे आहोंत असें नाहीं. आणखीं असें आहे कीं, गरज लागली ह्मणजे कितीही श्रीमंत असो, त्याला गरीबाच्या घरीं यावें लागतें. तशाच कांहीं कारणानें आह्मीं तरी तुमच्याकडे आलों आहों.

कुंटीण—असं आहे तर ठीक आहे. सांगा कोणतं काम आहे तें? कोणती सुंदरी तुमच्या मनांत भरली आहे? तिचें नांव, गांव ठिकाण कांहीं माहित आहे? कीं फक्त तिला पाहिलेल्या ठिकाणच्या खुणाच माहीत आहेत?

विज०—बाई, तुह्मीं आपले सगळे प्रश्न एकदम केलेत हें तरी एकेप्रकारें चांगलें झालें असें मला लागावें लागतें. आतां मी ज्या सुंदर तरुणीच्या संबंधानें

तुमच्याकडे आलों आहें, तिची प्राप्ति जर करून द्याल तर तुह्मीं जें मागाल तें तुह्मांला देऊन खुष करीन. तिचें नांव, गांव, सर्व कांहीं मला ठाऊक आहे. तरी अजून ती माझ्या दृष्टीस पडलेली नाहीं.

कुंटीण—चिंता नाहीं. नांव ठाऊक आहे नां? तें सांगा आणि पोटाला द्या, ह्मणजे ज्या वेळीं सांगाल त्या वेळीं ती तुमच्या सेवेला हजर आहे.

विज०—अहो, थांबा जरा. तिचें नांव ऐकलें ह्मणजे तुमचें हें बोलणें जागच्याजागीं थंड होऊन राहील.

कुंटीण—तुह्मीं मला कोण समजतां महाराज? ही नांवाची जमना आगलावी आहे बरं. हा धंदा आज बारान् बारा चोवीस वर्सं करतें आहें. माझा पराक्रम तुह्मीं अजून काय पाहिला आहे?

विज०—तुमचा पराक्रम जर मोठा आहे आणि हा धंदा चोवीस वर्षें करून यांतील अनुभव जर पूर्णपणें मिळविला आहे; तर तुमच्याच या गावांत एक तारा या नांवाची तरुणी आहे, ती पहिल्यानें तुमच्या घरीं होती, ह्मणून सांगतों कीं, तिलाच घेऊन या बरें. दुसऱ्या आणाल त्यांची गोष्ट राहूं द्या.

कुंटीण—ही मात्र मोठीच गोष्ट सांगितलीत खरी. अहो महाराज, जरी ती तिच्या लहानपणांत माझ्या

वरीं होती; तरी आतां तिच्यावर माझा हक्क नाहीं. एकानें तिच्याबद्दल भरपूर रक्कम भरली आणि तिला मजपासून नेऊन तिच्याबरोबर लग्न लावलें. तेव्हां पासून ती एकनिष्ठ पतिव्रता बनली आहे. तुह्मांला काय सांगूं ? मला तर आतां तिचें दर्शन ही घेणें कामाचं नाहीं.

विज०—झालें. मी जें ह्मणत होतों; तेंच निदर्शनास आणलेंत. अहो उठा; प्रयत्न करा; नाहीं काय ह्मणतां ? तुह्मांला जें पाहिजे तें मागा. कमी करूं नका. लहानपणीं जी तुमच्या जवळ होती, ती तुमच्यानें आणवेना ? मग तुमचें कसब तें काय ?

कुंटीण—तिच्या संबंधानं पाहतां आमच्या या कसबाला आगच लावली पाहिजे हें खरें आहे. तुह्मीं दुसऱ्या एखादीचं नांव सांगा आणि तिला आणून हजर करतें कीं नाहीं तें पहा. भलतीचेंच नांव सांगाल तर तिला कसं आणतां यावं बरं ? त्या तारेजवळ आजपर्यंत कोणाचें ही शहाणपण चाललें नाहीं व पुढें चालणार नाहीं. तुह्मीं दुसरी एखादी मागा हो. तारेचाच नाद धरून काय बसलां आहां ! तीच एवढी काय चांगली काढलीत ?

विज०—खरा प्रकार काय आहे तो आतां तुह्मांला सांगूं का ? तो ऐकलात ह्मणजे मी तारेचाच नाद धरून कां बसलों आहें तें तुमच्या ध्यानांत येईल.

कुंटीण—हो. सांगा काय प्रकार आहे तो! ऐकूं द्या तरी एक वेळ.

विज०—त्या तारेचा पति हल्लीं कनकावतींतील बालराजा बलसिंहाचे आश्रयास जाऊन राहिला आहे. त्या दरबारांत अजून त्याची चांगली मान्यता आहे. आह्मीं ही त्याच बालमहाराजाचे आश्रित एक सरदार आहों. तो तारेचा पति व आह्मीं सदोदित त्या राजाचे दरबारांत बसणारे आहों. एके दिवशीं त्या सभेंत मंडळी सहज बोलत असतां जी तरुण स्त्री नृत्यगायनांत निपुण आहे; ती पतिव्रता असूं शकेल कीं नाहीं? त्या वेळीं आमचें व त्या सभेंतील बहुतेक मंडळीचें बोलणें असें पडलें कीं; तशी स्त्री पतिव्रता सांपडणार नाहीं. पण हें बोलणें तारेच्या त्या पतीला पसंत पडलें नाहीं, त्यानें सांगितलें कीं, माझी स्त्री तारा ही नृत्य गायनांत निपुण असूनही पतिव्रता आहे. तिचें पातिव्रत्य कधींही मलीन होणार नाहीं अशी माझी पूर्ण खात्री आहे. तसें असतां जर कोणी प्रतिज्ञेनें जाऊन तिचें पातिव्रत्य मळघून येतों असें ह्मणेल, तर माझा समज आजपर्यंत खोटा होता व त्या खोट्याची खात्री सांगून मी दुसऱ्याला त्रास दिला, याबद्दल महाराज जी शिक्षा सांगतील ती मोठ्या आनंदानें भोगीन. या प्रमाणें त्याचें बोलणें ऐकल्यावर मी

ही तिचें पातिव्रत्य मळवून येण्याबद्दल प्रतिज्ञा करून येथें आलों आहें. तर कसेंही करा, जें पाहिजे तें मागा आणि एक वेळ तिची व आमची भेट होईल असें करा. नाहीं ह्मणूं नका.

कुंटीण—त्या तारेच्याच संबंधानें जर तुह्मीं प्रतिज्ञा करून आलां असलां, तर खात्रीनें सांगतें कीं, ती कांहीं तुह्मांला लाभणार नाहीं. त्या बाबतींत मी अगदीं फसलें आहें; असें समजून मुकाट्यानें चालते व्हा.

विज०—ती मिळाली नाहीं ह्मणून मी येथून मुकाट्यानें चालता होईन; पण तेथें जातांच आमचे महाराज शिक्षा सांगून ती भोगण्यासाठीं पाठवून देतील तेव्हां कसें करूं? ह्मणून सांगतों कीं, कांहीं तरी करा आणि मी कांहीं वेळ तरी तिच्या जवळ राहून आलों, अशी तिच्या नवऱ्याची मला खात्री करून देतां येईल असें कांहीं तरी साधन करून द्या. मी तुमचे उपकार ठेवणार नाहीं.

कुंटीण—तसें साधन तरी मला कसें साधून देतां येईल? मोठ्या अडचणीची व कठीण कामगिरी ही. खरोखर सांगतें कीं, हें काम माझ्या हातून होणार नाहीं.

विज०—असें सांगूं नका. शांतपणानें घटकाभर बसून विचार करा, आणि ज्या वस्तु पाहतांच तिच्या पतीची खात्री होईल अशा एक दोन तरी वस्तु पैदा क-

रून आणा. त्याबद्दल कितीही खर्च झाला तरी मार्गें पुढें पाहूं नका. तो खर्च मी भरून देईन आणि त्याशिवाय तुमच्या श्रमाबद्दल जें माझ्या मनाला वाटेल तें आनंदानें देईन.

कुंटीण—तुमचा फारच आग्रह आहे, तर आतां सांगतें असें करा. आजच्या प्रमाणंच उद्यां सकाळीं माझ्या घरीं या. त्या तारेची एक दासी माझ्या चांगली ओळखीची आहे; तिला आज रात्रीं बोलावून आणीन आणि तिच्या नवऱ्यानें तिला आपल्या प्रीतीच्या व अहोरात्र जवळ बाळगण्यासारख्या खुणेच्या ह्मणून ज्या कांहीं वस्तु दिल्या असतील त्या जर तिच्या हातीं लागण्यासारख्या असल्या तर विचारून पाहीन.

वि०—विचारून पाहीन ह्मणूं नका; तशा ज्या जिनसा तिच्या प्रयत्नानें हातीं येतील त्या तुह्मीं आपल्याजवळ घेऊन ठेवा. तूर्त खर्चायला हे घ्या. तिलाही त्या बद्दल कांहीं द्यावे लागेल तर द्या आणि आपल्या कामाचे धोरण ठेवा. आतां मी कांहीं तुम्हाला अधिक सांगत नाहीं. सर्व प्रकार तुमच्या ध्यानांत आहेच तेव्हां हयगय होईल अशा विषयीं काळजी बाळगण्याचं कांहीं कारण नाहीं.

कुंटीण—चंद्रा जाग बाई त्या चमकीच्या घरीं आणि तिला मी बोलावलं आहे असं सांगून आपल्या बरोबर घेऊन ये.

चं०—तिला मी आपल्या बरोबर घेऊंन येऊं? पण ती जर घरांत नसली आणि मला भेटलीच नाहीं तर?

कुंटीण०—अवदसा जायच्या आधींच तक्रार करते आहे पहा. अग पोटजाळे ती जर तुला भेटली नाहीं तर तिच्या त्या थेडर्या ह्मातारीला माझा निरोप सांग आणि ती कोठें गेली असेल तेथून घरीं येतांच मी बोलावलें आहे असं सांगून मजकडे पाठवून द्यायला सांग. आणि तूं परत ये समजलीस.

चं०—असं आहे तर ठीक आहे ही मी निघालेंच पहा. आणि जर ती मला भेटली तर तिला बरोबर घेऊन आलेंच समजा (जाते)

कुंटीण—एकेक जो येतो तो निराळ्याच तऱ्हेचा. मेल्यांचा एकाशीं एकाचा मेळ घालीन ह्मणावं तर तें कांहीं साधायचं नाहीं. असो आतां ती चमकी आली ह्मणजे तारेकडचा समाचार काय आहे तो तिला विचारीन आणि कांहीं लाग साधला तर पाहीन. तिच्या नवऱ्याची खात्री होण्यासारखी कांहींतरी जिन्नस मिळविली पाहिजे खरी तरच हा मेला चांगला फोडायला सांपडेल (चंद्री व चमकी येतात.)

चं०-त्या बघ बाई तुझीच वाट पहात बसल्या आहेत.

च०—कशाला हो बाई मला मुद्दाम बोलावणं पाठवलंत!

कुंटीण—अग सहज फार दिवस झाले तूं दृष्टीस पडेनास तेव्हां ह्मटलं आतां मुद्दाम बोलावणं पाठविल्या-शिवाय कांहीं त्या पोरीची भेट होत नाहीं. असो बोलावणं पाठविल्या प्रमाणं आलीस त्यामुळें मनाला संतोष वाटला. तुझी मालकीण तारा आतांशीं बरी आहेना? तिच्यावर तरी माझा पोटच्या पोरीसारखा लोभ आहे पण० काय उपयोग? आमचा धंदा पडला हा असा. हा कांहीं तिच्या मनाला आवडत नाहीं आणि त्यामुळेंच ती माझ्या घरीं येत नाहीं व माझी भेट ही घेत नाहीं.

च०—त्या मोठ्या आनंदात आहेत; तरी आलीकडे यजमानांचा वियोग झाला असल्याकारणानें जरा खिन्नतेनें राहूनच वेळ घालवीत आहेत. तुह्मांला काय सांगूं बाई. आमच्यासारख्या गरीब माणसानं जर चाकरी करायची तर त्यांच्यासारखी दयाळू मालकीण पाहून तिचीच करावी.

कुंटीण०—अग ती तशी चांगलीच आहे हें मला पहिल्यापासून ठाऊक आहे पण आतां तुला असें विचारतें कीं तिचा नवरा जेव्हां प्रवासास निघुन गेला तेव्हा त्यानं तिला आपल्या आठवणीसाठीं कांहीं प्रीतीच्या वस्तु देऊन ठेवल्या आहेत कीं नाहीं?

च०—दिल्या आहेत तर. एक खंजीर, एक रुमाल, आणि एक आमच्या ताराबाईची तसबीर जी त्यांना मनापासून आवडत असे तीही शेवटीं ते तिच्या जवळ

ठेऊन गेले आहेत त्या वस्तू माझ्या बाईसाहेब जिवापलीकडे बाळगून ठेवित असतात. रोज एक वेळ तरी त्यांना त्या पाहाव्या लागतात मग त्यांत काय एवढं मोठं आहे तें कांहीं मला कळत नाहीं.

कुंटीण—मोठं काय असायचं त्यांत ? तिला नवऱ्याचं वेड आहे त्यामुळं त्याच्या प्रीतीच्या वस्तू आपणही नित्य पहात असावं असं समजून ती पहात असेल पण कायग ? त्या वस्तू एक वेळ मला पाहायच्या आहेत, जर युक्तीनं एक घटकाभर चोरून आणून देशील तर मी तुला जें मागशील तें देईन तर बोल आणशिलका त्या एक वेळ मजकडे ?

च०—त्या मला कशा आणायला सांपडतील बाई त्याना त्या एक क्षणभरही विसंबत नाहींत.

कुंटीण—वेडीच आहेस. जेवणाचे वेळीं—तुळशीला पाणी घालायच्या वेळीं—निजताना तर कांहीं ती त्या काढून पाहत बसलेली नसतेना ? आपल्या लाभासाठीं माणसानं सावधगिरीनें झटून प्रयत्न करीत असावं तरच सुख मिळतं हें तुझ्यासारखीला जर अजूनही कळेना तर कधीं कळावें ? या साठीं सांगतें असें कर तूं अहोरात्र तिच्या घरांत वागणारी आहेस. आजरात्रीं निजतांना त्या कोणत्या जागीं ठेवते तें पाहून ठेव आणि तिला झोंप लागली कीं हळूच त्या उचलून मजकडे घेऊन ये म्हणजे झालें. शेंपन्नास रुपये सहज हातांत ये-

तील ते फुकट काय समजून घालवणार तूं. जा आतां नाहीं होय करीत बसून वेळ गमाऊं नको.

च०—बरं आहे बाई मला जर त्या मिळाल्या तर आणून देईन. पण त्या पाहून मला परत घाल ना ? नाहीं तर त्या बद्दल त्या किति रागावतील सांगवत नाहीं.

कुंटीण—देईन ग देईन. जा. तूं मोठी तीचं भय बाळगणारी आहेस तें मला आहे ठाऊक. सांगितलेलें काम करून आपला फायदा करून घे.

च०—ठीक आहे जातें तर आतां मी.

कुंटीण०—जा विसरूं नको बरं ? लवकर दिवे लागतांच घेऊन ये तुझा कांहीं तोटा होणार नाहीं (चमकी जाते) हें तरी एक काम झाल्यासारखंच आहे आतां तो आला ह्मणजे त्याला चांगला नागवला पाहिजे. चंद्रे, चल बाई आतां; ज्या कामाची काळजी होती त्याची व्यवस्था लागल्यासारखी आहे खरी (जातात)

(विजयवर्मा येतो)

विज०—(आनंदानें) वाहवाग वाहवा जमना कुंटीण ?. हें काम मात्र आज तर बेमालूम केलेंस. शाबास. आतां महाराजाकडे जाऊन हां हां ह्मणतां त्या तारेच्या पतीला हरवीला व “ माझ्या स्त्रीनें व्यभिचार केला खरा ” असं त्याच्या तोंडानें वदवून प-

तिज्ञेप्रमाणें त्याला शिक्षा भोगण्याकरितां तुरुंगांत पाठवीन. येथें आलों त्यावेळीं जरी माझी भीतीनें गाळण झाली होती तरी आतां कांहीं चिंता नाहीं. इतक्या सर्व खाणाखुणा मिळाल्यावर मी तिच्या घरांत नव्हतों असं कोंण म्हणेल ? (करीम येतो)

करी०—अरे वह बेटीका बाप भाग जाता है अब पकडना चाहिये उस हराम जादेकूं—सलाम हो महाराज टूंटिया साहेब—बनी बनकर ठनक ठनक करते कहा चले हो.

विज०—(स्वगत) वाहवा आज स्वारीची जीभ जरा लांबल्याप्रमाणें भासते. असो (उघड) क्यों ऐसा छनक भनक क्या कर रहे हो जरा होषमें तो आजाव खांसाहेब.

करी०—अरे हां हां हमतो होषमैही है. लेकीन तू एक बडा. आदमी बेहोष बनके भाग जाता है इसके वास्ते घडी पल वैसाही बनना पडतां है. क्यौंके जैसे कू वैसा. लाव बाबा हमारा मेहनतका दाम और हलाव मुकाम.

विज०—क्या मंगता है बे ? तेरे मेहनतका दाम ? जा जा बेटीके बाप कर आपना काम. बे काम बनके हरामका दाम चाहने वाला सरंजाम चाहता है मिय्या साहेब मुहमोडो और रस्ता छोडो

करी०—वाहवा वाहवा पहिले की बात सब भूलगये हों ? सरदार साहेब ? इज्जत चाहते होगे . तो ऐसे

फज्जत खोरके लब्ज मुहसे मत निकालो. पहिले तो यह करीम कोसीकू छोडनेका नही और छोडे गा तो दाम लिये बिघर छोडनेका नही. अव्वल मैने किसीकी सतांता नही और जो कोई मेरे पैसे डुबाकर जानेंका इरादा कर रखता है उस्का हात पकडकर रस्तेमें खडे खडे दाम मिन लिये बिगर छोडता नही. महाराज साहेब महाराज साहेब ? पैसा निकालो और आपनी रस्ता सुधारो.

विज०—ऐसे लंबी लंबी बातों करनेवाले मैंने बहोत देखे हैं. (लोटून) चल छोड रस्ता नही तो लगाऊं एक थप्पड.

करीमखां०—अबे हराम जादे (अंगावर जा०) मेरे पैसे डुबाके भाग जाता है ? खडा रहे हराम खोर तूं मेरेकू क्या समजता है. निकाल पैसे; नहीं तो मारूंगा एक लाथ—(त्यास अडवितो व मारामारी क०)

विज०—चलबे वे इज्जतके, भडवे तुं क्या मुझे जानता है ? तेरे जैसे चोर आजतक मैंनेबी बहोत देखे हैं, रोके हैं और ठोकेबी हैं. (दोघे मारामारी करीत निघून जातात.)

(तदनंतर बालराजा बलसिंह सभासदांसह बसला आहे तों पडदा उघडतो.)

राजा०—कोणी कांहीं ह्मणो. माझें तर असें मत आहे.

पद—जगाके जोबनलुटा ही चाल.

नृपोत्तम न्यायें विलसतसे ॥धृ०॥ नय विहिनातें

निंदिति अवघे ॥ शांति सौख्यं त्याला नच गवसे ॥ न्यायें ॥ १ ॥ मान मिळेना सत्य कळेना ॥ कार्य लेशं नचले उद्धारें ॥ न्यायें ॥ २ ॥ यास्तव नृप पद लाभे त्यानें ॥ आराधावें सत्य विशेषें ॥ ३ ॥

राजगुरु—खरी गोष्ट आहे नृपवर्या. या वयांत तुझा समज असा झालेला पाहून मजसह तुझे सर्व हितचिंतक तुझें अभीष्ट चिंतन करीत आहेत. तुझ्या पित्यानें कांहीं दिवस या राज्यासनावर येऊन येथील लोकांस अन्यायप्रवर्तक करण्याचा पाया घातला होता पण त्याचें तें करणें दयाळु ईश्वरासच आवडलें नाहीं.

राजा०—माझ्या जनकाची बुद्धि कृति व स्थिति आरंभीं पूर्ण न्यायशुद्ध होती. त्याच्या व आमच्या पूज्य जननीच्या उपदेशानेंच लहानपणापासून आमच्या मनांत न्यायरूपी महातरूचें बीजारोपण झालें होतें. आमच्या निष्कांचन कुटुंबव्यवस्थेमुळें जेव्हां पित्याला अतिशय ताप उत्पन्न झाला. तेव्हां त्यानें कंटाळून गृहसंसाराची आशा सोडली आणि सर्व त्याग करून अरण्यवास करण्यासाठीं जातों म्हणून निघून गेले. त्यानंतर त्यांस सुदैवानें या राज्याची प्राप्ति झाली. पण त्यामुळें त्यांच्या मनांतील न्याय नीतीचा अगदीं लोप होऊन गेलेला पाहण्यांत आला. पुढचा सर्व प्रकार सर्वांस ठाऊकच आहे. (खिन्न होतो.)

प्रधान—त्या संबंधानें महाराजांच्या मनांत खिन्न-

ता उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. आपल्या जनकांच्या मनांतील न्यायबुद्धीचा जरी लोप झाला होता; तर त्या संबधानें आपणांस कोणी नांव ठेऊं शकत नाहीं आपण असाच न्यायमार्गाचा अवलंब करून रहाल तर कांहीं दिवसांनीं कोणी त्याची आठवणही काढणार नांहीं.

राजाव०—असो आह्मी किती जरी त्यांच्यासाठीं खिन्न होऊन बसलों तरी त्यांनीं जें केलें तें लोकांच्या ह्रत्पटलावर अक्षय होऊन राहिलें. त्याचें स्मरण न करितां आपण आपला व्यवहार सुधारून करावा हें खरें आहे. (कांहीं थांबून) पण काय हो ! आपले ते तरुण सरदार विजयवर्म आमच्या (सावकारपुत्रा कडे हात करून) या नवीन मित्राच्या पतिव्रता स्त्रीच्या संबंधानें प्रतिज्ञा करून गेलेले आहेत, त्यास आज किती दिवस झाले ?

प्रधान०—त्यांस जाऊन फार दिवस झाले खरे. मला असे वाटलें कीं ज्यापेक्षां त्यांस इतके दिवस लागले आहेत, त्यापेक्षां त्यांस तें कार्य असाध्य झाले असावें असें माझें मत आहे.

तारा०—असाध्य झालें असावें अशा संशयांत राहून कां बोलतां ? तें कर्म त्यांस असतध्य व्हावयाचें अशी माझी तर खात्री आहे. माझी स्त्री खरोखर पतिव्रताच आहे, म्हणून तर मी प्रतिज्ञा करून आनंदानें ग्रसलों आहें.

प्रधान०—तुमच्या प्रतिज्ञे प्रमाणें ती बिचारी पातिव्रत्य संभाळुन राहो, म्हणजे सर्व प्रकारें आनंद आहे. कोणीही अन्यायवर्ती असूं नये.

तारा०—आपला संकल्प उत्तम आहे आणखीं मी खात्रीनें सांगतोंः—

पद—इष्कामें तेरे काई गम; ही चाल.

महा पतिव्रता जरी, पहावया निधी तरी ॥
जगीं न अन्य सुंदरी दिसेल हें खरोखरी ॥ धृ० ॥
फळे सुदैव तेंच ती, वरी मला यदा सती ॥
धरोनि भाव जी अती, सुकार्यभार घे करीं ॥ १ ॥
तिला कुमार्ग दाउनी, करी मलीन या जनीं ॥
असा न जन्मला धनी, मला गमे सुरासुरीं ॥ २ ॥
प्रभाव थोर पाहुनी, बसेल थंड होउनी ॥
निघेल पाय वंदुनी, अपेश घेउनी शिरीं ॥ ३ ॥

(या प्रमाणें सावकार पुत्र बोलत आहे तों विजयवर्मा येतो.)

विज०—(सावकार पुत्राचे शेवटचे शब्द ऐकुन) बहुतकरून आपली ही गर्वोक्ति आपल्या स्त्रीच्या संबंधानेंच चाललेली असेल.

तारा०—असें तर खरेंच. आपण गेला होतां तर चांगलाच सन्मान पावून व मना जोगता पाहुणचार घेउन आलांच असाल !

विज०—यांत काय संशय ? महाराज आतां आप-

ण करां तयारी मोठ्या घरांत जाऊन चैनीनें ज्ञ
खात पडण्याची.

तारा०—आधीं आपण जाऊन काय पराक्र
गाजवून आला आहां ते ऐकूं आणि मग जाण्याची
आली तर करूं तयारी.

विज०—तयारी न करून कराल काय ? खात्र
देण्यासारखा पक्केपणा आहे, असें समजून खात्र
दिलीत पण गळ्याला कात्री लाऊन घेतलीत, हें मात्र खरें

प्रधान०—अहो विजयवर्म, तुम्हीं आलेत ते इकडे
तिकडे न पाहतां त्यांचेच जवळ वादविवाद करी
बसलेत हा काय प्रकार आहे ? राजसभेंत येऊन वागावें
कसें ! हें तुम्हांला अजून कसें कळलें नाहीं ?

विज०—तें मला कळलें आहे. पण येथें आलो
तो यांच्याच बोलण्याच्या ओघावर बोलत राहिलों, त्या
मुळें असा प्रमाद झाला. तर त्याबद्दल या दासानुदासा
महाराजांनीं क्षमा करावी. (राजा पुढें जाऊन नमतो)
महाराज, आपल्या समोर प्रतिज्ञा करून गेल्याप्रमाणें
जयसंपादन करून आलों आहें ! तर त्या संबंधानें
आतां जें विचारावयाचें असेल तें मला विचारावें.

राजा०—या या आमच्या नूतन सरदारांच्या प
तिव्रता स्त्रीची व तुमची भेट झाली होती कीं काय
तो सर्व प्रकार सांगा आणि त्या संबंधानें त्यांच्या
मनाची खात्री करून द्या म्हणजे झालें. तुम्हीं आपल्या

निर्तून पार पडलेत. तर बोला. तेथें जाऊन काय काय
लेंत ? तिची भेट घेतलीत ?

विज०—मुस्ती भेटच काय विचारावी ? थेट पर्यंत
जल मारून गेल्या प्रमाणें चैन करून आनंदानें परत
आलों आहें. एकंदरींत पाहतां ती बायको लोकोत्तर
रूप व गुण संपन्न आहे यांत संशय नाहीं. तिच्या-
सारखी जगांत शोधूं गेल्यास विरळा.

राजा०—तें नाहीं आम्हीं तुम्हांला विचारीत. तुम्हीं
या संबंधानें प्रतिज्ञा करून गेले होतेत, त्याचें काय
केलेंत ? तें सविस्तर सांगा.

विज०—तिच्या पातिव्रत्या संबंधानें यांना भ्रम आहे
एवढें मात्र खरें आहे. बाकी हे डौल मारतात त्यांतला श-
तांशही तिच्या ठिकाणीं नाहीं. पतीच्या समोर सलज्ज ली-
ता व पातिव्रत्यप्रदर्शन करीत असावें, हा जो धूर्त स्त्रियांचा
साधारण धर्म आहे, त्यां धर्माप्रमाणें ती यांच्या समोर
वागत होती त्यामुळें हे भोळे बिचारे फसले आणि विचार
न करितां उतावळेपणानें महाराजांच्या समोरप्रतिज्ञा
करून फसले आहेत. दुसरे काय म्हणावें ? बाकी ती
चतुर, सुरूपवती नृत्यगायनांत निपुण अशी आहे हा प्रत्यक्ष
अनुभव पाहून मी आलों आहें, बाकीच्या निर्लज्ज कृतीचा
विस्तार माझ्यानें करवत नाहीं. तरी तिच्या पातिव्रत्याचा
भंग करून मी आलों आहें, हें सांगतों यावरून महारा-
जांनीं व सभासदांनीं समजून घ्यावें आणि काय तो

विचार करावा.

प्रधान०—अहो, तुम्हीं जर यांच्या स्त्रीच्या संगतींत कांहीं वेळ घालवून आलां आहां, तर यांच्या महालाच्या कांहीं खुणा सांगा; त्याचप्रमाणें खुणेच्या कांहीं वस्तु संपादन करून आणावयाचें तुमचें काम होतें, त्या जर आणल्या असाल तर दाखवा आणि त्यांची खात्री करुन द्या.

विज०—ऐका. यांचें तें घर किंवा वाडा पूर्वाभिमुख आहे व त्यांत यांचा रंगमहाल उत्तरेकडच्या माडीवर पिंवळ्या रंगानें रंगविलेला आहे. समोरच एक पिंपळाचा पार आहे.

प्रधान०—असल्या क्षुल्लक खुणांनीं खात्री होणार नाहीं. हे प्रकार तो वाडा दुरून पाहून साधारण शोध केल्यासही कळणारे आहेत. अशी खूण सांगा कीं जी ऐकतांच यांच्या हृदयांस पटेल.

विज०—यांच्या घरांत जी कुळंबीण आहे तिचें नांव चमकी. यांचा निजण्याचा पलंग काळा भोर शिसवीच्या लांकडाचा आहे; त्यावर जाळीदार मच्छरदाणी सोडलेली आहे. पान सुपारीच्या तबकांत जो चौफुला आहे त्यावरील मोराची पिसें नील व पाचूच्या जडावानें बनवलीं आहेत.

साव०—हे प्रकारही साधारण शोधांनीं समजण्यासारखे आहेत.

प्रधान०—खरें आहे. तुम्हीं जर तिचें पातिव्रत्य हरण करून आलों म्हणतां तर तिच्या पासून कांहीं प्रीतीचीं खूणही आणलीच असाल, तर ती दाखवा.

विज०—ठीक आहे. ही पहा खूण. हिच्यावर यांचें नांवही आहे. (कटार काढून प्रधानाच्या हातांत देतो.) आपण पहा व त्यांसही दाखवा.

प्रधान०—(इकडून तिकडून फिरवून पाहून.) ठीक आहे. (सरदार पुत्रास देऊन) पहाहो ही वस्तु तुमच्या ओळखीची आहे ? पहा नीट तपासून.

साव०—(कटार इकडून तिकडून पाहून) ओळखीच्या सारखी दिसते खरी. पण अशा वस्तु गडी माणसांस लांच लुचपत देऊन संपादन करितां येतील, त्यांतलाच हा प्रकार आहे. एवढ्यावरूनच ती भ्रष्ट झाली अशी खात्री होत नाहीं.

प्रधान०—खरें आहे. एवढ्यावरून मना सारखा पुरावा मानतां येत नाहीं तर वजयवर्म, दुसरी जर कांहीं खात्रीलायक वस्तु संपादन करून आलां असाल तर ती दाखवा. नाहीं तर शेवटच्या विचारास लागा.

विज०—असें आहे तर ही एक दुसरी वस्तु पहा. ही आमच्या उभयतांच्या प्रीतिसंबंधाची खुण. आमच्या जवळ सदोदित रहावी म्हणून तिनें मुद्दाम आग्रह करून दिली आहे. ही खूणही सरदार महाराजांस ओळख पटवील. (असें बोलून आंगठी पाहून व ती

सावकार पुत्रा जवळ देऊन) पहा हो, ही वस्तु तरी तुमच्या ओळखीची आहे ? बोला. कांहीं झालें असलें तरी संकोचुं नका.

साव०—(आंगठी पाहून आपल्याशीं) ही आम-च्या लग्नांतली खूण आहे खरी. पण एवढ्या वरूनच तिजविषयीं संशय कसा धरावा? (उघड) अशा वस्तु ही आशाबद्ध सेवकांस लोभांत गुंतवून संपादन करितां येतात.

प्रधान०—खरें आहे. (विजयवर्म्यास) अहो, आतां असें करूं नका. तुम्हीं जर निर्वाणची म्हणून एखा-दी वस्तु संपादन करून आणली असली तर ती दाखवा आणि यांच्या मनांतील भ्रम दूर करा.

विज०—ठीक आहे तर ही घ्या. (तारेची तसबीर काढून प्रधानाजवळ देतो.) ही आम्हाला सदोदित आठवण रहावी म्हणून आमच्या पाशीं आलेली आहे !

प्रधान०—(तसबीर लक्ष्यपूर्वक पाहून) मुखावर सात्विक वृत्तीचें अलोट तेज दिसत आहे. असें असतां कसें काय झालें असेल तें असो. (सावकार पुत्राच्या हातांत तसबीर देऊन) पहा हो आपण.

साव०—(तसबीर पाहतांच खिन्न होऊन) अरेरे! घात झाला खरा ! ! व्यर्थ व्यथ ! आजपर्यंत मी व्यर्थ अभिमान धरून बसलों. (हातांतील तसबीर बाजूस ठेऊन खिन्न होत्साता अधोवदन करून बसतो.)

राजा०—काय हो ! हरलेत वाटतें ! होय, तुमची

पुत्रश्रीच त्याची साक्ष देत आहे. असो. प्रधानजी, आतां गुरुवर्यांसह विचार करून यांस प्रतिज्ञाभंग दोष निवारणार्थ प्रायश्चित्त सांगा.

प्रधान०—आतां महाराजांच्या मुखांतून जें येईल तेंच त्यांस प्रायश्चित्त.

राजा०—असें आहे तर यांनीं सभेंत बसून व्यर्थ वल्गना केल्याबद्दल पांच वर्षपर्यंत कारागृहवास करावा, असें माझें मत आहे.

प्रधान०—(मागें पाहून) कोण आहेरे सेवक !

(चौबे शिपाई येऊन उभे राहतात.)

प्रधान०—पाहतां काय ! यांस महाराजांच्या आज्ञेवरून पांच वर्षें कारागारांत रहावयास पाठविलें आहे असें वरूपाक्षास सांगा.

चौबे०—(सावकारपुत्रास) उठा महाराज चला आतां.

साव०—(उठून व दुःखित होऊन)

पद—हार मिळे हार ही चाल.

हार मिळे हाय, मला हार मिळे हार ॥ कीर्ति मरे
ठार, मला घोर जडे फार ॥ धृ० ॥ नांव बुडे
पार, जगीं मींच कुलांगार ॥ खंति हो अपार थिजे
सर्व सद्विचार ॥ स्त्रीचरित्र थोर खरें वाट विकट
फार ॥ चूक पडे त्यांत अडे सर्व कारभार ॥ १ ॥

चवथा अंक समाप्त.

अंक ५ वा.

(तदनंतर तारा चिंताग्रस्त होऊन विचार करीत बसली आहे तों पडदा उघडतो.)

तारा०—(खिन्न व शोकातुर होऊन)

पद—हिज्रे सनतमे जिंदगी ही चाल.

कांताविणें हो सर्वही आक्रांत या जनीं ॥
त्यांच्या वियोगें दुःखिता एकांतिं राहुनी ॥ कां०
त्रास हो भय गेह दावी अवघें गमे उदास ॥
भ्रांतसा अति जीव भावी विसरे हिताहितास ॥
अपमान मानी प्रीतिच्या लोभास सोडुनी ॥ १ ॥

हाय हाय! प्राणनाथ कशी हो तुह्मांला इतक्यांतच या दासीची विस्मृति झाली ?

पद—या विरहा कां भीसी, ही चाल.

मीन जलाविण जैसा॥ नाथा, मीन ज०॥धृ०॥
तळमळ करुनी जीव हि सोडी ॥ माझा प्राणहि तैसा, नाथा, मी० ॥ १ ॥ विरह न सोसे यावरि मजला ॥ देहाचा न भरौंसा, नाथा, मीन० ॥ २ ॥ काय चुकी मम झाली कळवा ॥ विटलों प्रीतिविलासा, नाथा, मी० ॥ ३ ॥

(कांहीं थांबून) पण यावरून माणसानं समजावं तरी काय! कांहीं संकटांत पडले आहेत आणि त्यामुळं सुखरूप असल्याबद्दल पत्र पाठवावयास बनत नाहीं, असं जर ह्मणावं तर त्यांचा सुविचार

त्यांस संकटांत पडूं देणार नाहीं बरं, तसा कांहीं प्रसंग नाहीं? असं मानावं तर इतक्यांतच माझं विस्मरण कसं झालं! पण तें कां व्हावं! तुझ्या शिवाय दुसऱ्या स्त्रीचं पाणिग्रहण मी करणार नाहीं असं मला वचन देतांनां ज्यांनीं पूर्ण विचार केला होता, ते इतक्यांतच विसरले असतील असं मानतां येत नाहीं. (कांहीं थांबून) असा प्रकार जर आहे तर या वियोगाच्या संबंधानं काय मानावं!

पद—दुःख पूछत मेरा कोई नहीं ही चाल.

शांति नाहींच, मोठी भ्रांति मनीं ॥ जाच खरोखर होतो जनीं ॥ धृ० ॥ प्राणपतीविण स्त्री दीन लोकीं ॥ त्याची प्रतीतीच पाहें झणी ॥ ॥ जाच० ॥ १ ॥ मंदिर हें शून्य त्यांविण भासे ॥ प्रीतींत ही रीति गुणी ॥ जाच० ॥२॥

असो. देवा, या भियकराशीं गांठ घातल्यापासून सर्व दुःखं लयास गेलीं, असं मनाला वाटूं लागलं होतं आणि पूर्वीच्या सर्व गोष्टी विस्मृतींत टाकून आनंदांत रहावयास पहात होतें. तों हें वियोगरूपी जबरदस्त दुःख तयार करून त्याचाही अनुभव दाखविलास, यावरून विधिरेषा काय व कशी आहे तें कळत नाहीं, असं जें ह्मणतात तेंच खरं हें मला आतां चांगल्या प्रकारानं कळून आलं यांत अगदीं संशय राहिला नाहीं. तरी आतां—प्राणनाथाच्या शोधाच्या संबंधांत अजून तूं

काय केलं आहेस ? तर असं कामावं नहीं.

पद—चलो हमारे देस हो जोगिरा, ही चाल.

प्रियास शोधिन मी फिरोनी ॥ अवनि फिराया करीन न कमी ॥ धृ० ॥ कार्यतरूचें सुफल पहाया ॥ होईल कोण श्रमी ॥ कांत पदावरि भाव जियेचा ॥ या जगीं ती नियमी ॥ १ ॥

असं आहे तर पहिल्यानं प्रयत्न करून त्यांच्या शोधास लागलं पाहिजे. या गांवांत त्यांच्या संबंधानं कोणाजवळ कांहीं विचारावं तर कोणाची ओळख नाहीं. त्यांचे वडील, मातुःश्री व भाऊबंद पुष्कळ आहेत; पण त्यांनीं कोणांचंही मत न घेतां माझं पाणिग्रहण केलं, ह्मणून त्या सर्व आप्त मंडळींचा त्यांच्यावर कोप झालेला आहे आणि त्या कारणानंच जर त्यांस प्रवासी व्हावं लागलं आहे तर मला त्यांचा शोध कोण सांगणार ? कोणाला कांहीं विचारायाला गेलें तर उलट माझा उपहास मात्र करतील. असा प्रकार आहे तर आपले मनोविचारच आपल्या गुरुस्थानीं मानले पाहिजेत. (कांहीं थांबून) हो, ठरला हाच विचार खरा. ज्या वेळेस त्यांचं जाणं झालं तेव्हां आणि कांहीं दिवस पर्यंत "सुखरूप आहें हल्लीं राजाश्रयं मिळाला आहे." इत्यादि अनेक प्रकारांचीं पत्रं येत असत तीं कनकावती नगरींतूनच येत असत. तर प्रथमं त्याच ठिकाणीं जाऊन शोध घेणं भाग आहे.

(कांहीं थांबून) असं एकेक संकट आहे पहा. अशा या वेषानंच जाईन ह्मटलं तर मध्यंतरीं अनेक प्रकारचीं संकटं येण्याचा संभव आहे. असा प्रकार आहे तर कोणता विचार करावा बरं ?

(इतक्यांत हातांत पत्र घेऊन चमकी दासी येते.)

चमकी—ताई साहेब घ्या बाई. फार दिवस काळजी करीत बसलां होतां, तर आतां हें घेऊन वाचा आणि हा हिरमुसलेपणा सोडून द्या.

तारा०—(दासीनें दिलेला लखोटा मागून पुढून फिरवून पाहून) अक्षर तर त्यांचंच आहे. पण बाई हें पत्र हातांत आल्यापासून उरांत धडकी भरल्यासारखं झालं आहे. या वरून यांत कांहीं आनंदजनक वर्तमान नाहीं खास. (कांहीं थांबून) असो. कांहीं असलं तरी कांय आहे तें वाचून पाहणं भाग आहे. (असें बोलून पत्र उघडून मनन करीत बसते.) हर हर हर ! (अत्यंत दुःखानें) इतके दिवसपर्यंत एकनिष्ठपणानं वागून शेवटीं कपाळीं हें अपेश आलं ! पण असा हा प्रकार झाला तरी कसा ? तिकडून इथं आला होता कोण ? आणि कोणाजवळ मी बदकर्म केलं ? देवा ! तूं सर्वसाक्षी आहेस. तर आतां या संकटसमयीं मी काय करावं याबद्दल तूंच माझ्या मनाला प्रेरणा कर. (असें बोलून विचार करीत बसते) खास हें पत्र तरी त्यांनीं पूर्ण कोपानं लिहिलं आहे,

ह्मणूनच असा मजकूर—

पद—सुकुमार असुन तूं फार ही चाल.

अनिवार तुझा कुविचार मार तव भारी काम तव भारी ॥ कळलें हें मज शेवटीं निंद्य तूं नारी ॥ विश्वास ठेउनी खास भोगितों त्रास विजय घे वैरी विजय घे वैरी ॥ तूं कलंक लाउनि घेसि होसि अविचारी ॥ स्वैरिणी पूर्ण जारिणी परीक्षक ह्मणी परीक्षा सारी परीक्षा सारी ॥ देउनी तुझी ये मला कैद परभारी ॥ करुनियां बंदिवास या कळे कीं स्त्रिया पातकाचारी पातकाचारी ॥धिःकार तुझा विश्वास तोच हो वैरी ॥

या पद्यांतील भावार्थ तुला कळेल अशी खात्री आहेच, तरीही स्पष्टपणा व्हावा, ह्मणून आणखी लिहितों. तूं मला वचन दिलेंस व कांहीं दिवस त्यास अनुरूप अशी वागणुक दाखविलीस; पण तीच माझ्या नांव लौकिकाची नागवणुक झाली! हाय हाय! सगळा दोष माझ्यावर! इथं कोणी माझी परीक्षा पाहण्यासाठीं आला होता आणि तो माझं पातिव्रत्य मळवून गेल्या कारणानं तिकडे कैदेंत पडावं लागलं आहे; पण हें सर्व आज मला कळतं. यावरून यांत कांहीं तरी जबर्दस्त कपट झालेलं आहे. (कांहीं थांबून व विचार करून) कांहीं असो. असा प्रकार आहे तर स्वतः जाऊन व प्रयत्न करून त्यांनां सोडविलं पाहिजे आणि

णो माझं पतिव्रत्य मिळवून आल्याबद्दल विजय संपादन करून राहिला आहे, त्याची चांगली फजिती करून त्याला शिक्षा होईल असं केलं पाहिजे. हो, ठरलंच हें. पण हें सर्व त्या कनकावती नगरींत जाऊन तेथील राजाच्या आश्रयानं होईल तरच याला विशेष शोभा येणार आहे. चला तर प्रवासाची तयारी करा (दासीस) चमके, तूं येशील का बाई माझ्या बरोबर?

च०—मला तर आलंच पाहिजे. आपली चाकरी सोडून या दासीनं दुसऱ्या कोणाजवळ रहावं असं आपण ह्मणतां;

तारा०—तुझी इच्छा असेल तर चल. मी कांहीं तुला नको ह्मणत नाहीं. असो. मग येणार नां तूं? कर तयारी. आपल्या बरोबर कांहीं विशेष लवाजमा घेण्याचं कारण नाहीं. तरी प्रवासांत साधारणपणीं आपल्याला कोणतीही अडचण पडूं नये असं सामान आणि स्वारी निघून गेली त्या वेळीं त्यांनीं दिलेली कटार, लग्नाच्या वेळची आंगठी, रुमाल व स्वारीला मनापासून जी माझी तसबीर आवडत होती, ती. इतकं मात्र घेण्याचं विसरूं नको. प्रसंगीं त्या वस्तूंची गरज लागेल.

च०—(रुमाल कटार इत्यादिक वस्तूंचीं नांवें ऐकतांक्षणीं चपापून) बाई साहेब, आपल्या हुकूमाप्रमाणं सगळं साहित्य घेतें. परंतु—

तारा०—परंतु काय? अशी चपापलीस काय ह्मणून?

च०—(मालकिणीच्या पायावर डोकें ठेऊन.) बाई साहेब, क्षमाकरा, क्षमाकरा, माझ्या हातून मोठाच अपराध झालेला आहे ! आपण दया करून जर मला अभय द्याल तर या अनर्थाचं मूळ जें माझ्या ध्यानांत आलं आहे; तें आपणांजवळ सांगेन.

तारा०—काय ? या अनर्थाचं मूळ तुझ्या ध्यानांत आलं आहे आणि तें मजपाशीं सांगण्यास तुला माझं अभय पाहिजे ? बोलच तर जें कांहीं तूं माझं अप्रिय केलं असशील, तें जर खरं सांगशील तर आनंदानं तुला क्षमा करीन. बोल, काय झालं तुझ्याकडून ? आणि या अनर्थाचं मूळ काय व कोणत्या ठिकाणीं आहे ?

च०—बाईसाहेब, आपण पहिल्यानं जिच्या घराचा आश्रय केवळ निरुपायानं कां होईना ! पण केला होता.

तारा०—होय. केला होता. त्यांत इतकी ओढाताण कशासाठीं बाई ? अग मी कुंटिणीच्या घरीं राहिलें होतें आणि तेथूनच माझ्या प्रियकरानं मला सोडवून आपल्या सेवेस लावलं हें प्रसिद्धच आहे. तरी आतां त्याचा कांहीं संबंध राहिला नाहीं. तिनं माझं नांवही घेऊं नये अशीच व्यवस्था झाली आहे.

च०—तें तर खरंच. पण हा प्रसंग आपणांवर येण्यास कारण तीच होऊन पुनः कशांत कांहीं नाहीं, अशी सांव होऊन बसली आहे ? (आपल्याशीं चरफडत)

पोटजळीनं माझ्या तोंडाला मात्र काळं लावलं दुसरं कांहीं नाहीं.

तारा०—काय ग तें आपल्याशींच पुटपुटलीस ? अग असं काय ! जें कांहीं केलं असशील तें सांग. आतां तुझं त्याबद्दल डोकं मारण्याची सत्ता कांहीं माझ्यांत नाहीं आणि ती असती तरी माझ्याकडून तसं झालं नसतं; यासाठीं अगदीं निर्भय वृत्तीनं सर्व प्रकार सांग, बोल, काय केलं तिनं ?

च०—आपले यजमान ज्या कनकावती नगरींत जाऊन राहिले आहेत, त्या नगरींतून एक सरदार मुद्दाम या आनंदवल्लींत आपणांस पाहण्यासाठीं व आपल्यापाशीं विशेष सलगी करावी ह्मणून तेथील राजसभेंत मुद्दाम प्रतिज्ञा करून आला होता.

तारा—अंग तो तर कधीं माझ्या दृष्टीसही पडला नाहीं हें कसं ? आज तिकडून जें पत्र आलं आहे, त्यांतील मजकुरावरून पाहतां तूं सांगतेस तें जमतं खरं. असो. मग पुढं ?

च०—पुढं काय बाईसाहेब ? इथं येऊन तो जेव्हां चौकशी करूं लागला, तेव्हां त्या कामांत तुला जय येणार नाहीं, असं गावांतल्या सगळ्या लोकांनीं त्याला सांगितलं. पण त्याच्यानं तसंच जाववेना, ह्मणून त्यांनं तुमची गांठ न पडली तरी तिकडे जाऊन भेट घेऊन आल्याबद्दल खात्री करून देतां यावी, असा प्रयत्न

आरंभिला आणि आपल्या त्या जमनाबाईची भेट घेतली पण तिनंही त्याची निराशाच केली. तेव्हां मात्र त्याची अगदीं गाळण झाली. तरी त्यानं प्रयत्न सोडला नाहीं. जमनाबाईला पुष्कळ पैक्याची लालूच दाखवून त्यांनीं आपणांस दिलेल्या कांहीं खुणेच्या वस्तु मिळाव्या ह्मणून खटपट चालविली.

तारा०—बरं, मग ? पुढं काय झालं ?

च०—पुढं काय व्हावं ? मेलीं आमच्या सारखीं जीं माणसं खरोखर जन्मदरिद्री असतात कीं नाहीं; त्यांचा लोभ त्यांस पदोपदीं फजीत करीत असतो. तरी त्यांचे डोळे उघडत नाहींत आणि भिकेची हंडी कधीं शिंक्यावर चढत नाहीं.

तारा०—आतां हें अलंकारिक बोलणं सोडून दे आणि मुद्याचं काय असेल तें सांग.

च०— मुद्दा कांहीं दूर नाहीं बाईसाहेब. त्यानं जमनाबाईला लालुच दाखविल्यावर तिनं एके दिवशीं मला बोलावणं पाठविलं आणि आपल्या यजमानांची कटार, त्यांनीं लग्नांत तुम्हांला दिलेली आंगठी; हातरुमाल आणि त्यांना प्राणापलीकडे आहे असं वाटत असे ती तुमची तसबीर, मला पहायासाठीं क्षणभर आणून दे. आणि दोन घटकांनीं परत घेऊन जा असं मला सांगितलं आणि त्या कामगिरीबद्दल मला पन्नास रुपये दिले व दुसरे पन्नास देऊं केले होते.

तारा०—(कांहीं वेळ विचार करून) तू सांगतेस तसाच प्रकार झालेला असावा; असें आतां माझ्या ही चित्ताला वाटत; पण आतां विचार करीत स्वस्थ बसूनही उपयोग नाहीं तर—

पद०—मैतोशाहाज्या देकू, ही चाल.

पतिला सोडवितें श्रम करूनी ॥ भूप सभेंत करूनि सुगायन दंडिन रिपु कर धरूनी ॥ पतिला सोडवि० ॥ ६ ॥ नायकिणीचा वेष धरुनियां हुडकिन आषक खोटा जाउनि ॥ देत असे जो त्रास विसंगत प्राण पतीस हरवुनी॥ सखये प्राण० ॥ ॥ दूषियली पतिरता वदे त्या लाजविते दम धरुनी ॥

(वेषांतर केलेली तारा चमकीसह नृत्य करीत येते.)

तारा०—(गणिका वेषानें बाहेर येतां येतां)—

पद—कहां गयो गुंया शहा जादा जानी प्यार ही चाल.

त्या प्रियधवा त्वरित मज दावा ॥ जो मम प्राण विसावा ॥ हो सुख जिवा, त्वरित० ॥धृ०॥त्या प्रिय०॥चैन नसे त्याविण दिन रात्रि होत विरह नव ठावा ॥ शांति न जिवा त्वरित मज दा०१ ध्यास सदोदित त्याचा लागे ॥ होत कडू गृहमेवा॥ कोपत शिवा, त्वरित म० ॥ २ ॥ तोषवूनी नृप चोर धराया गणिका वेष धरावा ॥ लागत नवा त्वरित मज दावा ॥ त्या प्रियध० ॥ ३ ॥

असो. या वेषांतराच्या युक्तीला तरी यश येवो आणि प्राणनाथांची मुक्तता होऊन त्यांचा व माझा

अक्षय समागम होवो, एवढीच इच्छा आहे. ती परमेश्वरानं पूर्ण केलीच पाहिजे. (दासीस) सखे चमके, जो हा वेष मी धरला आहे, यानं माझी कार्यं सिद्धि होईल नां ? सांग बाई. तुला कसं वाटतं ?

च०—मला काय वाटावं ? आजपर्यंत आपली कोणती युक्ति फुकट गेली आहे ? मला तर असं वाटतं कीं, या वेषांतराच्या युक्तीसह कांहीं आपणांस दुसरी खेप घालावी लागणार नाहीं. अशाच दरबारांत जाल तर सारं दरबार झटून पहिल्यानं आपल्या कामाकडे लक्ष पुरवील.

तारा०—सगळ्या दरबाराची कांहीं मला गरज नाहीं, माझ्या नृत्यगायनावर राजानं प्रसन्न व्हावं आणि मला 'पाहिजे तें माग' असं सांगावं मात्र ह्मणजे मला माझं इच्छित कार्य साधून घेतां आलंच असं समज.

(मागील पदाच्या आस्ताईस जोडून—श्लोक—शा. वि.)

या लोकीं कुलयोषिता पतिरता वेळेस पाहोनियां॥
घेती वेष अनेक नाथचरणीं सद्भाव ठेवोनियां॥
व्हावा लाभ पतीस हेंच सहसा चित्तांत राखोनियां ॥ धैर्यें वागति त्यां सदा विजय दे सद्धर्म तोषोनियां ॥ त्या प्रियधवा त्वरित म०॥जो०॥
जो सांगे पतिला तुझी प्रियतमा म्यां दूषिली जाउनी ॥ ने चोरून सुवस्तु दाखवुनि त्या दे दंड संबोखुनी ॥ त्याचें कर्म तया पुढें करुनियां त्या लाज वाटावया ॥ सत्याचा अवलंब होय तरि तो संतोष मानावया॥ त्या प्रियधवा त्वरितम०॥नां१॥

(या प्रमाणें गायत व नृत्य करीत दासीसह जाते.)

(तदनंतर आपल्या मंत्रिमंडळीसह दरबारांत बसलेला राजा बलीसह येतो.)

बलि०—पद—आदम मे एवसिफल, ही चाल.

राजा पाहे विपुल सुख तें, सचिव सुमंत्रें अखंड टिकतें ॥धृ०॥ मंत्रित मंत्रबलें नृपतीला ॥ साह्य करित सुरभूसुरमेळा ॥ सकल सुगम कृति अघटितच ते ॥ सचिव सुमंत्रें० ॥ १ ॥ वाढत राज्य धनादिक नेटें ॥ पाहुनि बल अरिचें मन फाटे ॥ स्तविति करुनि शिर नत सतत तें॥सचिव सुमं०

चोप०(मुजराकरून) महाराज, कोणी एक नृत्यगायन निपुण तरुणी दरबारांत व त्यांतही विशेषतः महाराजांनीं आपल्या गुणांची परीक्षा घ्यावी अशा उद्देशानें येऊन उभी राहिली आहे आणि ती याच वेळेस दरबारांत येण्याबद्दल परवानगी मागत आहे.

राज०—नृपवर्या; गणिका, गायक, इत्यादिकांची संभावना करणें, ती केवळ कीर्तिवर्धनास्तवच होय. अशा लोकांची जर योग्य व्यवस्था न राहिली तर अशीं माणसें देशोदेशीं अपकीर्ति गात फिरत असतात. ह्मणून अशांचा परामर्ष पहिल्यानें घ्यावा हेंच होय.

राजा०—असें आहे तर बोलवाच तिला.

चोपदार—ठीक आहे महाराज.

(तदनंतर चमकीसह तारा प्र. क.)

तारा०—पद–गुंय्यांसे मारी बतिया, ही चाल.

वंदीं ही आधीं पायां राया माया ठेवि फार ॥ नृपते न्याय बला ॥ वंदीं ॥ धृ०॥ न्यायें वागे, त्याचें जागे, यश बल लोकीं॥धन्या मान्या लाभे त्यातें सार ॥ वंदी ॥ १ ॥ धर्मे कर्मे, पाहे वर्मे अमल नृपोत्तमा ॥ अन्या वन्या साधेना तो कार ॥वंदी०॥२॥ आलें पायीं, लावी सोयी, भ्रमपट फाडी ॥ मोडी खोडी जोडी बडिवार ॥ ३ ॥

तारा०—(नमून) महाराज, आज्ञा करावी.

प्रधान—त्यांत आज्ञा काय करावयाची? प्रथम कांहीं नृत्यकर, मग गा.

विज०—हेंच खरें. गाणारी व नाचणारी आहे तर तिनें आपला गुण प्रथम दाखविलाच पाहिजे.

तारा०—(एकीकडे दासीस) चमके; ऐकलंसनां हें सभासदांचं भाषण? लहान आहे तरी महानुभाव राजाचं भाषण कोणत्या धोरणावर, आणि हे शाहणे काय भ्रमावर! असो. (उघड) महाराज, आपणां सर्वांच्या इच्छेप्रमाणंच मी वागेन. (असें बोलून व अनेक प्रकारें नृत्य करून गाते.)

पद—कामिनि बन बन आय ही चाल.

साधुनि जनिं धन मान ॥ राहे पाहे॥सा०धृ० ॥ अवखड जड नड पडत तरी ही ॥ राखुनि धैर्य महान् ॥ राहे पा० ॥१॥ चपल सबल पर चतुर

.ठरें जें ॥ तें सुख पात्र न आन ॥ राहे पा०२॥
विपुल कनक धन यौवन मानी ॥ धुंद न ठेवि
मुमान् ॥-राहे पा० ॥ ३ ॥

विज०—अच्छा! अच्छा!! बहोत खाशी चालूं द्या.

तारा—(दासीस) सखे, या महाजन सभेंत बसून असं करणारा असा हा कोण असावा बरं?

चमकी—बाईसाहेब, हाच तो आपल्या आनंदवल्लीस येऊन व आपल्या खुणेच्या वस्तु चोरून नेऊन मोठ्या डौलानं इकडे परत आलेला!

तारा०—असं काय? (त्याजकडे रागानें पाहून) तर मग याची खोड मोडणं भागच आहे. असो—तूं गावं आणि नाचावं हेंच योग्य होय. (गाते.)

पद—फूसलावे फूसलावे ही चाल.

वेणू वाजे त्रिभुवन गाजे साजे गोपाळांचे मेळीं॥
॥धृ०॥ कनककटक मणिमय नग सारे॥ मोरपु-
च्छ शिरमंडन, तोषें धेनूतें प्रतिपाळी ॥ १ ॥
भ्रमत रमत मत पुसत बलातें॥ गोप कुमारी रंजन
करि हरि भेटे सांजसकाळीं॥ २ ॥ क्रीडतसे यमु-
ना पुलिनीं तो॥ तथ्यैया ताथैया नाचे हर्षे वा-
जवि टाळी ॥ ३ ॥

राजा०—नर्तकी, तूं खरोखर गुणवंती आहेस! तुझें नृत्य व गायन आज फारच अप्रतिम झालें. तर आतां तुला जें पाहिजे असेल तें मागून घे.

प्रधान०—महाराजांनीं तिला भाग म्हटलें हें योग्यच आहे!

विज०—अलबत, अलबत, हें एक पात्र आहे खरें.

राजा—(वारेस)

गेऽऽऽऽऽमार्गे, सुरंगी रंगत मित रंग राग संगत
मनिं वागत संकोचाते त्यागी ॥ गेऽ० ॥ धृ ॥
समजे तव मत पूर्णपणानें, उघड जरी वदवेना
॥ सकल कळत परि सांग शुभांगी घे मागोनी
रंगी रंग सुरंगो ॥ गेऽ० ॥ १ ॥

तारा—(चाल—मागील पदाचा अंतरा)

वचनाविण मन होत भयाकुल भूपवरा मज तें
दूणें ॥ स्वमत कथिंन मग भंग नसे ज्या दे ठेवोनी, अंगीं ढंग सुरंगी ही मागे ॥ २ ॥

राजा०—ठीक आहे हें घे वचन. तूं जें मागशील तें तुला देईन किंवा कोणी जर तुझा अपराध केला असेल तर तूं सांगशील त्याप्रमाणें न्याय करीन. बोल, कोणता ही प्रकार मागें ठेऊं नको.

तारा०—पद—तारा सच नहि कहे नारे,

मम ऋणकरि तव सरदार करि फार अविचार
वदवि सकल नर कथि वडिवार ॥ मम ऋ० ॥
बुडवि मजसि मम सत्व हरोनी; राहे निर्भय
तुजपाशीं ॥ राजेंद्रा नयशील सुजाण, तव यश
करि वश वरि सुविचार ॥ मम० ॥ १ ॥

तर महाराज, माझं तेवढं ऋण देववावं आणि स-

रा न्याय करावा इतकंच माझं मागणं आहे; अन्य विनंति कांहीं नाहीं.

राजा०—तुझा ऋणकरी कोण आहे ? त्याचें नांव सांग ह्मणजे योग्य विचार व यथान्याय व्यवहार करण्यास कठीण पडणार नाहीं.

तारा०—महाराज. आपल्या दरबारांतील हे विजयवर्मा नामक सरदार मजकडे येऊन मला दहा हजारांची देणगी कबूल करून पुनःतोंड न दाखवितां निघून आलेले आहेत, हें सत्य कीं मिथ्या त्यांना विचारून पहावं आणि माझें देणं मला देववावं.

विज०—मिथ्या ! मिथ्या ! ! हें भाषण अक्षरशः मिथ्या ! ! ! या स्त्रीला मी ओळखीत नाहीं व कधीं पाहिलेंही नाहीं. असें असतां ही विनाकारण माझी अब्रू घेत आहे, तर दरबारांनेंच याचा विचार करावा.

राजा०—नर्तकी, आमच्या सरदारावर तूं जो आरोप ठेवतेस, तो सिद्ध करून दाखविण्यास तुजपाशीं काय पुरावा आहे ?

तारा०—महाराज, माझा पुरावा चांगला खात्रीलायक आहे; तरी तो करून दाखविण्याचे आधीं जर आपली अब्रू स्मरून माझं ऋण कबूल करतील तरच यांचा थोरपणा मानण्यांत येईल, ह्मणून मी खटपट करून पहात आहे.

प्रधान०—खरी गोष्ट आहे. विजयवर्मजी, संकोच धरूं नका; काय केलें असाल त्याची आठवण करून हें

प्रकरण सामोपचारानें मिटवा. व्यर्थ वाढविण्यांत कांहीं थोरपणा नाहीं.

विज०—तुम्हीं तरी असा पोरपणा काय करता हो ? मला वाटतें कीं, तोंड पाहून भुललेत, पण हें सभ्यपणास उचित नव्हे.

तारा—खरी गोष्ट. प्रत्यक्ष प्रचीत दाखविल्याशिवाय कांहीं आपण आपला जोरावरपणा चित होऊं देणार नाहीं हें आतां चांगल्या प्रकारानं कळून आलं.

राज०—विजयवर्म, ज्यापेक्षां ही नर्तकी राजसभेंत येऊन, आपल्या लोकोत्तर नृत्यगायन कुशलतेवर महाराजांसह सर्वांस—त्यांत् तुम्हांसही बरोबर प्रसन्न करून घेऊन महाराजांपासून अभय वचन मिळवून बोलूं लागली आहे; त्यापेक्षां विच्यांत कांहीं तरी सत्यपणा आहे यांत संशय नाहीं त्यांतून असें आहे कीं; कांहीं झालें तरी एका हातानें टाळी वाजत नाहीं.

विज०-वाहवा ! गुरुजी, आपणही बहकलेत असे दिसतें मला.

राजा—(सर्वांस) थांबा, आतां मध्यंतरीं कोणी बोलूं नका. (तारेस) नर्तकी, या कृत्यांत तुजपाशीं कांहीं साक्षी पुरावा असेल तर तो पुढें आण पाहूं.

तारा—ठीक आहे. महाराज; या संबंधानं माझा मुख्य साक्षीदार सांप्रत आपल्या कारागृहांत पडलेला आहे. त्याला कृपा करून आणवावं.

राजा—काय ? तुझा मुख्य साक्षीदार आमच्या

कारागृहांत आहे? त्याचें नांव काय तें सांग बरें.

तारा०—आनंदवल्ली नगरींतील नगरशेट पदवी पावलेले जे सावकार त्या सावकारांचा पुत्र जो आपल्या सरदार मंडळींत नवीनच येऊन राहिला होता, त्या तारानाथास कृपा करून आणवावें आणि मग या कृत्याची चौकशी करावी अशी विनंति आहे.

राजा—ठीक आहे. प्रधानजी, कारागृहरक्षकाकडे हुकूम पाठवून तारानाथास आणवा.

प्र०—ठीक आहे. (जाऊन तारा नाथासह पुनः येतो.)

ताराना०—पद.

वंदन हें तव पायां ॥ राया वंदन हें ॥धृ०॥ अपराधी हा पूर्ण नराधम ॥ मानी थोर सुजाया ॥ प्रायश्चित्तास्तव कारागृह॥सेवी शिणवुनि काया॥ स्त्री कोमल सुंदर जरि भासे ॥ पात्र न विश्वासाया ॥ आला अनुभव पूर्ण मला तो ॥ वाटे लाज वदाया ॥ १ ॥

तारा—(पतीस उद्देशून)

पद—प्यारसे बदलि क्यौं नजर, ही चाल.

प्रीतिची बदलली नजर कशि ॥धृ०॥ प्रथम सफरिचा अपमानास्पद, अवघड जड परिणाम॥नेत्र फिरविणें योग्य नहो हें, फसवित रिपुकृत्ति अशी नजर क० ॥१॥कुंटिणिचें घर परम भयंकर, परिमन करुनि उद्धार ॥ सोडविलें अर्धांगी वरिलें स्मरत सतत दिननिशीं ॥ नजर क० ॥ २ ॥

तारागा०—(तिच्याकडे क्रोधानें पाहून स्तब्ध राहतो

राजा—नर्तकी, हा तुझा साक्षीदार तुझ्या इच्छे प्रमाणें आणून उभा केला आहे. तर आतां आह्मां सर्वां समक्ष याजकडून साक्ष वदवावीस आणि आमचा सरदार विजयवर्मा तुझा ऋणकरी आहे असें जें तुझें बोलणें तें सत्य करून दाखवावेस.

तारा—(नमून) ठीक आहे महाराज. (विजयवर्म्यास) सरदार बहाद्दर, आतां तरी चांगले डोळे उघडून मजकडे पहा आणि खरें कबूल करा.

विज०-चल दूर हो. मी तुला मुळींच ओळखत नाहीं

तारा—काय महाराज ? आपण मला मुळींच ओळखत नाहीं ? ऐका तर—

पद–यजि साहेब न तीजा; ही चाल.

निजमना विचारा कर्म पहा ॥ नृपपदीं न यांचें
फूल वहा ॥ हजार विचार प्रकार दावित ॥
विजय०—गे मागें सर चुप ॥
तारा—विचारा कर्म पहा ॥ नृपपदीं०॥ मृदु मधु-
रुचि वाक्यें ऐकवोनी मुखींची ॥ बहुत लगट केली
तेधवां ओळखीची ॥
विजय०—नवद वितथ ऐसें दूषितां या कुलीना
नृपवर तुज शिक्षा लावितां होसि दीना ॥
तारा—प्रसंग पहिला मनीं धरा हा ॥
विजय०—गे वेडे हो चुप ॥
तारा—विचारा कर्म प० ॥ १ ॥ तेव्हां केलें कर्म

तेथें सुखाचें ॥ मोठे मोठे शब्द होते फुकाचे ॥

विजय०--मिथ्या मिथ्या बोलतां अर्थ नाहीं ॥ सत्यार्थाची भीति राखी न दे ॥

तारा--द्वितीय वच हें असे पुढें हा ॥

विजय०—ज्ञान नसे तुज चुप ॥

तारा—विचारा कर्म प० ॥ रंगोनि रंगीं वदलेत तेव्हां ॥ तें आठवा हें स्वकरांत एव्हां ॥

विजय०—गे सोड नाहीं भय यास कोठें ॥ कां बोलसी हें लटकेंच नेटें ॥

तारा—अखेरिचे हें सुवाक्य तिसरें ॥

विजय०—जा, जा, जा, बस चुप ॥

असो. तीन वेळ झालेंच आहे तरी आणखीं एक वेळ विचारतें, तुह्मीं मला ओळखत नाहीं आणि तुमचा व माझा कांहीं संबंध नाहीं हेंच खरें आहे नां? पहा, चांगला विचार करा आणि बोला.

विज०—अगे त्यांत विचार कसला करायाचा आणि बोलायाचें तरी काय आहे? तुला मी माझ्या या जन्मांत कधीं कोठें पाहिलें नाहीं आणि तुझा व माझा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं; नाहीं, नाहीं, नाहीं, असें पुनः पाहिजे तर आणखीं तीन वेळ सांगतों.

तारा—बरं, असं जर आहे, तर—

पद—पद्दा क्युं येहब शर ही चाल.

पडे कां हा तरुण दुर्गांत ॥ दे उत्तर निभ्रांत ॥ प०
कपट कृतीचे निज अजितीचे छलयुक्तीचे वात ॥

अघ करितांना, करिति तनाना, तोडुनि माना नाना
हर्ष जनानां, होय परीना, तो अक्षय जगतांत॥ १

विज०—अगे याला आपल्या स्त्रीच्या पातिव्रत्याबद्दल मोठा अभिमान होता, पण तो मी खोटा पाडला. अर्थात् हा पैज हरला व तुरंगांत पडला. त्यांत काय तूं विचारतेस ?

तारा—मी हेंच विचारतें कीं, याला जो मोठा अभिमान होता तो खोटा कसा पाडलात तो प्रकार सविस्तर सांगा.

विज०—मी याच्या स्त्रीकडे गेलों, राहिलों, यानें ज्या वस्तु तिला खुणेच्या दिल्या होत्या, त्या आणून याला दाखविल्या. तेव्हां सहजच हा खोटा पडला व गेला तुरुंगांत.

तारा—ज्या वस्तु तुम्ही याच्या स्त्री पासून आणून दाखविल्यात त्या मला दाखवा बरं. पाहूं द्या कसा काय पराक्रम केलात तो.

विज०—(जातो व आंगठीं, रुमाल, कट्यार व तसबीर आणून देऊन) नर्तकी, ह्या पहा याच्या स्त्रीनें मोठ्या प्रीतीनें आह्मांस आपल्या पतिप्रेमाच्या वस्तु दिल्या होत्यां त्या.

तारा—काय हो? विजयवर्मजी, ह्या वस्तु तिनंच तुम्हांला दिल्यांना ?

विज०—यांत काय आतां संशय आहे ?

तारा—(तसबीर राजाच्या हातांत देऊन.)

पद—वसंत मन्मथ, ही चाल.

नृपोत्तमासह सभाजनांनीं ॥ अवलोकावी प्रतिमा नयनीं ॥ ही जी स्त्री ती पहा ताडुनी ॥ न्याय करा पुरता, आतां ॥ ऊष्णोदक सदनास न जाळिल असती न सति मता, आतां ॥जार न हा परि चोर खरोखर ॥ लांच देउनी फोडविता घर ॥ कुंटिणि सह ॥ दासीस बरोबर ॥ फसवुनि साव तसा, येथें॥ येउनियां सांगुनि बढाई, हरवी मम पतितें, येथें ॥ बापबंधुसम इतर सर्व नर ॥ हें व्रत माझें जाणे ईश्वर ॥ कष्टत हा मम मुक्त करा वर ॥ शिक्षा अधमाला, लावा ॥ न्याय करा मम कष्ट अनिष्ट तें न्या विलयाला ॥ आतां ॥ १ ॥

राजा—शाबास! हे महा सती, तूं धन्य आहेस! आणि आपल्या पतीची मुक्तता करण्याकरितां तूं जो हा विलक्षण प्रयत्न केलास, तोही वर्णनीय आहे! (हातांतील तसबीर प्रधानाजवळ देऊन) आधीं या तारानाथास मुक्त करून सन्मानार्थक वस्त्रें व अलंकार द्या आणि या तसबिरींत व या पतिव्रता स्त्रींत कांहीं फरक आहे कीं काय हें पाहून या दुष्ट विजयवर्म्यास कांहीं विचारावें असें वाटत असेल तर विचारा.

प्रधान—(तसबिरीकडे व तारेकडे पाहून) फरक कोण काढील यांत? या पतिव्रतेचीच ही तसबीर! काय हो विजयवर्म, एकून ह्या सर्व वस्तु तुह्मीं चोरी

करूनच आणल्यातना ? धिःकार धिःकार असो तुह्मांला.

चोप०—महाराज, हीं वस्त्रें व अलंकार !

राजा—मित्रा तारानाथा, ये पुढें आणि हीं वस्त्रें व अलंकार घे. (तारेस) बाई, आतां तूं आपलें जन्मापासूनचें वर्तमान मला सांग.

तारा—(विनयानें) ठीक आहे महाराज, ऐकावं—

पद—मेरे गमका तराना सुनिये फिसाना, ही चाल.

मम जन्म कथेला, ऐकें नृपाला, ज्या नाहिं पार ॥ दैवी गतीला, रीति स्थितीला, ऐके नृपाला ॥ ज्या धृ० ॥ भामिन्याख्या माय ती, तात सन्मार्गसिंह ॥ होता महात्मा थोर तो, जाय वनीं त्यजि कींव ॥ मृत्यु नेई मातेला, आक्रांत झाला, ऐकें नृपाला ॥ ॥ ज्या ॥ १. ॥ बलसिंहाभिध बंधु, मी तारा नाम बहीण ॥ फिरलों रानीं एकली, येतां वेळ कठीण ॥ मग तोही अंतरला, मम बंधु मजला, ऐकें नृपाला ॥ ॥ ज्या ॥ २ ॥ चोरा हातीं ही मिळे, ते विकिती गणिकेस ॥ त्या संकटिं हा पावला, तारानाथ इयेस ॥ देई अर्धांग इजला, प्रीतींत रिझला, ऐकें नृपाला ॥ ज्या ॥ ३ ॥

परंतु मला वरल्या कारणानं यांच्या पित्यानं यांचा धिःकार करून यांस घरांतून बाहेर काढलं तेव्हां हे आपल्या आश्रयास येऊन राहिले. त्यानंतर यांनां आपसांत काय प्रतिज्ञा केल्या असतील त्या सर्व आपणांस विदित आहेत. (विजयवर्म्याकडे हात करून) हे शूर नरावतारी पुरुष मला भ्रष्ट

करण्यासाठीं आनंदवल्लींत कधीं आले होते व कोणत्या प्रकारानें मला भ्रष्ट करून परत गेले, हें तरी मला प्रथम कळलं नवतं. पण इकडचं हें वर्तमान कळल्यावर जेव्हां मी शोध केला तेव्हां मला कळलं कीं, आनंदवल्लींत आल्याबरोबर यांनीं कुंटिणीला वश करून घेऊन तिच्याद्वारें या दासीला लालुच दाखवून फोडलं आणि या सर्व खुणेच्या वस्तु चोरी करवून इकडे आणल्या.

राजा–(सिंहासनावरून खालीं उतरतो व तारेस) ताई, ज्याला तूं अंतरला असें मानतेस, तोच हा तुझा बंधु बलसिंह !

तारा–काय माझा अत्यंत प्रियबंधु बलसिंह !

राजा–काय ताई, अजून ही तूं भ्रमांतच आहेस.

पद–जाई परतोनि, ही चाल.

गे माझे बहिणी, ओळख, गे माझे० ॥ भाऊ जो तुजला अंतरला, तोच असे बलसिंह पहा मज, नेत्रें उघडोनी ॥ ओळख गे ॥ धृ० ॥ तृपार्थ मजला सोडुनि गेलिस, नंतर तातानुचरांनीं ॥ आणियलें हें राज्य लाभलें, ख्यात कथा न्यायी परमेश्वर, हें आलें कळुनी ॥ ओळख गे ॥ १ ॥

तारा–भाऊ राया, ईश्वरानं या हतभाग्य तारेचं तोंड उजळ केल्यावर आपली ही ओळख पटली यामुळें मला तर संतोष आहेच, पण जे सज्जन आहेत त्यांस विशेष आनंद झालेला आहे !

बल०—ताई, इतका सर्व विचित्र प्रकार झाला आणि शेवटीं आपण एकमेकांस भेटलों ही आनंदाची परमावधीच आहे. (तारेचा हात त्याच्या हातीं देऊन)

साकी.

ही मम भगिनी करीं धरुनीयां, सुख संपादी तोषें ॥
तारा०—(तारेचा हात धरून)
मान्य असे परिपूर्णपणें मज नको कथाया घोषें ॥
तारा—(नम्रपणानें)
झालें पूर्ण सुखी ॥ न उरे असुखाची बाकी ॥ १ ॥

राजगुरु—एतावत्कालपर्यंत जो प्रकार झाला तो सर्व आनंद परिणामीच होय असें मानलें पाहिजे. आतां हे तारानाथ, तारे, या भूपतीनें तुह्मां उभयतांचें आणखी कोणतें प्रिय करावें ?

तारानाथ—तारा—आतां जर देणें असेल तर भगवंतानें हें द्यावें.

पद—अजब नही इकसीर तुम्हारी ही चाल.

सकल जनीं आनंद वर्धनीं, शांति वसो जलधर वर्षो ॥ धनकनकाची वृद्धि असो स्त्री बाल वृद्ध युव नर हर्षो ॥ मान्य जनांचा मान वाढो, न्याय रज्जु अनया कर्षो ॥ पतिव्रता स्त्री, एक पत्निव्रत पालक गुरजन संतोषो ॥ राष्ट्रपतीचें राष्ट्रवर्धक, अवनि सदा फल कण पोषो ॥ प्रजा सुतासम, वदो नृपति मम अरिवर्गाचें कुल नाशो ॥ १ ॥

समाप्त.